HAPPY NEW YEAR
सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
2025
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
दिनदर्शिकेसह
सोलापूर | बुधवार, १ जानेवारी २०२५ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक ५६ | पाने १२ | किंमत रु. २८/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



तिथीनुसार आज
श्रीनृसिंह सरस्वती जयंती

सोलापूर तरुण भारत
आजच्या अंकासोबत २४ पानांची 'तरुण भारत' दिनदर्शिका २०२५' वाचकांना देण्यात येत आहे. १२ पानी अंक आणि दिनदर्शिकेसह अंकाची किंमत २८ रुपये आहे. दर बुधवारी प्रसिध्द होणारी सदाफुली पुरवणी अपरिहार्य कारणामुळे प्रसिध्द होणार नाही. वाचकांनी याची नोंद घ्यावी.
- व्यवस्थापक

# निर्धारित कक्षेत पोहोचले अंतराळयान

## इस्रोची नजर आणखी एका तांत्रिक यशावर



### जानेवारीत जीएसलव्हीचे १०० वे प्रक्षेपण

श्रीहरिकोटा अंतराळ केंद्रावरून १०० व्या प्रक्षेपणासाठी जानेवारीत नियोजित भूस्थिर प्रक्षेपण वाहन मोहिमेवर महत्त्वपूर्ण टप्पा गाठण्याची तयारी इस्रो करीत आहे. श्रीहरिकोटा येथून प्रक्षेपित केलेली पीएसएलव्ही-सी ६० ही ९९ वी मोहीम होती. या माध्यमातून अंतराळात डॉकिंग प्रयोगासाठी दोन अंतराळयान गोलाकार कक्षेत स्थापित करण्यात आले, असे सोमनाथ यांनी सांगितले.

**श्रीहरिकोटा, ३१ डिसेंबर**

इस्रोने सोमवारी रात्री स्पॅडेक्स अंतराळयान प्रक्षेपित केल्यानंतर ते यशस्वीपणे विभक्त करून निर्धारित कक्षेत प्रस्थापित करण्यात आले. आता इस्रोची नजर डॉकिंग आणि अनडॉकिंगच्या प्रयोगावर आहे.

पीएसएलव्ही-सी ६० मोहीम स्पॅडेक्स अंतराळयानाच्या रूपात पूर्ण झाली, असे मोहिमेचे संचालक एम. जयकुमार यांनी सांगितले. प्रक्षेपण झाल्यावर १५ मिनिटांनी रॉकेटने उपग्रहांना ४७५ किमीच्या गोलाकार कक्षेत योग्य ठिकाणी पोहोचवले, असे इस्रोचे प्रमुख एस. सोमनाथ यांनी सांगितले.

रॉकेटने अंतराळयान निर्धारित कक्षेत स्थापन केले. आता स्पॅडेक्स उपग्रह एकामागोमाग निघाले. वेळेनुसार ते पुढील अंतर कापतील. एकमेकांपासून जवळपास २० किमी दूर जातील आणि नंतर डॉकिंग प्रक्रिया सुरू होईल. डॉकिंग प्रक्रिया एक आठवड्यात पूर्ण होईल, अशी अपेक्षा आहे आणि याची निर्धारित वेळ जवळपास ७ जानेवारीची असेल, असे सोमनाथ यांनी सांगितले.

या मोहिमेत पीओईएम-४ हा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. यावर स्टार्टअप्स, उद्योग, शिक्षण क्षेत्र आणि इस्रोच्या केंद्रांचे २४ पेलोड्स आहेत. मंगळवारी सकाळी हे पेलोड्स डागण्याचे ठरवले होते. कार्य सुरू करण्यासाठी पीओईएम-४ निर्धारित कक्षेत पोहोचतील, हे सुनिश्चित करण्यासाठी संशोधकांना रात्रभर काम करावे लागणार आहे, असे सोमनाथ म्हणाले.

ते पेलोड्स आहेत उपग्रह नाही. पुढील दोन महिने प्रयोग करण्यासाठी ते पीएसएलव्हीच्या दुसऱ्या टप्प्यात जोडण्यात आले होते. पीएसएलव्ही रॉकेटच्या वरच्या टप्प्याला खाली ३५० किमीच्या कक्षेत आणले जाईल आणि सध्या ही प्रक्रिया सुरू आहे. त्यानंतर आमच्याकडे सुरू ठेवण्यासाठी अनेक उपक्रम असतील, असे सोमनाथ यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)



जगभरातच नववर्षाचे स्वागत उत्साहात करण्यात आले. भारतातही ठिकठिकाणी प्रचंड जल्लोषात नववर्षाच्या स्वागतासाठी तरुणाई रस्त्यावर उतरली होती. यात सर्वप्रथम न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियाने बाजी मारली. जल्लोषाचे हे चित्र आहे ऑस्ट्रेलियाच्या सिडनी येथील

### होर्डिंगप्रकरणी मुख्य आरोपीला अटक

**मुंबई** : घाटकोपर होर्डिंग कोसळल्याप्रकरणी मुंबई पोलिसांनी लखनौ येथून मुख्य आरोपीला अटक केली. अर्शद खान असे त्याचे नाव आहे. तो सात महिन्यांपासून फरार होता. १३ मे रोजी मुसळधार पावसात घाटकोपर भागातील मोठे होर्डिंग कोसळून १७ जणांचा मृत्यू झाला होता.

# २०२५ ठरणार सर्वांत उष्ण वर्ष

### जागतिक हवामान विभागाचा अंदाज

**नवी दिल्ली, ३१ डिसेंबर-**

२०२४ या वर्षाने मंगळवारी जगाचा निरोप घेतला आणि २०२५ या नव्या वर्षाला सुरुवात झाली. मात्र, नव्या वर्षाच्या पूर्वसंध्येलाच जागतिक हवामान विभागाने संपूर्ण जगाची चिंता वाढविणारी बातमी दिली. हे नवे वर्ष सर्वाधिक उष्ण ठरणार असल्याचे भाकीत जागतिक हवामान विभागाने वर्तविले आहे.

२०२४ मध्येही काही प्रमाणात उष्णतेचा सामना करावा लागला. नव्या वर्षात उष्णतेची ही लाट तुलनेत जास्त राहणार आहे. हरितगृह वायूंची पातळी आणखी वाढू शकते. यामुळे भविष्यात जगाला अधिक उष्णतेचा सामना करावा लागू शकतो. जागतिक हवामान विभागाच्या मते, २०२४ नंतर २०२५ हे सर्वाधिक उष्ण वर्षांपैकी एक असू शकते. उष्णतेचा परिणाम जगभरात दिसून येईल. संयुक्त राष्ट्राचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस म्हणाले की, मागील एका दशकापासून आपण सर्वच जण प्राणघातक उष्णतेतून जात आहोत. जे देश शांत आणि निरोगी भविष्यासाठी काम करीत आहेत, त्यांच्या पाठीशी आम्ही उभे आहोत.



**भविष्यातील परिस्थिती आणखी गंभीर असणार**

हवामान बदलाच्या स्थितीतून आपण बाहेर पडलो नाही, तर भविष्यातील परिस्थिती आणखी गंभीर होऊ शकते, असा इशारा गुटेरेस यांनी दिला. त्यांच्या मते, नवीन वर्षात अनेक देशांना उत्सर्जन कमी करावे लागेल आणि सुरक्षित मार्गाचा अवलंब करावा लागेल. ऊर्जा संकटाचा सामना करण्यासाठी आणि हवामान बदलाचे परिणाम कमी करण्यासाठी काम करावे लागणार आहे. स्वच्छ आणि शाश्वत ऊर्जा स्रोतांकडे वाटचाल करायला हवी, असे गुटेरेस म्हणाले.

### सुरेश धस यांचा विषय संपला : प्राजक्ता माळी

**मुंबई** : अभिनेत्री प्राजक्ता माळीचा एक व्हिडीओ इन्स्टाग्राम हॅण्डलवर व्हायरल होत आहे. सुरेश धस यांचा विषय संपल्याचे ती यात सांगत आहे. शिवाय प्राजक्ताने सुरेश धस, देवेंद्र फडणवीस आणि रूपाली चाकणकर यांचे आभारही मानले आहेत. तुम्हा सर्वांना माझा नम्रतापूर्वक नमस्कार. संपूर्ण महाराष्ट्राचे मी मनःपूर्वक आभार मानते. समाजातील सर्व स्तरांतून आम्हाला पाठिंबा मिळाला, समर्थन दिले. आम्हाला बळ मिळाले, याबद्दल धन्यवाद. सुरेश धस यांचे आभार मानते. मोठ्या मनाने त्यांनी समस्त महिलांची माफी मागितली, दिलगिरी व्यक्त केली. दादा खूप धन्यवाद. असे करून तुम्ही दाखवून दिले की, तुम्ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचे पाईक आहात, असे प्राजक्ता माळीने व्हिडीओत म्हटले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेही मनापासून आभार. त्यांनी स्वतः लक्ष घातले. अत्यंत संवेदनशीलपणे त्यांनी हा विषय पुढे नेला आणि मार्गी लावला. राज्य महिला आयोग आणि आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनीही त्वरित कारवाई केली. त्यांचेही खूप आभार, असे प्राजक्त माळीने म्हटले आहे.



### बांगलादेशातील हिंदूंच्या सुरक्षेसाठी प्रार्थना

**कोलकाता** : बांगलादेशात हिंदूंवर सुरू असलेल्या अत्याचाराच्या पृष्ठभूमीवर कोलकाता येथील इस्कॉन मंदिरात एकत्र येत हिंदू नागरिकांच्या संरक्षणासाठी भाविकांनी प्रार्थना केली. यावेळी त्यांनी भजन गात आम्ही तेथील हिंदू नागरिकांसोबत असल्याचा संदेश दिला. मंगळवारी सकाळी इस्कॉन मंदिराचे प्रवक्ते राधारमण दास यांच्या नेतृत्वात शेकडो भाविक अल्बर्ट रोड येथील केंद्रात प्रार्थनेसाठी एकत्र आले. त्यांनी बांगलादेशात अल्पसंख्यकांवर होत असलेल्या अत्याचाराचा निषेध केला. तुरुंगात असलेले इस्कॉनचे पुजारी चिन्मय कृष्ण दास यांच्यासह इतर साधू-संतांच्या सुटकेची मागणी यावेळी करण्यात आली. नवीन वर्षात अशा प्रकारच्या घटना होऊ नये यासाठी प्रार्थनाही करण्यात आली.

### बीडमधील अनावश्यक शस्त्र परवाने रद्द होणार

**संभाजीनगर** : बीड जिल्ह्यात जारी करण्यात आलेल्या सर्व शस्त्र परवान्यांची पोलिस छाननी करीत असून, प्रत्येक प्रकरणात त्या व्यक्तीला बंदुकीची कायदेशीर गरज आहे का, याची पडताळणी केली जात आहे, असे अधिकाऱ्याने सांगितले. ज्या व्यक्ती बंदुकीतून उगाच गोळीबार करतानाची छायाचित्रे किंवा व्हिडिओ सोशल मीडियावर फिरत असतील, त्यांच्याविरूद्ध प्राथमिक माहिती अहवाल नोंदविण्यात येईल, अशी माहिती बीडचे पोलिस अधीक्षक नवनीत कानवट यांनी दिली. ९ डिसेंबर रोजी मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या आणि खंडणीच्या प्रकरणानंतर या जिल्ह्यातील बिघडलेली कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती समोर आली.

# वाल्मीक कराड सीआयडीला शरण

**पुणे, ३१ डिसेंबर**

बीड येथील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात सूत्रधाराची भूमिका असलेला वाल्मीक कराड याने मंगळवारी पुण्यातील सीआयडी कार्यालयात शरणागती पत्करली.

वाल्मीक कराड आज सीआयडीसमोर शरणागती पत्करेल, अशी शक्यता वर्तवली जात होती. या पृष्ठभूमीवर सीआयडी कार्यालयात पोलिस उपायुक्त सौदीपसिंग गिल आणि गुन्हे शाखेचे पोलिस उपायुक्त निखिल पिंगळे उपस्थित होते. कराड सीआयडीला शरण आल्यास त्याच्या समर्थकांची गर्दी होऊ शकते, हे लक्षात घेऊन पुणे पोलिसांनी सीआयडी कार्यालयाबाहेर बंदोबस्त वाढवला होता.



वाल्मीक कराडने शरण येण्यापूर्वी एक व्हिडीओ जारी केला. त्यात त्याने स्वतःची बाजू मांडली. वाल्मीक कराड खाजगी गाडीने सीआयडी कार्यालयात आला. यावेळी त्याचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने जमा झाले होते.

कराडने व्हिडीओत म्हटले की, माझ्याविरोधात केज पोलिस ठाण्यात खंडणीची खोटी तक्रार दाखल झाली. अटकपूर्व जामिनाचा अधिकार असताना मी पुण्यात पाषण येथील सीआयडी कार्यालयात शरण जात आहे. संतोष देशमुख यांचे जे कोणी मारेकरी असतील, त्यांना अटक करावी आणि फाशीची शिक्षा द्यावी. राजकीय वैमनस्यातून माझे नाव त्यांच्याशी जोडले जात आहे. पोलिस तपासात मी दोषी आढळलो, तर मला शिक्षा द्या. मी शिक्षा भोगायला तयार आहे. (वृत्तसंस्था)

# बीड प्रकरणात आरोपी फासावर लटकेपर्यंत स्वस्थ बसणार नाही : मुख्यमंत्री फडणवीस



**मुंबई, ३१ डिसेंबर-**

बीडच्या संतोष देशमुख हत्याकांडातील आरोपी फासावर लटकेपर्यंत पोलिस स्वस्थ बसणार नाहीत, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी दिली. बीडच्या प्रकरणात आम्ही कुणालाही सोडणार नाही. या प्रकरणात ज्याचा संबंध ज्या प्रकरणात आढळेल त्या सर्वांवर कारवाई केली जाईल. आम्ही गुंडांचे राज्य चालवू देणार नाही. कुणालाही अशा प्रकारे हिंसा करता येणार नाही व खंडणी मागता येणार नाही, असे ते म्हणालेत.

बीडच्या मस्साजोग हत्याकांडाशी निगडीत खंडणी प्रकरणात पोलिसांना हवा असणारा वाल्मीक कराड आज अखेर सीआयडीपुढे शरण आला. त्याने पुणे स्थित सीआयडीच्या कार्यालयात आत्मसमर्पण केले. त्याची सध्या चौकशी सुरू आहे. वाल्मीक कराड हा राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय आहे. त्यामुळे या प्रकरणाच्या निष्पक्ष चौकशीसाठी धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे.

या पार्श्वभूमीवर वाल्मीक कराड पोलिसांना शरण आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणी भाष्य करताना बीडच्या प्रकरणात कुणालाही सोडणार नसल्याची ग्वाही दिली. ते म्हणाले, बीडच्या प्रकरणात आम्ही कुणालाही सोडणार नाही. या प्रकरणात ज्याचा संबंध ज्या प्रकरणात आढळेल त्या सर्वांवर कारवाई केली जाईल. अतिशय कडक कारवाई केली जाईल. गुंडांचे राज्य आम्ही चालवू देणार नाही. कुणालाही या प्रकरणी अशा प्रकारे हिंसा करता येणार नाही. खंडणी मागता येणार नाही. त्या दृष्टिकोनातून तपास अतिशय गतीशिल करण्यात आला आहे. त्यामुळेच त्यांना शरणागती पत्करावी लागली आहे.

या प्रकरणातील फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी तपास पथके सक्रीय झाले आहेत. सरकार कोणत्याही आरोपीला सोडणार नाही. सर्वांचा शोध घेतला जाईल. स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या बंधूंशी माझी फोनवरून चर्चा झाली आहे. मी त्यांना काळजी न करण्याची ग्वाही दिली. यासंबंधी काय वाटेल ते झाले तरी सर्व दोषी शोधून ते फासावर लटकेपर्यंत पोलिस स्वस्थ बसणार नाहीत असा विश्वास मी त्यांना दिला आहे.



पंढरपूर : मंदिरे हिंदू धर्माची शक्तिकेंद्रे होण्यासाठी व मंदिर संस्कृती रक्षणार्थ मंदिर विश्वस्त आणि सर्व विठ्ठल भक्तांच्यावतीने श्री संत नामदेव महाराज पायरी येथे सामुहिक आरती करण्यात आली.



# अक्कलकोट नगरी स्वामी नामस्मरणाने दुमदुमली

### सरते वर्षास निरोप नविन वर्षारंभी स्वामी चरणी भाविक दाखल

**अक्कलकोट दि ३१ डिसेंबर**

सरते वर्षाला निरोप व नविन वर्षारंभी स्वामी चरणी नतमस्तक होऊन स्वामी नामाचा महिमा गाण्यासाठी अक्कलकोट श्री तीर्थक्षेत्री मोठय प्रमाणात भाविक मंगळवारी एकवटले मंगळवार सकाळी चालू झालेला स्वामी नाम स्मरण सोहळा बुधवारी पहाटे पाचपर्यत चालू होता राज्यातील मुंबई उपनगरे दादर ठाणे कोल्हापुर पुणे बोरोविली नासिक अहमदनगर रायगड सिंधुदुर्ग रत्नागिरी आदि महाराष्ट्रातील सर्वच भागातून आलेल्या स्वामी भक्तानी दिवसरात्र नॉन स्टॉप गटा गटाने स्वामी चरणी भजन नामस्मरण भारूड गौळण विविध धार्मिक पात्र वेशभुषासह सादर केले . स्वामी नामाचा महिमा गात तीर्थक्षेत्र अक्कलकोट नगरी भक्ती रसात न्हाहली .

उठा उठा हो गावकऱ्यानों ' . चमत्कार झाला ! स्वामी समर्थ आला हो अक्कलकोट वाला | वासुदेव आला साऱ्या भाविकांची मने जिंकली . अक्कलकोट स्वामीची पालखी निघाली ! स्वामी समर्थ नामाचा घोष करा स्वामी नेतील ही नांव पैलतीरा ! स्वामी समर्थ | स्वामी समर्थ अशी अनेक भक्ती गीते सादर केली. वटवृक्ष श्री स्वामी समर्थ महाराज देवस्थान चे अध्यक्ष महेश इंगळे यांनी आलेल्या भाविकांना सेवा सादर करण्यास संधी दिली. भाविकांची निवासाची भोजनाची सोय केली पोनि राजेंद्र टाकणे व सहकारी पोलीसांनी बंदोबस्त चोख ठेवला.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
भविष्याची सांगे दिशा 'सोलापूर तरुण भारत'ची
२०२५ दिनदर्शिका
● नव्या वर्षाची नवी कोरी दिनदर्शिका
● वर्षभर संग्रही राहील अशा वाचनीय मजकुरासह २४ पानांची रंगीत दिनदर्शिका
● प्रत्येक तारखेचा बारीक-सारिक तपशील
● तिथी वार, नक्षत्र, बारा राशींचे भविष्य, योगासन, पर्यटन, हॉटेलिंग, आरोग्य विषयी भरगच्च मजकुरासह...

दिनदर्शिका किंमत २८/- रु.
आजच्या अंकासोबत २०२५ ची दिनदर्शिका वाचकांना घरपोच मिळणार..!
नोंदणीसाठी संपर्क : 8888847267


सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### अनन्या नायडूने पटकवले एअर रायफल सुवर्णपदक



**भोपाळ** : महाराष्ट्राची युवा नेमबाज अनन्या नायडू हिने मंगळवारी येथे राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेत महिलांच्या १० मीटर एअर रायफल प्रकारात रेल्वेची अनुभवी मेघना सज्जनार हिचा अल्प फरकाने पराभव करून सुवर्णपदक जिंकले. अनन्याने एमपी स्टेट अकादमी रेंजमधील अंतिम फेरीत २५२.५ गुण मिळवून मेघनाचा अवघ्या ०.२ गुणांनी पराभव करून तिचे पहिले वरिष्ठ राष्ट्रीय विजेतेपद पटकावले. तामिळनाडूच्या आर नर्मदा नितीनने २३१.३ गुणांसह कांस्यपदक पटकावले. पात्रता फेरीत अनन्या आठव्या स्थानावर राहिली तर तिच्याच राज्याची आर्य राजेश बोरसे ६३३.३ गुणांसह अव्वल स्थानी राहिली. नर्मदाने ६३२.९ गुणांसह दुसरे स्थान मिळवून अंतिम फेरीत प्रवेश केला. महिलांच्या १० मीटर एअर रायफल ज्युनियर स्पर्धेत गौतमी भानोतने २५१.५ गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला.

### हरीश रेड्डी यांच्या नेतृत्वाखालील गोल्फ असोसिएशनला मान्यता

**नवी दिल्ली** : भारतीय ऑलिम्पिक असोसिएशन (आयओए) ने हरीश कुमार रेड्डी यांच्या नेतृत्वाखालील भारतीय गोल्फ संघ (आयजीयू) ला मान्यता दिली आहे, तर ब्रिजंदर सिंग यांच्या नेतृत्वाखालील इतर संस्था अवैध असल्याचे घोषित केले आहे. आयओए अध्यक्ष पीटी उषा यांनी स्वाक्षरी केलेल्या सोमवारी जारी केलेल्या पत्रात म्हटले आहे की रेड्डी यांच्या नेतृत्वाखालील मंडळाला मान्यता देण्यापूर्वी राष्ट्रीय ऑलिम्पिक समितीने 'तथ्यांचे पुनरावलोकन केले' आणि 'प्रक्रियात्मक अनुपालन तपासले'. आयजीयूचे नवीन पदाधिकारी निवडण्यासाठी १५ डिसेंबर रोजी दोन वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यात आल्या. यापैकी एक इंडिया हॅबिटॅट सेंटरमध्ये झाली. ज्यामध्ये ब्रिजंदर यांची पुन्हा अध्यक्ष म्हणून निवड झाली. यासाठी पंजाब आणि हरयाणा उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश रामेश्वर यांना रिटर्निंग ऑफिसर करण्यात आले. दुसरी एजीएम ऑलिम्पिक भवन येथे झाली जिथे रेड्डी यांची अध्यक्ष म्हणून निवड झाली आणि न्यायमूर्ती ओपी गर्ग (निवृत्त) यांनी रिटर्निंग ऑफिसरची भूमिका बजावली. आपल्या पत्रात, आयओए, रेड्डी यांच्या नेतृत्वाखालील संस्थेला मान्यता देण्याचे कारण देत, रिटर्निंग ऑफिसर न्यायमूर्ती गर्ग यांनी मागील आयजीयू पदाधिकाऱ्यांच्या आरोपानुसार कधीही राजीनामा दिला नाही.

### तर 'पीआर'ची गरज नाही : एमएस धोनी

**नवी दिल्ली** : जर तुम्ही चांगले क्रिकेट खेळत असाल तर तुम्हाला जनसंपर्काची (पीआर) गरज नाही, असे मत दोन वेळा विश्वचषक जिंकणारा माजी भारतीय कर्णधार महेंद्रसिंग धोनी याने व्यक्त केले. धोनीने नुकत्याच केलेल्या संवादात, दोन दशकांपूर्वी आंतरराष्ट्रीय पदार्पण केल्यापासूनच्या त्याच्या प्रवासाबद्दल आणि त्याच्या व्यवस्थापकांनी त्याला जनसंपर्कासाठी सोशल मीडियाचा लाभ घेण्याचे सुचवले परंतु तो नेहमीच त्यापासून दूर राहिला. मी सोशल मीडियाचा कधीच मोठा चाहता नव्हतो. अनेक व्यवस्थापकांनी माझ्यासोबत काम केले आणि त्यांनी मला सोशल मीडिया वापरण्याचा सल्ला दिला. तो म्हणाला, मी २००४ मध्ये खेळायला सुरुवात केली. त्यामुळे ट्विटर आणि इन्स्टाग्राम लोकप्रिय होत होते आणि व्यवस्थापक सर्व प्रकारचे युक्तिवाद करत होते की तुम्ही काही पीआर बनवा, परंतु माझे एकच उत्तर होते की मी चांगले क्रिकेट खेळलो तर, ते नेहमीच होते. कोणाचे किती फॉलोअर्स आहेत, कोण काय करत आहे यावर मी भर देत नाही कारण मला माहीत आहे की जर मी क्रिकेट चांगला खेळलो तर बाकी सर्व काही आपोआप होईल. २०२० मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटला अलविदा करणारा ४३ वर्षीय धोनी इंडियन प्रीमियर लीगच्या आगामी (१८ व्या हंगामात) खेळण्याची तयारी सुरू करणार आहे. वयाच्या या टप्प्यावर फिटनेस राखणे आव्हानात्मक असल्याचे त्याने कबूल केले.

### एका चेंडूवर काढल्या १५ धावा

**मीरपूर** : एका चेंडूत १५ धावा... क्रिकेटमध्ये असे क्वचितच घडते, जेव्हा एका चेंडूत १५ धावा होतात. पण, हे वर्षाच्या शेवटच्या दिवशी म्हणजे ३१ डिसेंबरला मंगळवारी घडले. जेव्हा बांगलादेश प्रीमियर लीगच्या तिसऱ्या सामन्यात खुलना टायगर्सचा गोलंदाज ओशान थॉमसने एका चेंडूत १५ धावा दिल्या. चटगाव किंग्स संघ २०४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करीत होता. कर्णधार मेहदी हसन मिराजने नवीन चेंडू ओशाने थॉमसकडे सोपवला आणि पहिले षटक टाकण्याची जबाबदारी त्याच्याकडे दिली.

# कसोटी पराभवानंतरही बुमराह-रेड्डीचा मेलबर्नमध्ये सन्मान

### एमसीजी मैदानाच्या ऑनर्स बोर्डमध्ये समावेश

◆ **मेलबर्न, ३१ डिसेंबर**

मेलबर्न कसोटीत मोठ्या पराभवानंतरही ऑस्ट्रेलिया क्रिकेटने जसप्रीत बुमराह आणि नितीशकुमार रेड्डी यांचा गौरव केला आहे. मेलबर्न क्रिकेट मैदानाच्या ऑनर बोर्डवर बुमराह आणि नितीशची नावे कोरली गेली आहेत.

बीसीसीआयने मंगळवारी बुमराह आणि रेड्डी यांची नावे सन्मान फलकावर लिहिल्याचा व्हिडिओ जारी केला. ४८ सेकंदांच्या या व्हिडिओमध्ये २१ वर्षीय नितीश रेड्डी सन्मान फलकावर आपले नाव बघून त्याचा फोटो काढताना दिसत होता. सुनील गावस्कर, सचिन तेंडुलकर आणि विराट कोहली यांची नावे या फलकावर आहेत. कपिल देव आणि अनिल कुंबळे हे बोर्डाच्या गोलंदाजांच्या यादीत आहेत.

मेलबर्न कसोटीच्या दोन्ही डावात बुमराहने एकूण ९ गडी बाद केले. नितीश रेड्डीने पहिल्या डावात ११४ धावा काढून भारताला फॉलोऑनपासून वाचवले. या सामन्यात भारताला ऑस्ट्रेलियाविरुद्ध १८४ धावांनी दारुण पराभव स्वीकारावा लागला होता. या पराभवानंतर भारतीय संघ ५ सामन्यांच्या मालिकेत १-२ ने पिछाडीवर आहे. (वृत्तसंस्था)



ऑनर्स बोर्डवर आपले नाव कोरल्यानंतर आनंद व्यक्त करताना नितीशकुमार रेड्डी

#### ऑनर्स बोर्ड म्हणजे काय?

कोणत्याही मैदानावर संस्मरणीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचा सन्मान मंडळात समावेश केला जातो, जेणेकरून त्यांची कामगिरी दीर्घकाळ स्मरणात राहावी. सामान्यत: मैदानावर शतक झळकावणारे फलंदाज आणि एका डावात ५ बळी किंवा १० बळी घेणारे गोलंदाज यांना यात स्थान मिळते. एमसीजी ऑनर्स बोर्डात स्थान मिळवणारा नितीश रेड्डी हा ११वा भारतीय फलंदाज आहे, तर बुमराह सहावा गोलंदाज आहे.

# भारताकडे रोहित, विराटची जागा भरून काढणारे खेळाडू

### माजी प्रशिक्षक डॅरेन लेहमनचे मत

◆ **मेलबर्न, ३१ डिसेंबर**

भारतीय क्रिकेट संघात यशस्वी जयस्वालसारखा सुपरस्टार आहे. त्यामुळे त्याच्यासारखे खेळाडू विराट कोहली आणि रोहित शर्मा यांच्या निवृत्तीनंतरही त्यांची जागा भरून काढतील, असे मत ऑस्ट्रेलियाचा माजी मुख्य प्रशिक्षक आणि दोन वेळा विश्वचषक विजेता डॅरेन लेहमन याने व्यक्त केले आहे.

एक दशकाच्या कारकीर्दीत ऑस्ट्रेलियासाठी २७ कसोटी आणि ११७ एकदिवसीय सामने खेळलेल्या लेहमनने जसप्रीत बुमराहचे कौतुक केले. मालिकेवर इतका प्रभाव पाडणारा खेळाडू मी कधीही पाहिला नसल्याचे म्हटले आहे.

सध्या सुरू असलेल्या मालिकेतील खराब कामगिरीमुळे रोहित आणि कोहली निवृत्त होण्याच्या शक्यतेबाबत लेहमनने वृत्तसंस्थेला सांगितले की, पुढील काही दिवसांत काय होते आणि ते काय निर्णय घेतात ते पाहूया.

तो म्हणाला, आता युवा खेळाडू भारतासाठी चांगले खेळत आहेत. भारतीय क्रिकेटमध्ये इतके प्रतिभाशाली खेळाडू आहेत की, त्यांना काळजी करण्याची गरज नाही. जेव्हा जेव्हा हे दोघे निवृत्तीचा निर्णय घेतात तेव्हा त्यांच्या जागी अनेक प्रतिभावान युवा खेळाडू असतात. जयस्वालबद्दल तो म्हणाला, सुपरस्टार. सर्वोत्तम फलंदाजांपैकी एक. तो आणि हॅरी ब्रूक हे पुढच्या पिढीतील खेळाडू आहेत. मेलबर्न आणि पर्थमध्ये त्याने शानदार खेळी खेळली. या दौऱ्यात एक खेळाडू म्हणून त्याच्यात बरीच सुधारणा झाली आहे.





वसीम अक्रम आणि ग्लेन मॅकग्रासोबत बुमराहची तुलना करताना डॅरेन म्हणाला, मला वाटते की रोहितनंतर तो पुढचा कर्णधार असेल. पर्थमध्ये त्याने चमकदार कामगिरी केली. मी खेळताना पाहिलेला तो सर्वोत्तम गोलंदाज आहे.

मी वसीम अक्रम आणि ग्लेन मॅकग्रा यांना पाहिले आहे, पण २०१३ मध्ये गोलंदाजाने मालिकेत जितका प्रभाव टाकला होता तितका प्रभाव मी कधीही पाहिला नाही.

पॅट कमिन्स, मिचेल स्टार्क, जोश हेझलवूड, स्कॉट बोलँड यांसारख्या गोलंदाजांनी तिशी ओलांडली असली तरी बदलाच्या टप्प्यावर लेहमन म्हणाला की, ऑस्ट्रेलियाला फलंदाजीची काळजी करण्याची गरज आहे. (वृत्तसंस्था)

# ऑस्ट्रेलियन खेळाडूंनी कॉन्स्टाससारखे आक्रमक खेळावे

### डेव्हिड वॉर्नरचे आवाहन

◆ **मेलबर्न, ३१ डिसेंबर**

ऑस्ट्रेलियाचा युवा फलंदाज सॅम कॉन्स्टास ज्या प्रमाणे भारतीय गोलंदाज जसप्रीम बुमराहविरुद्ध खेळला, तशाच आक्रमक मानसिकतेने ऑस्ट्रेलियाच्या इतर खेळाडूंनी त्याचा सामना करावा, असे आवाहन ऑस्ट्रेलियाचा माजी सलामीवीर डेव्हिड वॉर्नरने केले आहे.

मेलबर्नमधील चौथ्या कसोटीत एकोणीस वर्षीय कॉन्स्टासने कसोटी पदार्पण करताना ६५ चेंडूत ६० धावा केल्या. ऑस्ट्रेलियाने ही कसोटी १८४ धावांनी जिंकली. वॉर्नरने सांगितले, हे खूप खास होते. लोक त्याच्यावर टीकाही करतील. पण हा त्याचा नैसर्गिक खेळ आहे आणि तो तसा खेळणार आहे. तुम्हाला हे बुमराहसारख्या गोलंदाजाविरुद्ध करावे लागेल. दुसऱ्या डावात त्याने बुमराहला थर्ड मॅन आणि फाईन लेगवर मैदानात उतरवले होते. ही चाचणी त्याच्यासाठी चांगला अनुभव होता.

पंतप्रधान इलेव्हनकडून खेळताना कॉन्स्टासने भारताविरुद्ध ९७ चेंडूत १०७ धावा केल्या आणि एमसीजीमध्ये भारत अ विरुद्ध ७३ धावांची नाबाद खेळी खेळली. वॉर्नर म्हणाला, पंतप्रधान इलेव्हनसाठी त्याच्या खेळीने हे सिद्ध केले की तो केवळ प्रतिभावानच नाही तर आक्रमकही आहे.

तो क्रमवारीत अगदी निर्भयपणे खेळत होता. ५० कसोटी सामने खेळलेल्या खेळाडूंनीही धैर्याने फलंदाजी करायला हवी होती. त्यानेही क्रीजमधून बाहेर येऊन शॉट्स खेळायला हवे होते. या मालिकेत ३० गडी बाद करणाऱ्या बुमराहचे कौतुक करताना वॉर्नर म्हणाला, तुम्हाला अपेक्षा असेल की तो शेवटच्या कसोटीत त्याच लयीत राहणार नाही. तो एक हुशार आहे. त्याची कामगिरी उत्कृष्ट आहे. त्याच्यावर दबाव टाकणे खूप कठीण आहे. 'उज्जी' (उस्मान ख्वाजा) पहिल्या स्पेलमध्ये त्याचे फक्त दोन चेंडू खेळू शकला. त्याच्यासमोर फलंदाजांनाही नशीब हवे असते. (वृत्तसंस्था)

# मिशेल स्टार्क पाचवी कसोटी खेळणार

◆ **मेलबर्न, ३१ डिसेंबर**

मिचेल मार्श भारताविरुद्ध अपेक्षेप्रमाणे खेळू शकला नाही. त्याचप्रमाणे मिशेल स्टार्क सिडनी येथे होणारी पाचवी कसोटी खेळण्याची शक्यता आहे, अशी आशा ऑस्ट्रेलियाचा मुख्य प्रशिक्षक अँड्रयू मॅकडोनाल्ड याने व्यक्त केली.

बॉक्सिंग डे कसोटीच्या तिसऱ्या दिवसापासून बरगडीच्या सूजने त्रस्त असलेल्या ऑस्ट्रेलियासाठी स्टार्कचा फिटनेस चिंतेचा विषय आहे, पण त्याने प्रभावी गोलंदाजी करत विराट कोहलीला बाद केले.

एमसीजी कसोटी जिंकल्यानंतर मॅकडोनाल्ड म्हणाला, दुखणेसुद्धा स्टार्कला थांबवू शकले नाही. सुरुवातीच्या स्पेलमध्ये त्याला अडचणीचा सामना करावा लागला पण त्यानंतर त्याने मुक्तपणे गोलंदाजी केली. तो कसा बरा होतो ते पाहता येईल. सिडनीची खेळपट्टी पाहून आम्ही संघाची रचना ठरवू.

ऑस्ट्रेलियाने सिडनी कसोटी जिंकली किंवा अनिर्णीत राखली केली तर २०१४-१५ नंतर प्रथमच बॉर्डर गावस्कर करंडक त्याच्या नावावर होणार आहे. भारताने जिंकल्यास चषक भारताकडेच राहील आणि हा विक्रम सलग पाचव्यांदा होईल. जर स्टार्क सिडनी कसोटी खेळू शकला नाही, तर ऱ्हाय रिचर्डसन किंवा शॉन बॉट ही पोकळी भरून काढू शकतात.

मॅकडोनाल्ड म्हणाला, मला खात्री आहे की स्टार्क खेळू शकेल. तसेच, रिचर्डसन आणि शॉन एबॉट देखील येथे आहेत. खेळपट्टी पाहून आम्ही निर्णय घेऊ.

चार कसोटीत केवळ ७३ धावा करू शकलेल्या मार्शचा बचाव करताना तो म्हणाला, त्याची मानसिक तयारी चांगली आहे. कामगिरी चांगली व्हायला हवी यात शंका नाही. (वृत्तसंस्था)

# आरिफ सईद पीओएच्या अध्यक्षपदी

◆ **कराची, ३१ डिसेंबर**

गेल्या ४६ वर्षांत केवळ दोन अध्यक्ष राहिल्यानंतर, पाकिस्तान ऑलिम्पिक संघटनेने २०२५ ते २०२९ या कालावधीसाठी आरिफ सईद यांची नवीन अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली आहे.

जानेवारीमध्ये लेफ्टनंट जनरल (निवृत्त) आरिफ हसन यांनी प्रकृतीच्या कारणास्तव राजीनामा दिल्यानंतर आरिफची निवडणूक बिनविरोध झाली. हसन यांनी मार्च २००४ ते डिसेंबर २०२४ या कालावधीत हे पद भूषवले होते. यापूर्वी, दिवंगत वाजिद अली शाह मार्च १९७८ ते मार्च २००४ पर्यंत पीओएचे अध्यक्ष होते.

हसन यांनी राजीनामा देण्याचा निर्णय घेतला तेव्हा त्यांची चौथी कारकीर्द होती. पाकिस्तान बॉक्सिंग फेडरेशनचे अध्यक्ष खालिद महमूद यांची सरचिटणीसपदी तर पाकिस्तान टेबल टेनिस महासंघाचे अध्यक्ष अहमर मलिक यांची कोषाध्यक्षपदी निवड करण्यात आली. आरिफ सईद हे जवळपास २० वर्षांपासून पाकिस्तान रग्बी युनियनचे अध्यक्ष आहेत. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये अर्शद नदीमने भालाफेकमध्ये प्रथम क्रमांक पटकावल्यानंतर पाकिस्तानने प्रथमच ऑलिम्पिक वैयक्तिक स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले. (वृत्तसंस्था)



ऑस्ट्रेलियातील पर्थ येथे युनायटेड कप टेनिस सामन्यात अमेरिकेची कोको गॉफ (डावीकडून) विजय मिळवल्यानंतर प्रतिस्पर्धी खेळाडू क्रोएशियाची डोना वेकिकशी हस्तांदोलन करताना

# झिम्बाब्वे-अफगाणिस्तान पहिली कसोटी अनिर्णीत

◆ **बुलावायो, ३१ डिसेंबर**

झिम्बाब्वे आणि अफगाणिस्तानने येथे अनिर्णीत राहिलेल्या कसोटीत आपापल्या सर्वोच्च कसोटी धावा केल्या.

यजमान झिम्बाब्वेचा संघ पहिल्या डावात ५८६ धावांत सर्वबाद झाला होता. याआधी, २००१ मध्ये त्याने वेस्ट इंडीजविरुद्ध नऊ गडी गमावून ५६३ धावा केल्या होत्या.

प्रत्युत्तरात अफगाणिस्तानने ६९९ धावा केल्या. रहमत शाह (२३४) आणि कर्णधार हशमतुल्ला शाहिदी (२४६) यांनी तिसऱ्या गड्यासाठी ३६४ धावांची भागीदारी केली, जो अफगाणिस्तानसाठी कोणत्याही गड्यासाठी विक्रम आहे. अफगाणिस्तानची यापूर्वीची सर्वोच्च धावसंख्या चार गडी बाद ५४५ धावा होती जी त्याने २०२१ मध्ये झिम्बाब्वेविरुद्ध केली होती.

सामना अनिर्णीत राहिला तेव्हा झिम्बाब्वेने दुसऱ्या डावात चार गडी गमावून १४२ धावा केल्या होत्या. गुरुवारपासून दुसरी कसोटी सुरू होणार आहे. (वृत्तसंस्था)

# भारतीय पुरुष संघ नेपाळविरुद्ध, महिला संघ द. कोरियाविरुद्ध भिडणार

### खो-खो विश्वचषक स्पर्धा

◆ **नवी दिल्ली, ३१ डिसेंबर**

येथील इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियमवर १३ जानेवारीपासून सुरू होणाऱ्या पहिल्या खो-खो विश्वचषक स्पर्धेच्या पहिल्या दिवशी भारतीय पुरुष संघ अ गटात नेपाळविरुद्ध, तर महिला संघ दुसऱ्या दिवशी आपला पहिला सामना दक्षिण कोरियाविरुद्ध खेळेल.

१३ ते १९ जानेवारी दरम्यान होणाऱ्या या विश्वचषक स्पर्धेत पुरुष आणि महिला गटात अनुक्रमे २० आणि १९ संघ सहभागी होणार आहेत.

खो-खो विश्वचषक आयोजन समितीचे अध्यक्ष सुधांशू मित्तल यांनी मंगळवारी येथे जारी केलेल्या निवेदनात सांगितले की, संघांची चार गटांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ बाद फेरीसाठी (उपांत्यपूर्व फेरी) पात्र ठरतील.

पुरुष गटात भारत आणि नेपाळ व्यतिरिक्त अ गटात पेरू, ब्राझील आणि भूतानचे संघ आहेत.

महिला गटात अ गटात भारत आणि दक्षिण कोरियासह इराण आणि मलेशिया यांचा समावेश आहे. त्यानंतर भारतीय पुरुष संघ १४ जानेवारीला ब्राझील, १५ जानेवारीला पेरू आणि १६ जानेवारीला भूतानविरुद्ध खेळेल. महिला संघाला १५ जानेवारीला इराण आणि १६ जानेवारीला मलेशियाचे आव्हान असेल. या स्पर्धेत दोन्ही गटातील उपांत्यपूर्व फेरी १७ जानेवारीला, उपांत्य फेरी १८ जानेवारीला आणि अंतिम सामना १९ जानेवारीला होणार आहे. (वृत्तसंस्था)



#### पुरुष संघांचा गट

अ गट : भारत, नेपाळ, पेरू, ब्राझील आणि भूतान
ब गट : दक्षिण आफ्रिका, घाना, अर्जेंटिना, नेदरलँड आणि इराण
क गट : बांगलादेश, श्रीलंका, दक्षिण कोरिया, अमेरिका आणि पोलंड
ड गट : इंग्लंड, जर्मनी, मलेशिया, ऑस्ट्रेलिया आणि केनिया

#### महिला संघांचा गट

अ गट : भारत, इराण, मलेशिया आणि दक्षिण कोरिया
ब गट : इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, केनिया, युगांडा आणि नेदरलँड
क गट : नेपाळ, भूतान, श्रीलंका, जर्मनी आणि बांगलादेश
ड गट : आफ्रिका, न्यूझीलंड, पोलंड, पेरू आणि इंडोनेशिया

### पंत बाद झाल्यानंतर हेडने साजरा केला आनंद

**मेलबर्न** : ऑस्ट्रेलियन फलंदाज ट्रॅव्हिस हेडने 'बॉक्सिंग डे' कसोटीत ऋषभ पंतला बाद केल्यानंतर त्याच्या असामान्य सेलिब्रेशनचे स्पष्टीकरण दिले. संपूर्ण दुसऱ्या सत्रात फलंदाजी केल्यानंतर 'बॉक्सिंग डे' कसोटीच्या शेवटच्या दिवशी यशस्वी जयस्वाल आणि पंत सामना अनिर्णीत ठेवण्याच्या स्थितीत होते. मात्र, हेडने पंतला बाद करून सामन्याचे रूप पालटले आणि त्यानंतर भारतीय संघ नाटकीयरीत्या कोसळला आणि ऑस्ट्रेलियाने चौथी कसोटी १८४ धावांनी जिंकून पाच सामन्यांच्या मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली.

# आर. वैशाली उपांत्यपूर्व फेरीत

### जागतिक ब्लिट्झ बुद्धिबळ स्पर्धा

◆ **न्यू यॉर्क, ३१ डिसेंबर**

भारतीय ग्रॅण्डमास्टर आर. वैशालीने जागतिक ब्लिट्झ बुद्धिबळ स्पर्धेत महिला पात्रता फेरीत विजय मिळवून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे.

सुवर्णपदक आणि ६०,००० डॉलर्स बक्षीस जिंकणाऱ्या कोनेरू हम्पीच्या उत्कृष्ट कामगिरीनंतर, वैशालीने तिच्या खेळाने चाहत्यांची मने जिंकली. तिने ११ पैकी ९.५ गुण मिळवून महिला गटात विजय मिळवला. खुल्या गटात जागतिक क्रमवारीत अव्वल मॅग्नस कार्लसनसह दहा खेळाडू पहिल्या स्थानासाठी बरोबरीत होते. कार्लसनने १३ पैकी सहा सामने अनिर्णीत राखले आणि पात्रता फेरीनंतर संयुक्त अव्वल स्थानावर राहिला.



रशियाच्या इयान नेपोम्नियाचीने ९ सामने जिंकले. अमेरिकेचा फॅबियानो कारुआना दुसऱ्या तर कार्लसन तिसऱ्या स्थानावर होता. भारताचा एकही खेळाडू अव्वल आठमध्ये पोहोचू शकला नाही.

अर्जुन एरिगेसीने पहिल्या पाच फेऱ्या जिंकल्या पण त्याला गती राखता आली नाही आणि त्याचे केवळ सात गुण झाले. आर प्रज्ञानंद ८.५ गुणांसह दुसरा आला. उपांत्यपूर्व फेरीत वैशालीचा सामना चीनच्या झु जिनरशी होईल. वैशालीने जॉर्जियाची ग्रॅण्डमास्टर जगनिडझे आणि रशियाच्या व्हॅलेंटिना गुनिना यांचा पराभव केला. (वृत्तसंस्था)

# आयुष म्हात्रेने जयस्वालचा विक्रम मोडला

### प्रथम श्रेणीमध्ये १५० पेक्षा जास्त धावा करणारा युवा फलंदाज

◆ **अहमदाबाद, ३१ डिसेंबर**

मुंबईचा युवा फलंदाज आयुष म्हात्रे याने मंगळवारी विजय हजारे करंडक स्पर्धेत नागालँडविरुद्ध शानदार शतक झळकावून आपले नाव इतिहासाच्या पानात नोंदवले. प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये १५० पेक्षा धावा करणारा तो सर्वांत तरुण फलंदाज ठरला. त्याने यशस्वी जयस्वालला मागे टाकले.

आयुषने वयाच्या १७ वर्षे १६८ दिवसांत ही कामगिरी केली तर यशस्वी जयस्वालने वयाच्या १७ वर्षे २९१ दिवसांत हा विक्रम केला. २०१९ मध्ये मुंबईकडून खेळताना त्याने झारखंडविरुद्ध १५० पेक्षा जास्त धावा केल्या. या मोसमात म्हात्रेने मुंबईसाठी पदार्पण केले. नागालँडविरुद्ध त्याने ११ षटकार आणि १५ चौकारांसह १८१ धावा केल्या. त्याने ११७ चेंडूंचा सामना केला. म्हात्रेच्या या खेळीमुळे मुंबईने ५० षटकांत सात गडी गमावून ४०३ धावा केल्या.



मुंबईच्या विरार उपनगरातील असलेल्या म्हात्रेने या हंगामाच्या सुरुवातीला संघात सामील झाल्यापासून सर्व फॉरमॅटमध्ये चमकदार कामगिरी केली आहे. तो इराणी चषक विजेत्या मुंबई संघाचा भाग होता ज्याने २७ वर्षांनंतर ऑक्टोबरमध्ये शेष भारताचा पराभव करून ट्रॉफी जिंकली होती. रणजी चषकामध्ये म्हात्रेने ७१ चेंडूत ५२ धावांची शानदार खेळी केली पण बडोद्याविरुद्धच्या मोसमातील पहिल्या सामन्यात मुंबईचा पराभव झाला. (वृत्तसंस्था)

CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | बुधवार, १ जानेवारी २०२५ ।

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com







अक्कलकोट : दै. 'तरुण भारत'च्या दिनदर्शिकेचे प्रकाशन तिर्थक्षेत्र अक्कलकोट येथे मोठ्या थाटात संपन्न झाले. याप्रसंगी वटवृक्ष श्री स्वामी समर्थ देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे अध्यक्ष जन्मेंजयराजे भोसले, सचिव श्याम मोरे, अन्नछत्र मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, दै. 'तरुण भारत'चे संचालक चैतन्य पेठे, मुख्य संपादक प्रशांत माने, मराठवाडा आवृत्ती विभागप्रमुख राजाराम मस्के, जाहिरात विभागप्रमुख मनोहर बायनी, नंदकुमार जगदाळे आदी मान्यवर उपस्थित होते.

# तरुण भारत दिनदर्शिकेतून भारतीय संस्कृतीची महती

## अन्नछत्र मंडळाचे सचिव शाम मोरे यांचे गौरवोद्गार

**तभा वृत्तसेव**
**अक्कलकोट ३१ डिसेंबर**

दै .तरुण भारतची दिनदर्शिका भारतीय संस्कृतीची महती विषद करणारी असल्याचे गौरवोद्गार श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे सचिव शाम मोरे यांनी काढले.

दै.तरुण भारतच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे झाले. याप्रसंगी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे सचिव शाम मोरे बोलत होते. याप्रसंगी अन्नछत्र मंडळाचे उपाध्यक्ष अभव खोबरे, भाऊ कापसे, महिद्रकर, एस. के. स्वामी, .दै .तरूण भारतचे संचालक चैतन्य पेठे, मुख्य संपादक प्रशांत माने, मराठवाडा विभाग प्रमुख राजाराम मस्के, जाहिरात व्यवस्थापक मनोहर बायनी, तरुण भारत अक्कलकोट प्रतिनिधी नंदकुमार जगदाळे, समाधान अहिरे, राजेश जगताप, प्रशांत शिंदे, मंडळाचे पुरोहित अप्पु पुजारी, मेजर मोरे, इंजिनियर मिलिंद थोरात, अप्पा हंचाटे, बाळासाहेब कुलकर्णी, संजय राठोड, सिद्धेश्वर मोरे, प्रवीण घाडगे, गोटू माने, निखील पाटील, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, नामा भोसले, राहुल इंडे, बाळासाहेब घाडगे, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, तानाजी पाटील, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, महांतेश स्वामी, धनंजय निंबाळकर, बसवराज क्यार, अनिल बिराजदार, एस के स्वामी, मल्लिनाथ कोगनुरे, शावरेप्पा माणकोजी, कल्याण देशमुख, विशाल घाडगे, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

## तरुण भारतची दिनदर्शिका परिपूर्ण : महेश इंगळे

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट ३१ डिसेंबर**

दै .तरुण भारत ची दिनदर्शिका परिपूर्ण आहे, असे प्रतिपादन वटवृक्ष स्वामी समर्थ देवस्थान चे अध्यक्ष माजी नगराध्यक्ष महेश इंगळे यांनी केले.

दै .तरुण भारतच्या लोकप्रिय दिनदर्शिकेचे प्रकाशन वटवृक्ष स्वामी समर्थ मंदिरात श्री स्वामींच्या साक्षीने करण्यात आले. याप्रसंगी महेश इंगळे बोलत होते. याप्रसंगी दै.तरूण भारतचे संचालक चैतन्य पेठे, मुख्य संपादक प्रशांत माने, मराठवाडा विभाग प्रमुख राजाराम मस्के, जाहिरात व्यवस्थापक मनोहर बायनी, तरुण भारत अक्कलकोट प्रतिनिधी नंदकुमार जगदाळे समाधान अहिरे, राजेश जगताप, युवराज सोनटक्के, प्रसाद सोनार, श्रीशैल गंवडी, पिंटू हिंडोळे, नागनाथ घोसले, पिंटू पवार, पवन पवार, संजय पवार, काशीनाथ इंडे, कोल्हापुर येथील स्वामी भक्त परिवार आदिची उपस्थिती होती .

# जिल्हा मराठी पत्रकार संघाचा आदर्श पत्रकारिता पुरस्कार प्रशांत माने यांना जाहीर

## ६ जानेवारीला आ. कोठे, पोलिस आयुक्त राजकुमार यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**

सोलापूर जिल्हा मराठी पत्रकार संघाचा आदर्श पत्रकारिता पुरस्कार दैनिक 'तरुण भारत'चे मुख्य संपादक प्रशांत माने यांना जाहीर झाला आहे. गौरव पत्र, पाच हजार रुपये रोख, शाल श्रीफळ, पुस्तके असे पुरस्काराचे स्वरूप आहे.



हीरक महोत्सव साजरा करणाऱ्या सोलापूर जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वातीने दरवर्षा प्रमाणे यंदाही ६ जानेवारी २०२५ रोजी पत्रकारांचे वितरण होणार आहे. बार्शीचे ज्येष्ठ संपादक स्व बाबुराव मठपती यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा पुरस्कार यंदा दै. तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने यांना जाहीर झाला आहे. स्व. रंगाअण्णा वैद्य यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा पुरस्कार पत्रकार विनोद कामतकर यांना तर 'कासिदकार' स्व. अ. लतीफ नल्लामंदू यांचे नावे दिला जाणारा पुरस्कार पत्रकार आफताब अन्वर शेख यांना जाहीर करण्यात आल्याची माहिती पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष अय्यूब नल्लामंदू यांनी दिली. गौरव पत्र, पाच हजार रुपये रोख, शाल श्रीफळ, पुस्तके असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

पत्रकार दिनाचे औचित्यसाधून पुरस्काराचे वितरण ६ जानेवारी २०२५ दुपारी १२. ३० वाजता विजापूर रोड येथील पत्रकार भवनच्या कै. रंगाअण्णा वैद्य सभागृह मध्ये होणार आहे. पुरस्कार वितरण कार्यक्रम संघाचे अध्यक्ष अशोक मठपती यांच्या अध्यक्षतेखाली व शहर मध्यचे आ. देवेंद्र कोठे यांच्या हस्ते होणार असून याप्रसंगी पोलीस आयुक्त एम. राजकुमार, जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

# संगीत साधनेतूनच ईश्वरीय दर्शन : प्रा.डॉ. कराड

## उस्ताद डागर बंधु यांच्या हस्ते एम आयटी सांस्कृतिक संध्याचे उद्घाटन

**पुणे, दि. ३१ डिसेंबर:**

''सांस्कृतीक संध्या ही संगीताच्या साधनेतून शांतरसाची अनुभूती देणारी आहे. त्यातूनच प्रत्येकाला ईश्वरीय दर्शन घडते. वैश्विक भारतीय संस्कृती ही मानवतावादी आहे. आजच्या तरुण पिढीला भारतीय संस्कृतीचा विसर पडत चालला आहे. त्यांच्यामध्ये भारतीय संस्कृती रुजविण्यासाठी भारतीय संगीत महत्वाची भूमिका बजावत आहे.'' असे विचार एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष



विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी व्यक्त केले. विश्व शांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे भारततर्फे लोणी काळभोर येथील विश्वराज बंधारा, विश्वशांती गुरूकुल, राजबाग येथे आयोजित केलेल्या दोन दिवसीय 'एमआयटी सांस्कृतिक संध्या' संगीत महोत्सावाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी उस्ताद नफीसुद्दीन डागर व उस्ताद अनीसुद्दीन डागर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच पं. उध्दवबापू आपेगांवकर, विश्वशांती कला अकादमीचे महासचिव आदिनाथ मंगेशकर, दूरदर्शनेचे माजी संचालक डॉ. मुकेश शर्मा, नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस.एन.पठाण आणि प्रसिद्ध गप्पाष्टककार डॉ. संजय उपाध्ये उपस्थित होते. प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले,'' भारतीय युवक ज्या मार्गाने जात आहे तो योग्य नाही. येथील संस्कृती ही सर्वश्रेष्ठ असून ती विश्वशांतीचा मार्ग दाखविणारी आहे.''डॉ. मुकेश शर्मा म्हणाले,'' भारतीय संस्कृती ही संस्कार देणारी आहे. नव वर्षात प्रवेश करतांना आपण संस्कृतीचे जतन करावे. संगीत साधना ही सर्व शास्त्रांमध्ये सर्वोच्च आहे. यात नाद व ताल आहे. ही संगीत संध्या नसून संस्कृती आहे.''या संगीत महोत्वसावाच्या उद्घाटनानंतर भारतरत्न श्रीमती लता मंगेशकर विश्वशांती संगीत अकादमीचे विद्यार्थ्यांनी शिव वंदना आणि गणेशवंदना सादर केली. प्राचार्या श्रेयसी पावगी यांचे गायन झाले. त्यानंतर ज्येष्ठ व्हायोलिन वादक तेजस उपाध्ये यांचे व्हायोलिनवादन झाले.

# राज्य सागरी जलतरण स्पर्धेत रेल्वे क्लबची कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**

सिंधुदुर्ग येथील राज्य सागरी जलतरण स्पर्धेत येथील रेल्वे क्लबच्या जलतरणपटूंनी उल्लेखनीय कामगिरी केली. सिंधुदुर्ग जिल्हा जलतरण संघटना आणि मालवण नगरपरिषद व महाराष्ट्र राज्य जलतरण संघटना यांच्या वतीने ही स्पर्धा मालवण, चिवला येथे झाली. यात येथील रेल्वे क्लबच्या मुलामुलींनी पहिल्यांदाच सहभाग नोंदविला होता. स्पर्धा पूर्ण करणाऱ्या प्रत्येक स्पर्धकाला प्रशस्तीपत्रक व मेडल देऊन गौरविण्यात आले. त्यांना मुख्य प्रशिक्षक नीरज कटकुर यांच्या समवेत श्रीधर जेऊरे, अनुराग कानडे, रोहित खरात, ऋषिकेश यरगल, महेश कुठे, सुबजीत मुखर्जी यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व स्पर्धकांचे सोलापूर जिल्हा हौशी जलतरण संघटनेचे अध्यक्ष सुदेश देशमुख, सेक्रेटरी पार्वतय्या श्रीराम, महाराष्ट्र संघटनेचे माजी सेक्रेटरी झुबीन आमारिया यांनी अभिनंदन केले.



**शर्यत पूर्ण केलेले जलतरणपूट**

**१ किलोमीटर-१० वर्षाखालील :** देवांश गुंडाळे, दिविजा गुंडाळे, सानवी महाडिक, बोधिसत्व कांबळे, श्रुती जानगवळी, अनन्या उकरंडे, श्रीरंग पैकेकरी, श्रेया पैकेकरी, श्रीशा कुथे, राजवर्धन वाकडे, हर्षवर्धन वाकडे, जनीषा नानकानी, हॉन्सो शाटसांग.

**२ किलोमीटर-१४ वर्षाखालील :** आरोही येमूल, क्रिशा डाकलिया, रुहि बलडोटा, अवधूत डोके, सौमित्र दिघे, प्रणव मस्के, सुलग्ना सेठी, अपणाबा नॉइतंबाम.

**३ किलोमिटर- १६ वर्षाखालील :** वेदांत सामरेटी, पार्थ वाघ, ऋग्वेद देशपांडे, ओमसाई आवार. **३० वर्षाखालील :** अक्षय भडंगे, अभिषेक मोहिते, दत्तात्रय काळे, वैभव स्वामी, निरंजन काळे, अजय अनंतपुरकर, महेश कुठे, मोहन पवार, नरेश दासरी ऋषिकेश यरगल.



# नववर्षाच्या पूर्वसंध्येला राष्ट्ररक्षक महासंघाचा 'दारु सोडा, दूध प्या' उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**

युवकांना व्यसनमुक्तीपासून प्रोत्साहन मिळावे यासाठी सोलापूर मधील राष्ट्ररक्षक महासंघाच्या वतीने नववर्षानिमित्त दारू सोडा, दूध प्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

हा कार्यक्रम जिल्हा सरकारी वकील ॲड. प्रदीपसिंह राजपूत, बार असो. अध्यक्ष ॲड. अमित आळंगे, योग प्रशिक्षक जी. डी. रणसुभे, निवृत्त प्राचार्य सुरेंद्र शिंदे, राष्ट्ररक्षक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष ॲड. लक्ष्मण पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

व्यसनमुक्त जीवन जगण्यासाठी मनाची तयारी महत्वाची आहे. मी व्यसनाच्या आहारी जाणार नाही, कोणत्याही मादक पदार्थ, तंबाखू, विडी सिगारेट, गुटखा, बिअर घेणार नाही, ही गाठ मनाशी बांधून ठरवल्यास नक्कीच युवक व्यसनांपासून मुक्त राहणार यात शंका नाही, असे मत योग प्रशिक्षक जी. डी. रणसुभे यांनी उद्घाटन प्रसंगी मांडले. व्यसनमुक्ती करण्यासाठी सामाजिक संस्थेने पुढाकार घेतल्यास चांगली तरुण पिढी निर्माण होईल, असा निर्वाळ ॲड. अमित आळंगे यांनी दिला.

समाजामध्ये विविध व्यसनांचे प्रकार आहेत. काही वस्तूच्या रुपात तर काही सवयीच्या रुपात आहेत. ही व्यसने आपणहुन लावली असून, ती आता कायमची घालवावीत, असे आवाहन ॲड. प्रदीपसिंह रजपूत यांनी केले.

# आयुक्त शितल तेली - उगले यांना पदोन्नती

## अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांनी काढले आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर -**

सोलापूर : सोलापूर महापालिकेच्या आयुक्त शितल तेली उगले यांना भारतीय प्रशासन सेवेच्या अधिकालिक वेतन श्रेणीत दि. १ जानेवारी २०२५ पासून स्थानापन्न पदोन्नती देण्यात आली आहे. पदोन्नतीनंतर त्यांची नियुक्ती सध्याच्याच पदावर ते पद अधिकालिक वेतन श्रेणीत उन्नत करून पुढे चालू ठेवण्यात येत आहे, असे आदेश

सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव (सेवा) व्ही. राधा यांनी आज काढले आहेत. स्थानापन्न पदोन्नतीच्या या आदेशामुळे आता महापालिका आयुक्त तेली - उगले यांच्या बदलीच्या चर्चेला सध्या तरी पूर्णविराम मिळाला आहे. भारतीय प्रशासन सेवेच्या अधिकालिक वेतन श्रेणीत (लेव्हल १४ ऑफ दि पे मॅट्रिक्स) दि. १ जानेवारी २०२५ पासून स्थानापन्न पदोन्नती देण्यात येऊन, पदोन्नतीनंतर आपली नियुक्ती सध्याच्याच पदावर ते पद अधिकालिक वेतन श्रेणीत उन्नत करून पुढे चालू ठेवण्यात येत आहे. असे सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव (सेवा) व्ही. राधा यांनी आदेशात म्हटले आहे. मंत्रालयातील सामान्य प्रशासन विभागाने या संदर्भात आज मंगळवारी हे आदेश काढले आहेत. महापालिका आयुक्त शितल तेली उगले यांनी दिनांक २१ नोव्हेंबर २०२२ रोजी येथे आयुक्त पदाचा पदभार घेतला. त्याचबरोबर २५ नोव्हेंबर २०२२ रोजी त्यांच्याकडे सोलापूर स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशनच्या मुख्य कार्यकारी अधिकार पदाचाही कार्यभार देण्यात आला होता. स्मार्ट सिटीच्या सीईओ पदी नुकतीच शासनाने गोपीचंद कदम यांची नियुक्ती केली आहे.दरम्यान, त्यांची मंत्रालयात पदोन्नतीने बदली होणार या संदर्भात जोरदार चर्चा होती. आतापर्यंतच्या दोन वर्ष एक महिन्याच्या महापालिका आयुक्त पदाच्या कार्यकाळात शितल तेली - उगले यांनी सोलापूर महापालिका प्रशासनात ३०२ पदांची मेगा भरती केली. महापालिकेतील कर्मचारी, अधिकाऱ्यांना पदोन्नत्या दिल्या. लाड पागे कमिटी आणि अनुकंपा खाली नियुक्त्या दिल्या आहेत. विशेष म्हणजे महत्वकांक्षी प्रकल्प मानल्या जाणाऱ्या उजनी - सोलापूर समांतर जलवाहिनीच्या कामाच्या पूर्णत्वासाठी त्यांनी वेळोवेळी पाठपुरावा करून हे काम अंतिम टप्प्यात आणले आहे.

# शारीरिक व मानसिक सद्दढतेसाठी खेळाला महत्त्व द्यावे : राहूल हजारे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.३१ डिसेंबर-**

चांगले आरोग्य हिच आपली संपत्ती आहे. चांगल्या आरोग्यासाठी प्रत्येकांनी एक खेळ जोपासला पाहिजे. खेळामुळे विद्यार्थ्यांची शारीरिक, मानसिक, भावनिक व बौद्धिक सदृढता वाढते. त्यामुळे खेळाला महत्त्व द्यावे, असे प्रतिपादन वालचंद कनिष्ठ महाविद्यालयाचे क्रीडा शिक्षक राहुल हजारे यांनी केले.

विनायक नगर येथील राजराजेश्वरी प्राथमिक शाळेत क्रीडा सप्ताहाच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त मुख्याध्यापक विजयकुमार हुल्ले होते. यावेळी क्रीडा संघटनेचे शहराध्यक्ष विठ्ठल कुंभार, माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर म्हेत्रे, मुख्याध्यापिका वैशाली कुंभार आदी उपस्थित होते. प्रथम सहशिक्षक लक्ष्मण कांबळे यांनी क्रीडा शपथ दिली. यावेळी हुल्ले म्हणाले, विद्यार्थ्यांनी दररोज किमान चार पाच तास खेळले पाहिजे. विद्यार्थ्यांजवळ खिलाडूवृत्ती असावी.स्पर्धेत हार-जित असणारच आहे.आपण आपल्या शाळेत उत्कृष्ट खेळाडू बनण्यासाठी प्रयत्न करावे.



# उत्तर सोलापूर तेलगाव शाळा लहान गटात विजेती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ डिसेबर-**

जिल्हा परिषदेच्या जिल्हास्तरीय मुलींच्या लंगडी स्पर्धेत उत्तर सोलापूर तेलगाव शाळेने लहान गटात विजेतेपद पटकाविले. पापरी व मोहोळने मोठ्या गटात बाजी मारली.

शिक्षण विभाग जिल्हा परिषद अंतर्गत पंचायत समिती उत्तर सोलापूर आयोजित ही स्पर्धा जागृती विद्यामंदिर प्रशाला नेहरूनगर येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाली. सोलापूर जिल्ह्यातील अकरा तालुक्यातून विजयी संघ शाळेतील खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता.या स्पर्धेचे उदघाटन शिक्षणाधिकारी कादर शेख, गटविकासाधिकारी बाबासाहेब पाटील, गटशिक्षणाधिकारी सिद्धेश्वर निंबर्गी, शिक्षणविस्तार अधिकारी बापूराव जमादार, जागृती विद्यामंदिर प्रशालेचे प्राचार्य चव्हाण, केंद्रप्रमुख सिद्राम वाघमोडे, बी.डी.कोळी, मल्लिनाथ निंबर्गी, विकास पाटील, संतोष साळुंके आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन शिवाजी वसपटे, प्रास्ताविक शाहनवाज मुल्ला, पांडुरंग सुर्वे मानले. स्पर्धेचे नियोजन गटशिक्षणाधिकारी सिध्देश्वर निंबर्गी,शिक्षण विस्ताराधिकारी बापूराव जमादार यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका समन्वयक पांडुरंग सुर्वे,क्रीडा संघटक शाहनवाज मुल्ला,शिवाजी वसपटे तसेच संतोष साळुंके यांचे सहकार्य लाभले.

**अंतिम निकाल (विजेता, उपविजेता) : लहान गट :** तेलगाव शाळा उत्तर सोलापूर आणि जळळोली शाळा पंढरपूर. **मोठा गट :** पापरी शाळा मोहोळ आणि कणबस शाळा दक्षिण सोलापूर.

## अग्रलेख...

# नव्या आरंभाचे ठरो नवे वर्ष

हिंदू नव वर्षाचा आरंभ व्हायला अद्याप वेळ असला तरी २०२५ हे इंग्रजी नवीन वर्ष आजपासून सुरू झाले आहे. एकविसाव्या शतकाच्या पहिल्या पाव भागातले हे शेवटचे वर्ष. भारताचे आराध्य दैवत असलेल्या रामललाच्या मूर्तीची अयोध्येतील भव्य श्रीराम मंदिरात प्राणप्रतिष्ठा होऊन २०२४ हे वर्ष सुरू झाले होते आणि गुकेश डोम्माराजूने बुद्धिबळातील जगज्जेता म्हणून भारताचे नाव इतिहासात कोरले तेव्हा हे वर्ष संपायला आले होते. मनोहर जोशी, पंकज उदास यांच्यासारख्या नामवंतांचा मृत्यू, काही नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती असे बरेच काही दुःखद २०२४ मध्ये घडले. तरीही या वर्षाचा एकूण बाज हा सकारात्मक, विधायक अशा स्वरूपाचा होता. भारताचे पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा शपथ घेतली. २०२४ मध्ये भारताचा ७५ वा प्रजासत्ताक दिन पार पडला. महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस पुन्हा मुख्यमंत्रिपदी विराजमान झाले. जम्मू-काश्मिरात विधानसभेची निवडणूक झाली. पाच हजार कोटी रुपये खर्चून पार पडलेल्या अंबानींकडल्या लग्नाने देशाचेच नव्हे, तर जगाचे डोळे विस्फारले. भारतीय न्याय संहितेसह तीन नवे कायदे तसेच पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि बांगलादेशातील हिंदू, शीख, जैन, ख्रिश्चन, बौद्ध आणि पारशी समुदायांना दिलासा देणारा सिटिझनशिप अमेंडमेंट ॲक्ट हा कायदा अंमलात आला. इलेक्टोरल बॉण्ड स्किम घटनाबाह्य असल्याचा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला. याच वर्षात माओवाद्यांच्या विरोधात ठोस कारवाई सुरू झाली आणि त्यांच्या निःपातासाठी निर्णायक पावले पडतानाही दिसली. भारत आणि चीन यांच्यातील सीमावाद सोडवण्याच्या दिशेने सकारात्मक प्रयत्न सुरू झालेत. पॅरिसच्या ऑलिम्पिकमध्ये भारताने चांगली कामगिरी बजावली. इस्रोने २०२४ मध्ये बऱ्याच महत्त्वाकांक्षी मोहिमा यशस्वी केल्या. आदित्य-एल-वन ही त्यातील सर्वांत महत्त्वाची मोहीम. आरजी कार मेडिकल कॉलेजमधील बलात्काराचे प्रकरण देशभर गाजले. त्या घटनेचे दुखणे अजून संपलेले नाही. अशा विषयांवरचा आक्रोश संपू देखील नये. कारण आक्रोश सुरू राहिला तरच अशा घटनांच्या प्रतिबंधासाठी ठोस पावले उचलली जाण्याची शक्यता वाढत असते. २०२४ हे वर्ष बव्हंशी आश्वासक राहिले असले तरी अशा काही घटनांनी चिंतेचे वातावरण देखील निर्माण केले होते, हे आपल्याला विसरता येणार नाही. जम्मू-काश्मिरात यशस्वीरीत्या विधानसभेची निवडणूक पार पडली असली तरी याच वर्षात हिंदू भाविकांवर लष्कर-ए-तोयबाच्या अतिरेक्यांनी हल्ला केला आणि नऊ जणांचे जीव घेतले, हेही आपल्याला विसरता येणार नाही. सीमावर्ती भागांत अनेक जवानांना हौतात्म्य आले, रेल्वेचे अपघात झाले, इमारती कोसळल्या आणि माणसं मेली, उत्तर भारतात अतिवृष्टीने शेकडोंचे जीव गेले, इस्पितळांमध्ये आग लागून चिमुकल्यांचे जीव गेले अशा अनेक घटना आहेत, ज्यांचे विस्मरण होता कामा नये. २०२५ या इंग्रजी नव्या वर्षाचा आरंभ करताना अशा दुःखद घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी सर्वप्रथम आपण सर्वांनी संकल्प केला पाहिजे. २०२४ मध्ये अयोध्येत रामललाची प्राणप्रतिष्ठा झाली. आता २०२५ मध्ये मथुरा मुक्त व्हावी, हाही तमाम भारतीयांसाठी संकल्पाचा विषय असला पाहिजे.

२०२४ हे लोकसभा निवडणुकीचे वर्ष होते. महाराष्ट्रासह काही राज्यांमध्ये देखील निवडणुका झाल्या. २०२५ मध्ये दिल्ली विधानसभा आणि बिहार विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. २०२४ मध्ये भाजपाच्या विरोधकांनी ईव्हीएमच्या नावाने बोंबा ठोकल्या. पण, त्यात त्यांना यश आले नाही. आता २०२५ मध्ये तरी विरोधकांनी सुधरले पाहिजे आणि निवडणुकीच्या माध्यमातून जनतेने दिलेल्या कौलाचा सन्मान करायला शिकले पाहिजे. १४० कोटी लोकसंख्येचा भारत प्रगतीच्या मार्गावर अग्रेसर झाला आहे. त्यासाठी गेल्या दशकभरातील मोदी सरकारची कारकीर्द हे प्रमुख कारण ठरले. ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञानातील महाशक्ती म्हणून भारताचे नाव आता जगात मान्यता पावलेले आहे. भारताचा अंतराळ कार्यक्रम राष्ट्रीय प्रतिष्ठेचा तर आहेच, शिवाय तो प्रगत तंत्रज्ञानातील देशाच्या क्षमतेचे प्रतीक आहे. यासोबतच डिजिटल इंडिया उपक्रम २०२५ मध्ये नवी उंची गाठेल, फाईव्ह जी आणि सिक्स जी नेटवर्कच्या दिशेने पावले पडतील. कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, इंटरनेट ऑफ थिंग्ज आणि ब्लॉकचेनमधील प्रगतीची नवी शिखरे भारताला खुणावत आहेत. या साऱ्या आश्वासक गोष्टी आहेत. मात्र, काही आव्हाने देखील आहेत.

शेती-शेतकरी, शिक्षण, आरोग्य, सामाजिक सौहार्द आणि वातावरणातील प्रतिकूल बदल या विषयांकडे २०२५ मध्ये सरकार आणि समाजाने विशेष लक्ष घातले पाहिजे. भारत हा अद्याप कृषिप्रधान देश आहे. त्यामुळे शेतीची स्थिती सुधारल्याखेरीज देशाचे अर्थकारण फार प्रगत होऊ शकत नाही. शिक्षण प्रक्रियेचे सबलीकरण व पूर्ण सामाजिकीकरण केल्याखेरीज शिक्षणाची दारे समाजातील शेवटच्या घटकांसाठी उघडली जाऊ शकणार नाहीत. आरोग्याच्या समस्या वाढत चाललेल्या आहेत. वैद्यकीय व्यवसायात नको तितका धंदेवाईकपणा आलेला आहे. त्यामुळे सरकारने आरोग्य यंत्रणा सुधारण्यावर भर दिला पाहिजे, जेणेकरून खाजगी वैद्यकीय सेवेवरील अवलंबित्व किमान पातळीवर येईल. सामाजिक सौहार्दासाठीही सरकार आणि समाजाला, विशेषतः समाज धुरिणांना विशेष प्रयत्न करावे लागतील. देवादिकांच्या नावावर भांडण-तंटे होऊ नयेत, पण ज्यांना तसे करण्याची खुमखुमी असते, त्यांना दट्ट्या देण्याची आपल्याला तयारी ठेवावी लागेल. पर्यावरणाचा तोल बिघडलेला आहे. तज्ज्ञांचे म्हणणे असे आहे की, पर्यावरणातील बदलांचा अधिक तीव्र प्रभाव २०२५ पासून जाणवायला लागेल. आताही तो कमी नाही. दिल्लीत मोकळा श्वास घेता येत नाही. वायुप्रदूषण, जलप्रदूषण, ध्वनिप्रदूषण, पाण्याची टंचाई, स्वच्छता असे सर्व विषय सरकार आणि समाजाने प्राधान्यक्रमाने हाताळण्यासाठी घेतले पाहिजेत. ऊर्जा सुरक्षितता सुनिश्चित करण्याच्या प्रयत्नांचा भाग म्हणून सौर आणि पवन ऊर्जेची स्वीकारार्हता वाढवावी लागेल. शहरे कचरा आणि घाणमुक्त करावी लागतील. शहरांचे ढिसाळ नियोजन आणि शहरांवर येत असलेला लोकसंख्येचा ताण हा गंभीर विषय आहे. गावे राहण्याजोगी नाहीत आणि शहरांमध्ये श्वास घेता येत नाही, असा हा तिढा आहे. शेती आणि ग्रामीण उद्योग यांत प्रगती झाली तर शहरांमध्ये येणारे लोंढे थांबतील. शहरांचे नियोजन व्यवस्थित केले तर तेथे राहणे आनंददायी होईल. अर्थकारण वाढणार आहे, असा अंदाज आहे. पण, निव्वळ अर्थकारण वाढून भारताचे भागणार नाही. १४० कोटी लोकसंख्येतील प्रत्येकाला या अर्थकारणातील वृद्धीचा लाभ मिळायला हवा. बेरोजगारी संपायला हवी. भारताच्या आर्थिक विकासाचे फायदे समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचतील याची सरकारने खातरजमा केली पाहिजे. गरिबी, असमानता आणि दर्जेदार आरोग्यसेवा आणि शिक्षणाचा अभाव या समस्यांवर लक्षित कल्याणकारी कार्यक्रमांद्वारे प्रभावी उपाय करणे आवश्यक आहे. महिला, दलित आणि ग्रामीण लोकसंख्येसारख्या उपेक्षित गटांवर विशेष लक्ष दिले पाहिजे. देश म्हणजे सरकार नसते. देश म्हणजे देशातील माणसं असतात. ती जितकी विचारी, संयमी आणि दूरदृष्टीची असतील, तितका चांगला देश घडत असतो. सरकार देश चालवू शकते. देश घडवण्याची जबाबदारी ही समाजाची आणि त्यातही विविध क्षेत्रांत समाजाचे, समुदायांचे नेतृत्व करणाऱ्यांची असते. ऑलिम्पिकमध्ये पदक मिळवणाऱ्यांच्या देशात किंवा बुद्धिबळात जगज्जेता ठरलेल्या बालकाच्या देशात युवकांना नोकरी नसणे किंवा बालकांना शिक्षणाच्या सोयी नसणे यापुढे तरी आपल्याला लज्जास्पद वाटले पाहिजे. त्यासाठी आग्रह धरणारी व्यासपीठे आहेत. संघटना आहेत. त्यांनी सरकारवर दबाव आणला पाहिजे आणि समाजाच्या कल्याणाचे काम करून घेतले पाहिजे. आपले अर्थकारण वाढेल. ते वाढत राहील. आपला देश जागतिक नेतृत्व करण्याच्या क्षमतेचा झाला आहे. त्याचीही प्रतिष्ठा वाढत राहील. परंतु, कोणत्याही उंचीचे स्थैर्य त्याच्या मजबूत पायावर ठरत असते. सुखी, संपन्न, समाधानी, समृद्ध समाज हा अशा प्रकारे विकसित होत असलेल्या देशाचा पाया असतो. एकविसाव्या शतकाचा एक चतुर्थांश भाग संपायला आलेला असताना, तसा देश घडवण्याच्या दिशेने नवा आरंभ करणारे वर्ष म्हणून २०२५ कडे पाहूया आणि कृतिशील होऊया. सर्वांना आंग्ल नवीन वर्षाच्या शुभेच्छा.

## प्रासंगिक

# थयथयाट करून 'आप'चा नाकर्तेपणा लपेल?

राहुल गोखले



नव्या वर्षाचा प्रारंभ होत असताना यंदा दोन राज्यांत होणाऱ्या विधानसभा निवडणुकांची चर्चा होणे स्वाभाविक आहे. दिल्ली विधानसभेची निवडणूक फेब्रुवारीत, तर बिहार विधानसभेची निवडणूक या वर्षीच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात होऊ शकते. बिहारमधील निवडणुकीला अद्याप अवधी असला तरी दिल्लीचे वातावरण मात्र तापू लागले आहे. तेथे आम आदमी पक्षाचे (आप) सरकार २०१३ सालापासून आहे. अर्थात २०१३ साली अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखाली सत्तेत आलेले सरकार ४९ दिवसच टिकले. कारण मुळातच ते अल्पमतातील सरकार होते. मात्र २०१५ आणि २०२० साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत 'आप'ने ७० पैकी अनुक्रमे ६७ आणि ६२ जागा जिंकून एकहाती सत्ता मिळविली. दरम्यान पंजाब विधानसभा निवडणुकीत २०२२ देखील 'आप'ने सत्ता मिळविली; ती देखील ११७ पैकी ९२ जागांवर विजय मिळवत. दिल्ली आणि पंजाब ही दोन राज्ये वगळता देशभरात अन्यत्र 'आप'ची कामगिरी सुमार राहिली आहे. साहजिकच दिल्लीची निवडणूक 'आप'साठी केवळ प्रतिष्ठेचीच नाही तर अस्तित्वाची लढाई ठरणार आहे.

गेल्या वर्षी २०२४ साली झालेल्या लोकसभा निवडणुकीत 'आप'ने दिल्लीत काँग्रेसशी आघाडी केली होती. मात्र दिल्लीतील सर्वच्या सर्व सात जागा भाजपाने जिंकल्या आणि 'आप'-काँग्रेसचा मुखभंग झाला. जेथे भाजपा उमेदवारांनी 'आप'च्या उमेदवारांना पराभूत केले तेथे विजयी उमेदवारांचे मताधिक्य ७५ हजार ते दोन लाखांच्या दरम्यान होते. तेव्हा भाजपाने 'आप'च्या उमेदवारांना दिलेली मात निर्विवाद होती यात शंका नाही. काँग्रेसशी आघाडी करूनही 'आप'चा काही लाभ झाला नाही. आता विधानसभा निवडणुकांच्या उंबरठ्यावर 'आप'ने काँग्रेसला 'इंडिया' आघाडीतूनच बाहेरचा रस्ता दाखविण्याची मागणी केली आहे. 'इंडिया' आघाडीचे नेतृत्व काँग्रेसऐवजी ममता बॅनर्जी यांच्याकडे द्यावे असा सूर आघाडीतील घटक पक्षांकडून निघत असताना 'आप'ने त्यापुढे जाऊन काँग्रेसला आघाडीतून बाहेर काढावे अशी मागणी केली आहे. पण यात अन्य घटक पक्षांप्रमाणे काँग्रेसवर अविश्वास कमी आणि काँग्रेसपासून 'आप'ला मिळत असलेल्या आव्हानाची धास्ती जास्त आहे. 'आप' पक्ष या मागणीपर्यंत का आला हे पाहणे म्हणूनच महत्त्वाचे आहे.

२०१३ ते २०१८ दरम्यान दिल्लीत काँग्रेसचे सरकार होते. मात्र नंतर ती जागा 'आप'ने व्यापली आणि नंतर तेथील लढत प्रामुख्याने भाजपा आणि 'आप' यांच्यातच होऊ लागली. गुजरात विधानसभा निवडणुकीत (२०२२) 'आप'ने काँग्रेसच्या जनाधाराला खिंडार पाडले होते. तेथे 'आप'ची सत्ता आली नाही हे खरे पण काँग्रेसला तिहेरी लढतीचे चटके बसले. पंजाबात तेच घडले. आपल्या जनाधाराचा हिस्सा 'आप'कडून काबीज होत असल्याची जाणीव बहुधा काँग्रेस नेतृत्वाला झाली असावी. त्यामुळेच दिल्लीत काँग्रेसने 'आप' सरकारला लक्ष्य करण्यास सुरुवात केली आहे आणि भाजपाशी लढत देण्यास 'आप' नव्हे तर काँग्रेस सक्षम आहे असा संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे. तो 'आप'च्या जिव्हारी लागणे स्वाभाविक आहे, कारण भाजपाबरोबरच आता काँग्रेसही 'आप' सरकारच्या कारभाराची लक्तरे वेशीवर टांगणार. काँग्रेसने जारी केलेल्या बारा कलमी श्वेतपत्रिकेतून भाजपावर टीका करण्यात आली असली तरी 'आप'वर दोषारोप करणे हे त्या श्वेतपत्रिकेचे खरे प्रयोजन आहे, हे लपलेले नाही. काँग्रेसचे नेते संदीप दीक्षित यांनी 'आप' सरकारच्या प्रस्तावित कल्याणकारी योजनांविषयी तक्रार केल्यांनतर नायब राज्यपाल विनय कुमार सक्सेना यांनी चौकशीचा आदेश दिला. तेव्हा 'आप'ला रोखण्यासाठी भाजपा आणि काँग्रेस एकत्र आले आहेत असा हास्यास्पद आरोप करण्यात अरविंद केजरीवाल यांनी धन्यता मानली असली तरी विरोधकांनी घेतलेल्या आक्षेपांवर त्यांनी खुलासा केला नाही. प्रस्तावित कल्याणकारी योजना अद्याप अस्तित्वात आलेल्या नाहीत. तरीही 'आप'च्या अतिउत्साही कार्यकर्त्यांनी नागरिकांकडून 'माहिती' गोळा करण्यास सुरुवात केली एवढेच नव्हे तर लाभार्थींची नोंदणीही सुरू केली; तेव्हा दिल्ली प्रशासनातील संबंधित विभागांनी योजना कार्यान्वित होण्यापूर्वीच्या नोंदणीशी आपला काहीएक संबंध नसल्याचा खुलासा केला.

काँग्रेसने जारी केलेल्या श्वेतपत्रिकेत 'आप' सरकारच्या कारभाराचे अक्षरशः वाभाडे काढले आहेत. दिल्लीतील अनेक समस्या कशा जटिल झाल्या आहेत आणि 'आप' सरकार त्यावर तोडगा काढण्यात कसे अयशस्वी ठरले आहे याचा पाढाच काँग्रेसने वाचला आहे. अस्तित्वात नसलेल्या योजनांबद्दल जनतेची दिशाभूल केली जात असल्याची तक्रार दिल्ली युवक काँग्रेसने पोलिसांत थेट केजरीवाल यांच्या विरोधातच नोंदविली आहे. त्यामुळे केजरीवाल आणखीच बिथरले आणि त्यांनी काँग्रेसला लक्ष्य केले. पण भाजपा किंवा काँग्रेस यांच्यावर खापर फोडून 'आप' आता सहानुभूती मिळवू शकणार नाही. याचे कारण दिल्लीत गेली दहा वर्षे 'आप' सरकार सत्तेत आहे. आपला कारभार हेच खरे तर 'आप'चे निवडणुकांना सामोरे जातानाचे भांडवल हवे. त्याऐवजी भाजपावर टीका करून किंवा काँग्रेसला लक्ष्य करून 'आप' आपल्या हतबलतेचेच दर्शन घडवीत आहे. याचे मुख्य कारण म्हणजे गेल्या काही काळात 'आप' सरकारमधील गैरव्यवहारांची चव्हाट्यावर आलेली अनेक प्रकरणे. मद्यविक्री धोरण गैरव्यवहार प्रकरणी केजरीवाल यांच्यासह त्यांच्या मंत्रिमंडळातील काहींना तुरुंगवास घडला आहे. आताही ते जामिनावर बाहेर आहेत. मध्यंतरी केजरीवाल यांनी मुख्यमंत्रिपद सोडले आणि आतिशी यांना ते पद दिले. मात्र म्हणून केजरीवाल, सिसोदिया इत्यादींची डागाळलेली प्रतिमा धुऊन निघेल असे नाही. स्वाती मालिवाल यांना मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी, मुख्यमंत्र्यांच्या सचिवांकडून झालेल्या मारहाणीनंतर केजरीवाल किंवा 'आप'च्या नेत्यांनी मालिवाल यांना धीर देण्याऐवजी त्यांचीच बदनामी कशी होईल या स्वरूपाची विधाने केली होती. आता मालिवाल दिल्लीतील अनेक भागांत फिरून 'आप' सरकारच्या योजनांचे फसवे दावे चव्हाट्यावर आणत आहेत.

नायब राज्यपाल आपल्या प्रत्येक निर्णयात हस्तक्षेप करतात इत्यादी आरोप करून केजरीवाल यांनी सहानुभूती मिळविली. मात्र आता 'आप' सरकारमधील अनेक गैरव्यवहार उघडकीस आल्याने 'आप'ची कोंडी झाली आहे. स्वतःस आम आदमी म्हणायचे आणि मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानाच्या नूतनीकरणावर कोट्यवधी रुपये खर्च करायचे या दुट्टपीपणाशी ना नायब राज्यपालांचा संबंध ना भाजपाचा ना काँग्रेसचा. 'आप'ची स्थापना झाली तेव्हा आपला पक्ष प्रस्थापित पक्षापेक्षा स्वच्छ आणि सचोटीने काम करणारा असेल अशी ग्वाही केजरीवाल आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी दिली होती. दशकभरानंतर 'आप'च्या कलंकित नेत्यांनी तो दावा फोल ठरविला आहे. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत मतदार 'आप'कडून गेल्या दहा वर्षांचा हिशेब मागतील आणि 'तो समाधानकारक देता आला नाही तर निवडणुकीत 'आप'ला त्याची किंमत पराभवाच्या रूपाने मोजावी लागेल. काँग्रेस आणि भाजपाविरोधात थयथयाट करून आपला नाकर्तेपणा 'आप' लपवू शकणार नाही!

९८२२८२८८१९

## वेध

गिरीश शेरेकर

# महाराष्ट्र सौर ऊर्जा निर्मितीत आघाडीवर

पारंपरागत पद्धतीने मिळणाऱ्या विजेला सौर ऊर्जेचा सक्षम पर्याय म्हणून नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र व देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील राज्य सरकारने पुढे आणले आहे. परिणामस्वरूप सौर ऊर्जेच्या निर्मितीत समाधानकारक वाढ झाली आहे. २०१४ पर्यंत भारनियमनाने त्रस्त असलेल्या महाराष्ट्रात वीज उपलब्धतेचे इतके चांगले दिवस येतील, याची कल्पना देखील कोणी केली नव्हती. पण, देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने ते करून दाखविले. याच काळात वीजदर वाढल्याची ओरड सातत्याने झाली. नैसर्गिक न्यायाने ती होणारच असली तरी, आता हे दर कमी होण्याचे सुतोवाच झाले आहे. कारण, कोळशासह अन्य मार्गाने जी वीज निर्मिती होते, त्यावरचा भार सौर ऊर्जेचा पर्याय मिळाल्याने कमी झाला आहे. त्यामुळेच पुढच्या तीन वर्षांत विजेचे दर कमी होतील, हे मुख्यमंत्री फडणवीस यांनी छातीठोकपणे सांगितले आहे. या संदर्भातले त्यांनी केलेले नियोजन किती परफेक्ट असेल याची जाणीव होते. गेल्या अडीच वर्षांपासून ते ऊर्जा खाते सांभाळत आहे. नव्या सरकारमध्ये हे खाते त्यांनी स्वत:कडेच ठेवले आहे. याचाच अर्थ असा की विजेचे धोरण त्यांच्या डोक्यात सुस्पष्ट आहे. सौर ऊर्जा वापरण्याचे पर्यावरणीय फायदेपण भरपूर आहेत.

केंद्र सरकारच्या मदतीने महाराष्ट्राने सौर ऊर्जेत चांगलीच आघाडी घेतली आहे. राज्यभरात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत ठिकठिकाणी १६ हजार मेगावॅट क्षमतेचे वीजनिर्मिती प्रकल्प उभारण्यात येत आहे. त्यातून शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध होईल. त्याचाच एक भाग म्हणून वाशीम जिल्ह्यातील उंबर्डा येथे ४ मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प नुकताच सुरू झाला. या प्रकल्पामुळे १७११ शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा होणार आहे. याचप्रमाणे धाराशीव जिल्ह्यातील नारंगवाडी येथे प्रकल्प सुरू झाला. एकूण ८४५ शेतकरी या प्रकल्पाचे लाभार्थी आहेत. राज्यातील शेतकऱ्यांना कृषी पंपांसाठी १६ हजार मेगावॅट वीज लागते. या पंपांना वीज पुरवठा करणारे सर्व कृषी फीडर सौरऊर्जेवर चालविण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना सुरू केली आहे. पहिल्या पाच प्रकल्पांचे लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑक्टोबर महिन्यात झाले. १५, ७०८ मेगावॅट क्षमतेचे सौर वीजनिर्मिती प्रकल्प उभारण्यासाठी कार्यादेश देण्यात आले आहेत. त्यापैकी ६६९ मेगावॅट क्षमता कार्यान्वित झाली आहे. त्यामधून १ लाख ३० हजार ४८६ शेतकऱ्यांना दिवसा आठ तास थ्री फेज वीज पुरवठा सुरू करण्यात आला आहे. उर्वरित उद्दिष्ट लवकरच पूर्ण होणार आहे. २०१५ पासून २०२३ पर्यंत विविध योजनांत १ लाख ८० हजार सौर पंप बसविण्यात आले. मार्च २०२४ पासून आतापर्यंत फक्त आठ महिन्यांच्या कालावधीत राज्यात १ लाख ५८ हजार सौर पंप बसविण्यात आले आहेत. संपूर्ण देशात महाराष्ट्राने सर्वाधिक सौर पंप बसविण्याचा उच्चांक गाठला आहे.

सौर कृषी पंपाप्रमाणेच छतावर सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पाचे चांगले काम राज्यात झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तीनशे युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांना मोफत वीज मिळावी आणि अतिरिक्त वीज विकून उत्पन्नही मिळावे यासाठी प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना सुरू केली आहे. या योजनेत वीज ग्राहकांना थेट लाभ होत असल्याने सदर योजनेची प्राधान्याने अंमलबजावणी होत आहे. छतावरील सौर ऊर्जा निर्मितीच्या बाबतीत किती घरांवर प्रकल्प बसविले व त्यातून वीजनिर्मिती क्षमता किती झाली, याबाबतीत केंद्र सरकारकडून प्रत्येक राज्याच्या कामगिरीचे मूल्यमापन केले जाते. महाराष्ट्राची दरवर्षी त्यात लक्षवेधी सुधारणा होत असून २०२३-२४ या आर्थिक वर्षात केंद्र सरकारकडून १३७ कोटी रुपये प्रोत्साहनपर रक्कम मिळणे अपेक्षित आहे. राज्यामध्ये आतापर्यंत २ लाख ३७ हजार ६५६ वीज ग्राहकांनी छतावरील सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविले आहे. त्यांची एकूण क्षमता २७३८ मेगावॅट आहे. यामध्ये प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या ८१ हजार ९३८ ग्राहकांचा व त्यांच्या एकूण ३२३ मेगावॅट क्षमतेचा समावेश आहे. या ग्राहकांना ६४७ कोटी रुपयांचे अनुदान मंजूर झाले आहे. या सर्व ग्राहकांचे अनुभव खूपच चांगले आहे. हजारो रुपयांच्या वीज बिलातून त्यांची सुटका झाली आहे. हे अनुभव संपर्कातल्या मंडळींना सांगितले जात असल्याने छतावर सौर ऊर्जा प्रकल्प लावण्याची स्पर्धाच सुरू झाली आहे. सरकारकडून अनुदान मिळत असल्याने दिवसेंदिवस संख्या वाढत आहे. तो दिवस दूर नाही की, बहुतांश घरांवर सौर ऊर्जेचे प्रकल्प दिसतील. इतका चांगला प्रतिसाद असल्यानेच महाराष्ट्राने आघाडी घेतली आहे. सर्वांच्या सहकार्यातून ती कायम राहावी, हीच अपेक्षा आहे.

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

# आरती तुकाराम, स्वामी सद्गुरु धामा!

प्रा. दिलीप जोशी

जगद्गुरू तुकाराम महाराजांची 'आरती तुकारामा' ही आरती देखील वारकरी संप्रदायाचा प्राण आहे. अख्ख्या महाराष्ट्रात आर्त भावाने ही आरती दररोज हरिपाठानंतर आणि हरीकीर्तनानंतर म्हटली जाते.

संत तुकाराम महाराजांचे शिष्य श्री. रामेश्वर भट्ट यांनी ही अभंग आरती रचिली आहे.

इतरांच्या संतांच्या रचनेत आणि शिष्य श्री. रामेश्वर भट्टांच्या रचनेत जरा फरक आहे. कारण रामेश्वर भट्ट हे तेच धर्ममार्तंड आहेत ज्यांनी आधी संत तुकाराम महाराजांना खूप त्रास दिला, गाथा इंद्रायणीत बुडविण्यासाठी बाध्य केले. त्यानंतर जेव्हा संत तुकाराम महाराजांची सर्व अनुभूती आल्यानंतर महाराजांचे श्रेष्ठत्व अनुभवास आले. त्यानंतर त्यांनी संपूर्ण समर्पण जगद्गुरू तुकाराम महाराजांच्या चरणी मस्तक ठेवून केले. उपेक्षा, अवमान केल्यावर खरी ओळख पटली आणि त्यायोगे मनात आर्त प्रकटून आरती तयार झाली. म्हणून त्यांची रचना म्हणजे अनुभवाचे बोल असल्याने रचनेत फरक म्हटले.


आरतीची सुरुवात त्यांनी गोड केली आहे.

*''आरती तुकारामा, स्वामी सद्गुरू धामा।''*

आरती म्हणजे सर्वभावे रति. रति म्हणजे संसार पण आरती म्हणजे भगवंताशी तद्रूप होणे, तन्मय होणे. त्या अर्थाने सुरुवात आरती या शब्दाने केली. दुसरा शब्द तुकारामा आहे.

महाराजांचे तुकाराम हे नाव देखील पूर्वसंचितानुसार ठेवले असावे. भगवान श्रीरामाच्या जीवनाला तुकलेले म्हणून तुकाराम. तुक म्हणजे वजन किंवा तुला. तुलनेने किंवा ज्ञानवजनाने भगवान रामाच्या समकक्षेत असल्याने तुकाराम. श्रीरामचंद्र भगवंताच्या सद्गुणांनी व्याप्त होऊन रममान होणारे म्हणून तुकाराम. म्हणून तर म्हणतात ''तुकी तुकला तुकाराम.''

रामेश्वर भट्ट का आरती करतात? कारण ते स्वामी आहेत, ते सद्गुरू आहेत आणि निजधामी आहेत.



स्वामी म्हणजे मालक. संत तुकोबाराय मनाचे मालक, इंद्रियाचे मालक होते म्हणजे त्यांचा ताबा मनावर, इंद्रियांवर होता इतकेच काय त्यांची मालकी नियतीच्या फेऱ्यावरही होती म्हणून ते स्वामी.

सद्गुरू म्हणजे अज्ञानाचा नाश करणारे, ज्ञानाचा प्रकाश देणारे आणि देवादिकांकडून पुजिले जाणारे. स्वामी सद्गुरू म्हणजे इंद्रियाचे मालक असणारे ज्ञानी. देवत्वाचा मार्ग देणारे.

धाम म्हणजे ईश्वराचे निवासस्थान. सद्गुरू म्हणजे भगवंतांचे स्थानच म्हणून ते स्वामी, सद्गुरू, धामा आहेत. पुढे रामेश्वर भट्ट म्हणतात,

*''सच्चिदानंद मूर्ती, पाय दाखवी आम्हा!''*

सच्चिदानंद म्हणजे परब्रह्म परमात्मा. तो कसा आहे? तो सत् चिद् आनंद स्वरूप म्हणजे तो निर्गुण, निराकार आहे. म्हणजे तो अमूर्त आहे.

संत तुकाराम महाराजांचा देह हा सामान्य देह नाही. त्यामुळे तो निर्गुण, निराकार, अमूर्त परमात्मा भूतलावर सगुण साकार, मूर्त रूप घेऊन संत तुकाराम महाराज रूपाने प्रकट झाला. म्हणून गोड शब्द रामेश्वर भट्टांनी वापरला तो म्हणजे 'सच्चिदानंद मूर्ती' आहे.

खरं सांगायचे तर जो सच्चिदानंद आणि अमूर्त असतो तो म्हणजे परब्रह्म परमात्मा. जो सच्चिदानंद नाही आणि मूर्त आहे तो म्हणजे आपण सामान्य जीव.

जे सच्चिदानंद असून मूर्त आहेत ते म्हणजे संत असतात. म्हणून तुकाराम महाराज 'सच्चिदानंद मूर्ती' आहेत.

'पाय दाखवी आम्हा'' हा व्यापक शब्द आहे. जगात पहावे, दर्शन घ्यावे असे पायच नाहीत. असतील तर ते पाहण्यासाठी आपला अधिकार आणि भाग्य नाही. म्हणून तर रामेश्वर भट्ट संत तुकाराम महाराजांना पाय दाखवा ही विनंती करतात. कारण पाय सहज दिसतील असा माझा अधिकार नाही.

दुसरे म्हणजे अजूनही खेड्यापाड्यात मोठ्या माणसांचे दर्शन घ्यायचे असेल तर 'पाय दाखवा' म्हणायची पद्धत आहे.

अमूर्त परब्रह्म मूर्त होऊन आले म्हणून सच्चिदानंद मूर्ती पाय दाखवी आम्हा म्हटले आहे.

*राघवे सागरात, पाषाण तारिले।*
*तैसे तुकोबाचे अभंग रक्षिले!*

भगवान श्रीरामचंद्रांनी सेतू बनविताना दगड पाण्यावर तरंगले होते. उपमेयाला तुल्यबळ उपमा देणे गरजेचे म्हणून हाच दृष्टांत रामेश्वर भट्टांनी दिला. ही उपमा देताना इंद्रायणीच्या डोहात बुडविलेले अभंग तरण्याचे सामर्थ्य श्रीरामचंद्र भगवंताप्रमाणेच संत तुकाराम महाराजांमध्ये होते. एका अभंगात रामेश्वर भट्टच म्हणतात की, ''तुका विष्णु नाही दुजा.'' म्हणजे भगवान राम आणि जगद्गुरू तुकाराम हे वेगळे नाहीच.

अभंग तरणे म्हणजे जड जीवांना भवसागरात बुडण्यावाचून तारणे होय.

*तुकीता तुलनेशी ब्रह्म तुकाशी आले।*
*म्हणोनी रामेश्वरी, चरणी मस्तक ठेविले!*

तुकीता तुलनेशी म्हणजे पारड्यात वजन करणे, तुला करणे, तुलना करणे. तुला कोणाशी? तर एका पारड्यात ब्रह्म ठेवले आणि दुसऱ्या पारड्यात जगद्गुरू तुकाराम महाराजांना ठेवले. तर पारडे बरोबरीत समतुल्य आले. हा अधिकार संत तुकाराम महाराजांचा आहे. म्हणून मी त्यांच्या चरणावर मस्तक ठेवले आहे.

हा आरतीचा अभंग ज्या रामेश्वर भट्टांनी लिहिला त्यांनी महाराजांना भयंकर ताप दिला होता, पण अनुभूती येताच ते त्यांचे दास झाले.

संत तुकाराम महाराजांच्या चौदा टाळकऱ्यांची नावे उपलब्ध आहेत त्यात रामेश्वर भट्टांचे नाव अग्रक्रमावर आहे. ते रामेश्वर भट्ट नितांत श्रद्धेने स्पष्ट सांगतात ''तुकाराम तुकाराम, नाम घेता कापे यम।''

म्हणून त्यांची ही आरती सार्थ शब्दात त्यांनी लिहिली.

९८२२२६२७३५

## रोहित-विराटला टाटा बाय बाय





'आम्ही जिंकण्याचे मार्ग शोधण्यात कमी पडलो : रोहित शर्मा' ही बातमी वाचून हसावे की रडावे तेच कळले नाही. न्यूझीलंड दौऱ्यातील मानहानिकारक पराभवानंतर आता ऑस्ट्रेलिया दौऱ्यावरील भारतीय संघ पराभवाच्या खाईत गेला आहे. प्रत्येक सामन्यानंतर कर्णधार म्हणून रोहित शर्मा पत्रकार परिषदेत करत असलेली मखलाशीही संतापजनक आहे. असे झाले म्हणून आम्ही हरलो हे सांगायला कर्णधार कशाला हवा? थोडेफार क्रिकेट समजणाऱ्या सर्वांनाच ते कळते. गेल्या बऱ्याच महिन्यांपासून रोहित शर्मा स्वतः आणि विराट कोहली या दोघांचाही सूर कमालीचा हरपलेला आहे. एखादा नवखा खेळाडू खेळावा तसे ते दोघेही खेळपट्टीवर बाद होण्यासाठी धडपडत असल्यासारखे 'खेळत' असतात. त्यांना आणखी किती वर्षे खेळवणार आहे बीसीसीआय? नवीन खेळाडूंना वाव देण्यासाठी, आता काही वरिष्ठ खेळाडूंना, त्यांच्या पूर्वपुण्याईवर, सतत खेळवत ठेवणे हे उदयोन्मुख खेळाडूंवर अन्याय करण्यासारखे आहे. तेव्हा या जोडगोळीला 'टाटा-बायबाय' करण्याची वेळ आली आहे आणि त्याची गरजही आहे.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

## वाचक पत्रे

### शेतकऱ्यांची चिंता कोण करेल?

आधीच महागाईने त्रस्त झालेल्या शेतकऱ्याना नव्या वर्षात वाढणाऱ्या खतांच्या किमतीला सामोरे जावे लागणार आहे. अवकाळी पाऊस, ढगाळ वातावरण, पूर, पीकविमा, खराब शेतरस्ते, हवामान बदल यामुळे ते ग्रस्त आहेत. अशात शेतकऱ्यांना आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. शेतकऱ्यांच्या उत्पादित मालाला बाजारभाव नाही, उभ्या पिकांवर शेतकरी नांगर फिरवतो आहे. त्यातच आता वाढणाऱ्या रासायनिक खतांच्या किमतीमुळे शेतकऱ्यांच्या अडचणीत भर पडणार आहे. खरीप हंगामात झालेले नुकसान कसे भरून काढावे, हा प्रश्न शेतकऱ्याना सतावत असतानाच नवीन वर्षात रासायनिक खतांचे भाव दहा ते वीस टक्क्यांनी वाढणार असल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत. विविध रासायनिक खत निर्मितीकरिता फोस्फेट रॉक, फोस्फोरिक ॲसिड, अमोनिया, नायट्रोजन, पोटॅश, सल्फर, झिंकसारख्या कच्च्या मूलभूत घटकांच्या किमती आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत वाढल्याचे कारण खत कंपन्या सांगत आहेत. सरकारकडून खत कंपन्यांना यासाठी सबसिडी सुद्धा दिली जाते, त्याचप्रमाणे खत खरेदी करताना शेतकरी पाच ते अठरा टक्के जीएसटी सुद्धा भरतो. अलिकडे शेतकऱ्यांना मिळणाऱ्या सबसिडीचे प्रमाण कमी केले आहे. सदर दरवाढीचा फायदा कंपन्यांना होताना दिसतो. शेतकऱ्यांच्या या आर्थिक लूटमारीत सरकार सहभागी असल्याचे दिसून येते. मायबाप सरकारला विनंती आहे की फुकट आणि मोफत योजनांवर अंकुश लावून, शेतकऱ्यांच्या भल्याचा विचार करावा. खतांवरील जीएसटी कमी करून सबसिडी वाढविण्याचा विचार व्हावा तरच शेती तग धरेल अन्यथा शेतकरी आत्महत्यांचा आलेख वाढतच राहणार. पशुधन कमी झाल्याने शेतकऱ्यांकडे सेंद्रिय खतांचा पर्याय सुद्धा राहिला नाही, जैविक खत निर्मिती शेतकऱ्यांना परवडणारी नाही. शेतमजूर मिळत नाही, मिळाले तर मजुरी महाग आहे. अशा चक्रव्यूहात शेतकरी सापडला आहे, त्याला जिवंत ठेवा, हीच विनंती.

**प्रा. विलास डोईफोडे**/सावनेर

### नवीन वर्षातील नव्या आकांक्षा

आज नव्या वर्षाची सुरुवात होत असताना काही समस्या निर्माण झालेल्या दिसून येतात. आपण ज्या लोकशाहीवादी देशात राहतो तिथे सामान्य माणसाला अजूनही आपल्या अनेक गरजा पूर्ण करता आलेल्या नाहीत. परंतु लोकांमधला आशावाद प्रचंड भक्कम स्वरूपाचा दिसून येतो. लोकशाही कार्यपद्धती वापरून आणि तंत्रज्ञानाचा योग्य उपयोग करून आपल्यासाठी उपलब्ध असलेला काळ आपल्याला प्रबळ करेल याबद्दल जनमानसामध्ये मोठा आत्मविश्वास दिसून येतो. काळ कोणासाठी थांबत नाही. परंतु हातात असलेला काळ वाया जाऊ द्यायचा नाही, त्याचे संधीत रूपांतर करून काहीतरी घडवून दाखवायचे अशा शक्तीचे जागरण या वर्षांमध्ये होऊ शकते. एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीला म्हणजेच २००१ साली जन्माला आलेला या दशकातील युवक या एकविसाव्या शतकातील आपल्या वयाची पंचवीस वर्षे पूर्ण करेल. त्याच्यासाठी हा काळ सर्वाधिक संस्मरणीय ठरू शकतो. विसाव्या शतकात या देशातील समाजाने अनेक गोष्टी प्रदीर्घ काळ सहन केल्या त्या आता इतिहासजमा झाल्या आहेत. नव्या तंत्रज्ञानाने आता नवा इतिहास घडवायला सुरुवात केली आहे. एक गोष्ट मात्र लक्षात ठेवली पाहिजे की हे तंत्रज्ञान केवळ सुखासाठी नाही तर ते सर्वार्थाने सर्वांच्या सुरक्षिततेसाठी आहे. येणारा काळ आपल्याला सुखी करेलच हे सांगता येत नाही. पण त्याने सुरक्षित केले किंवा ठेवले तर ती तितकीच मोठी देणगी ठरू शकते. या सगळ्या आकांक्षासह नव्या वर्षाचे स्वागत होत आहे.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

## संक्षिप्त वृत्त



### सुशील विचारधाराच्या ढोर समाज वधु-वर मेळाव्यात ४०० जणांची विवाह नोंदणी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर -**

सुशील विचारधारा बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या कक्कय्या ढोर समाज वधुवर नोंदणी चारशेचा पल्ला गाठून ढोर समाजाच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी नोंद करण्यासारखा दिवस ठरला. संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला. वीरशैव ढोर समाजाचा वधू वर मेळावा पुष्प स्नेह लोन अंत्रोळीकर नगर येथे संपन्न झाला. या कार्यक्रमास कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा या राज्यासह महाराष्ट्रातील मुंबई, पुणे सातारा, सांगली, कोल्हापूर छत्रपती संभाजीनगर शहरी व ग्रामीण भागातील वधू-वर उपस्थित होते. यावेळी संस्थापक अध्यक्ष सच्चिदानंद व्हटकर यांनी आपल्या मनोगतात वधू-वरांनी नोकरीची अपेक्षा न करता उद्योग, शेती, व्यवसाय करणाऱ्या मुलाला, मुलीला प्राधान्य देण्यात यावे. सरकारी नोकरीची अपेक्षा ही वधूवरांच्या आई वडिलांनी थोडीशी कमी करावी असे प्रतिपादन केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संघटनेचे अध्यक्ष गंगाधर जोगधनकर, कार्याध्यक्ष ॲड केशव इंगळे, मनोज व्हटकर, उपाध्यक्ष अशोक सदाफुले, सचिव संजय जोगदनकर, खजिनदार राजेश कटकधोंड, आनंद व्हटकर, ब्रह्मानंद धडके, बाबुराव इंगळे सुनील होटकर गणेश कटकधोंड महिला अध्यक्ष संगीता जोगधनकर, रेखा व्हटकर, प्रभावती होटकर, छाया होटकर, प्रा.नूतन व्हटकर, नित्यानंद सोनकवडे, पद्मावती जोगदनकर यांची उपस्थिती होती. दिपक सोनवणे कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश कटकधोंड, ॲड केशव इंगळे अशोक सदाफुले, संगीता जोगधनकर यांनी केले. आभार अध्यक्ष गंगाधर जोगधनकर यांनी मांडले.

### कळंबा येथील स्वामी समर्थ भजनी मंडळाचा भजनाचा कार्यक्रम उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि ३१ डिसेंबर-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून ३१ डिसेंबर मंगळवारी कोल्हापूर कळंबा येथील श्री स्वामी समर्थ भजनी मंडळाने भजनाचा कार्यक्रम सादर केला.

महाप्रसादालयाच्या प्रांगनात सदरचा कार्यक्रम सादर केला, यामध्ये श्री स्वामी स्वामी समर्थांची गाणी, गणेश वंदना, भजन, कीर्तन,भारुडाचा कार्यक्रम सादर केले, यास स्वामी भक्तांनी भरभरून प्रतिसाद दिला. सरत्या वर्षाला निरोप व नववर्षाच्या स्वागतासाठी राज्यभरातून भक्तांनी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात एकच गर्दी केली होती. या प्रसंगी भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्वस्त भाऊ कापसे, पुरोहित अप्पू पुजारी, विश्वंभर पुजारी, बाळासाहेब पोळ, प्रवीण घाडगे, गोटू माने, निखील पाटील, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, नामा भोसले, कुमार सलबत्ते, सिद्धाराम कल्याणी, बाळासाहेब घाडगे, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, तानाजी पाटील, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, महांतेश स्वामी, धनंजय निंबाळकर, बसवराज क्यार, अनिल बिराजदार, एस के स्वामी, मल्लिनाथ कोगनुरे, शावरेप्पा माणकोजी, कल्याण देशमुख, विशाल घाडगे, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# पुण्याच्या आरोपीचा रुईच्या म्हसोबा यात्रेत गोळीबार?

**पोलिसांकडून मात्र नकार**

**जामीनावर असलेल्या आरोपीचा दहशत माजवण्याचा प्रयत्न**





**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. ३१ डिसेंबर-**

पुण्यातील खूनाच्या गुन्ह्यांमध्ये जामीनावर सुटून आलेल्या आरोपीने भीमा नदीच्या काठावर असलेल्या रूई म्हसोबा येथील यात्रेमध्ये मागील भांडणाचा राग मनात धरून वडापाव, भजी विक्रेत्याला आपल्या साथीदारांसह लोखंडी रॉड, लाकडी दांडक्याने मारहाण करीत असताना भांडणे सोडवण्यासाठी आलेल्या लोकांवर आपल्या जवळ असलेल्या बंदुकीने पायावर व हवेत तीन गोळ्या मारुन गोळीबार करुन दहशत माजवून पलायन केल्याची घटना मंगळवार दि. ३१ रोजी सकाळी ११ वाजणेचे सुमारास घडल्याने यात्रेसाठी आलेल्या यात्रेकरू व नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. माढा तालुक्यातील कोंढार भागात प्रसिद्ध देवस्थान असलेल्या रूई येथील म्हसोबा देवस्थान येथे आज मंगळवार निमित्त यात्रा असते या यात्रेसाठी हजारो भक्त येत असतात. मंगळवारी सकाळी १०.३० चे सुमारास संशयित आरोपी आरमान अल्लाउद्दीन शेख (रा. रुई ता.माढा)हा आपल्या एक साथिदारासह मंदिराच्या बाजूला वडापाव,भजी व भेळ विक्रेता असलेल्या बशीर मौला मुलानी (वय ३०, रा. रुई) यास भजी बनवत असताना दोघांचे वडीलामध्ये चार महिन्यापूर्वी झालेल्या भांडणाचा राग मनात धरून बशीर मुलानीच्या डोक्यात रॉड मारला व त्याचे साथीदाराने लाकडी दांडक्याने मारहाण करीत होते. मारहाण सुरु असताना यात्रेच्या नियोजनातील नागरिक आणि तरूणांनी सोडवा सोडवी करताना संशयित आरोपी अरमान शेख याने कंबरेला असलेले गावठी पिस्तूल काढून हवेत फायरिंग केले. भांडण सोडविण्यासाठी आलेल्या लोकांचे दिशेने जमीनीवर दोन ते तीन फायरिंग केले. यामध्ये दुर्दैवाने कोणी जखमी झाले नाही. मात्र, यात्रेसाठी आलेले भाविकांची भीतीपुटी धांदर उडून पळापळ चालू झाली होती. या घटनेचे फक्त बघतात तालुक्यात चर्चा झाली असून या फायरिंगच्या आवाजाने भाविकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाल्याने अनेक भाविकांनी देवाच्या दर्शनाला जाण्याचे आज टाळले. जखमी बशीर मौला मुलानी हे टेंभुर्णीतील खाजगी हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असून या घटनेची टेंभुर्णी पोलीस ठाण्यामध्ये फिर्याद जावेद बाळू काझी (वय ३८, रा. रूई)यांनी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात फिरत दिली असून या फिर्यादीमध्ये म्हटले आहे की या ठिकाणी गोळीबार झाला नाह. मात्र. ज्या ठिकाणी भांडणे झाले त्या ठिकाणी एक खाली पडलेले गोळी मिळून आले असून व झटापटीत त्याच्याजवळ कमरेला असलेला गावठी पिस्तूल खाली पडले व त्यातील गोळी जमिनीवर पडली अशी फिर्याद टेंभुर्णी पोलीस मध्ये दाखल झाले असून पुढील तपास टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली टेंभुर्णी पोलीस स्टेशनच्या पीएसआय स्वाती सुरवसे व पोलीस कॉन्स्टेबल सरडे तपास करीत आहेत. घटनास्थळी टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांनी भेट दिली असून पुढील तपास आरोपीचा शोध घेण्यासाठी एक पथक नेमले असल्याचे सांगितले आज ३१ डिसेंबर असल्याने व उद्या नवीन वर्ष सुरुवात असल्याने या घटनेची गंभीर दखल घेऊन टेंभुर्णी पोलीस स्टेशन ने कुठलीही कायदा व सुव्यवस्था बिघडू नये म्हणून कडक बंदोबस्त ठेवला आहे वरील दिलेल्या फिरादीवरून टेंभुर्णी पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल झाला आहे.



## सैफुल, कोर्ट कॉलनी परिसरात रस्त्यावरील अतिक्रमण हटविले

**महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाची कारवाई**

**हातगाड्यांसह इतर साहित्य केले जप्त**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**

महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने शहरातील छत्रपती संभाजी महाराज तलाव (कंबर तलाव) ते सैफुल पर्यंत आणि संत रोहिदास चौक, कोर्ट कॉलनी येथील रस्त्यावरील हात गाड्यांचे अतिक्रमण काढण्यात आले. या मोहिमेत हातगाड्यांसह भाजीपाला फळे , लोखंडी काटे व इतर साहित्य जप्त करण्यात आले.

महापालिका आयुक्त शितल तेली -उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त तैमूर मुलाणी आणि सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर शहरात रस्त्यावर तसेच फुटपाथवर रहदारीस अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत आज छत्रपती संभाजी महाराज तलाव (कंबर तलाव) ते सैफुलपर्यंत रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्यात आले. या मोहिमेत ५ हात गाड्या , स्पीकर, लोखंडी टेबलइतर व इतर साहित्य जप्त करण्यात आले. दुपारच्या सत्रात संत रोहिदास चौक, कोर्ट कॉलनी रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यात आले. येथील भाजीपाला फळे , लोखंडी काटे व स्पीकर, व इतर साहित्य जप्त करण्यात आले. पोलिस बंदोबस्तात जेसीबीच्या सहाय्याने ही करवाई करण्यात आली. या मोहिमेत महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे , मुर्तुजा शहापुरे, सुफियान पठाण आदींसह पोलीस कर्मचारी उपस्थित होते. शहरातील नागरिक व व्यापाऱ्यांनी रस्त्यावर तसेच फुटपाथवर अतिक्रमण आढळून आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख डोंगरे यांनी दिला आहे.

## गो ग्रीन सेवेचा पर्याय निवडून वीजबिलात एकरकमी १२० रुपये सूट

**महावितरणची ग्राहकांना भेट**

**मुंबई, दि. ३१ डिसेंबर-**

नूतन वर्षाची भेट म्हणून गो ग्रीन सेवेचा पर्याय निवडल्यानंतर तत्काळ वीज बिलात एकरकमी १२० रुपये सूट देण्याची घोषणा महावितरणने केली आहे.

महावितरणकडून कागद वाचवा, पर्यावरण वाचवा या संकल्पनेनुसार गो-ग्रीन सेवा राबविण्यात येत आहे. त्यानुसार यापूर्वी या योजनेअंतर्गत ग्राहकांना मासिक वीज बिलात १० रुपये सूट देण्यात येते. मात्र आता यापुढे पहिल्याच बिलात पुढील बारा महिन्यासाठी तत्काळ १२० रूपये एकरकमी सवलत मिळणार आहे.

गो ग्रीन सेवेचा पर्याय निवडणार् या ग्राहकांना म हावितरणकडून दरमहा छापील कागदी बिला ऐवजी ई - मेल द्वारे वीज बिल पाठविण्यात येते. शिवाय गो ग्रीन ग्राहकांना मासिक वीज बिलात १० रुपये सूट देण्यात येते. महावितरणने गो ग्रीन ग्राहकांसाठी हा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. आता यापुढे गो ग्रीन सेवा निवडणाऱ्या ग्राहकांना दरमहा ऐवजी पहिल्याच महिन्यातील वीज बिलात एकरकमी १२० रुपये सूट देण्यात येणार आहे.

महावितरणच्या ३ कोटी लघुदाब ग्राहकांपैकी अद्यापपर्यंत ४ लाख ६२ हजार म्हणजेच १.१५ टक्के ग्राहकांनी गो ग्रीन सेवेचा पर्याय निवडला आहे. भविष्यात हे प्रमाण वाढावे, या हेतूने महावितरणने गो ग्रीन पर्याय निवडणाऱ्या ग्राहकांना वीजबिलात तत्काळपणे १२० रुपये एकरकमी सुट देण्याचा निर्णय घेतला आहे. सर्व नोंदणीकृत वीज ग्राहकांना महावितरणकडून गो ग्रीन सेवेचा पर्याय निवडण्यासाठी एसएमएस पाठविण्यात येणार आहे. गो ग्रीन सेवेचा पर्याय निवडल्यानंतर तत्काळ वीज बिलात एकरकमी १२० रुपये सूट देण्यात येणार आहे. त्यानंतर पुढील वर्षभर व सेवेसाठी नोंदणी रद्द करेपर्यंत नोंदणीकृत ई-मेलवर वीज बिल पाठविण्यात येणार असून त्यापुढे दरमहा वीज बिलात १० रुपये सूट देण्यात येणार आहे. ग्राहकांनी या योजनेचा लाभ घेण्याचे महावितरणने आवाहन केले आहे. गो ग्रीन सुविधेचा लाभ घेण्यासाठी महावितरणच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळाला भेट द्या व गो ग्रीन चा पर्याय निवडा.

## निधन वृत्त...

### मोहन तांदळे



**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**

जुळे सोलापूर ज्ञानेश्वर नगर येथील रहिवासी मोहन विनायकराव तांदळे यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. ते परिवहन खात्यात वाहक म्हणून कार्यरत होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले असा परिवार आहे.


### नावात बदल

माझे जुने नाव :
**रिंकल बलवानी**
नविन नाव :
**मानवी कुनाल नागदेव**
वरील दोन्ही नावे एकच असून यापुढे हे नाव कागदोपत्री ग्राह्य धरावे.
पत्ता : ब्लॉक नं. अे२३/२४, बसवेश्वर नगर, सोलापूर- ४१३००३


## ठोकळ प्रशालेचे जिल्हा स्काऊट व गाईड मेळाव्यामध्ये वर्चस्व

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**



सोलापूर जिल्हा स्काऊट्स आणि गाईड्स यांच्या वतीने चंद्रशेखर प्रशाला श्रीपुर येथे स्काऊट व गाईड जिल्हा मेळाव्यामध्ये इंदिरा ज्ञानवर्धिनी संचलित श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशालेतील २८ स्काऊट्स आणि २७ गाईड्स सहभागी झाले होते. या जिल्हा मेळाव्यामध्ये खरी कमाईत ठोकळ प्रशालेने प्रथम तसेच स्काऊट युनिटमध्ये जिल्ह्यात द्वितीय क्रमांकाची ढाल व प्रमाणपत्र मिळवले. जिल्हा उत्कृष्ट गाईडर म्हणून पूनम चव्हाण यांची निवड करण्यात आली. वैयक्तिक स्पर्धेत गाईड विभागात ठोकळ प्रशालेतील आदिती काटमोरे हिने वेशभूषा स्पर्धेत दुसरा, समीक्षा आमणे हिने पोस्ट कार्ड तयार करण्यात तृतीय, मेहबूब शेख याने धावण्याच्या स्पर्धेत प्रथम, प्रश्नमंजुषा स्पर्धेत समर्थ मानेने तृतीय, प्रज्वल टिंगरेने वक्तृत्व व वेशभूषा स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवला. तसेच सांघिक स्पर्धेत स्काऊट विभागात ठोकळप्रशालेने शोभायात्रेत प्रथम, घोषवादन प्रथम, शारीरिक प्रात्यक्षिक द्वितीय, तंबू सजावट द्वितीय, संचलन द्वितीय, बिनभांड्याचा स्वयंपाक तृतीय व सलग दोन वर्षे स्काऊटचे फिरते चषक पटकावून जिल्ह्याचे सर्वसाधारण विजेते पदाचे मानकरी ठरले. गाईड विभागात शोभायात्रा प्रथम क्रमांक, बिनभांड्याचा स्वयंपाक प्रथम, संचलन स्पर्धेत प्रथम, तंबू सजावट द्वितीय, शारीरिक प्रात्यक्षिक द्वितीय मिळवून सलग तीन वर्षे फिरते चषक कायम ठेवले.

संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा श्रीमती निर्मलाताई ठोकळ, संस्थेचे अध्यक्ष ॲड. विपीन ठोकळ, उपाध्यक्ष सचिन ठोकळ, सचिव भिकाजी गाजरे, संचालिका शिल्पाताई ठोकळ प्राचार्य डी. डी. गाजरे यांनी कौतुक व अभिनंदन केले. प्रशालेतील स्काऊट यांना स्काऊट मास्टर अर्जुन सुरवसे, पवार एस. पी. यांचे तर गाईड यांना गाईडर चव्हाण पी.एच. सौ कदम.पि.के व लंबे यु. एस. यांचे मार्गदर्शन लाभले.


### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोंकाना विशेषतः जि. सोलापूर ता. माळशिरस पैकी मौजे अकलूज महसूली, संग्रामनगर (अ) ग्रामपंचायत हद्दीतील व परिसरातील लोंकाना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

जि. सोलापूर ता. माळशिरस पैकी मौजे अकलूज महसूली, संग्रामनगर (अ) ग्रामपंचायत हद्दीतील बिगरशेती सर्व्हे नंबर १२१/३/प/१ क्षेत्रफळ ६.२६.00 (६२६-00 चौ.मी) चौरस मीटर ही जागा जगन्नाथ महादेव शिंदे यांचे खरेदी मालकीची असून सदरची जागा ही निर्वेध व निजोखमी असल्याचे आमचे अशिलास खात्री व भरवसा दिलेला असून तशी सदरची जागा आमचे अशिल खरेदी करणार असून तशी जगन्नाथ शिंदे यांचेशी खरेदीबाबत बोलणी चालू आहेत. तरी वर नोटीस मध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर कोणाचा कसलाही साठेखत, कर्जबोजा, लिज, बक्षीस, दान, गहाण, अगर अन्यप्रकारे हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून 0८ दिवसांच्या आत आमच्या खाली नमूद केलेल्या ऑफिसला कागदोपत्री पुराव्यानिशी शहानिशा करून दयावी. अन्यथा मुदतीत कोणाची कसलीही हरकत अगर लेखी तक्रार न आल्यास सदरची जागा आमचे अशिल खरेदी करतील मग त्यानंतर कोणाची कसलीही हरकत अगर लेखी तक्रार आल्यास ती वर नोटीस जागा व आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही यांची नोंद घ्यावी. कोणाची कसलीही फसंगत होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस देणे भाग पडत आहे.

कळावे. ही जाहीर नोटीस दिली असे ता. १०/१२/२०२४

**सही/-**
**श्री. दिलीप अभयकुमार फडे**
**आय.डी.बी.आय. बँकेशेजारी, स्तंभासमोर**
**महावीर पथ, अकलूज ४१३१०१**
**ता. माळशिरस, जि. सोलापूर**
**रजि. नं. महा/७०९/१९८१**



**बँक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda**
**नवी पेठ, शाखा - पहिला मजला, डांगेकर कॉम्प्लेक्स, नवी पेठ, सोलापूर - ४१३००१**

### परिशिष्ट - ६ मसुदा
### कर्जदाराला सल्ला देण्यासाठी सूचना दागिन्यांचा लिलाव

प्रति,
**सौ. स्वप्ना विठ्ठल चव्हाण,**
३१५६, मुरारजी पेठ, सोलापूर ता. उत्तर सोलापूर,
जि. सोलापूर - ४१३००७ मो. ७५१७५१३८४०

सर / मॅडम,

विषय : गोल्ड लोन अकौऊंट नंबर ९८६२०६००००१८७६

आम्ही वर नमूद केलेल्या तुमच्या कर्ज खात्याचा संदर्भास अनुसरुन दि. ०९/०८/२०२४ रोजी रु. २,२६,१२५.८३/- + व्याज आणि इतर खर्च एवढे रक्कमचे तुमच्या कडून थकबाकी येणे आहे.

आम्हाला खेद वाटतो की, आम्ही दिलेल्या सूचनांना तुमच्याकडून कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळत नाही.

आम्ही तुम्हाला उत्तरदायित्व आणि इतर शुल्काची परतफेड करण्याचा सल्ला देतो आणि दि. ०६/०१/२०२५ (तारीख) किंवा त्यापूर्वी तारण ठेवलेल्या सिक्युरिटीजची पूर्तता करा, असे न झाल्यास बँक सार्वजनिक लिलाव किंवा खाजगी करारामध्ये तुमच्या कडून येणे असलेल्या रक्कमेला तुमच्या सिक्युरिटीजची विक्री करण्यात येईल. बँकेच्या आवारात दिनांक ०७/०१/२०२५ रोजी सकाळी १० वाजता किंवा त्यानंतर कोणत्याही अन्य सोयीस्कर तारखेला बँकेच्या पूर्ण विवेकबुध्दीनुसार पुढील सूचना न देता. कृपया लक्षात घ्या की लिलावाची किंमत आणि या संदर्भातील शुल्क तुम्हाला द्यावे लागेल.

स्थळ - सोलापूर
दिनांक - ३०-१२-२०२४,
(मजकूरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा)
**शाखा व्यवस्थापक**
**बँक ऑफ बडोदा**



### जाहीर समन्स

**मा.उपनिबंधक, सहकारी संस्था, (परसेवा),**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को-ऑप, असोसिएशन लि. सोलापूर,**
११३ (अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर-४१३००२
**कृषीसेवा अर्बन को-ऑप बँक लि. कोळे - अर्जदार**
**ता. सांगोला जि. सोलापूर**
विरुध्द
(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद) - जाब देणार

| अ. क्र. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार नं. | जाब देणार यांचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ४८५/ २०२४-२५ | १,०१,०१३/- | १ | **श्री. विठ्ठल अण्णाप्पा शेळके** मु.पो. जुनोनी (काळुबाळुवाडी) ता. सांगोला, जि. सोलापूर |
| | | | २ | **श्री. अण्णाप्पा शंकर शेळके** मु.पो. जुनोनी (काळुबाळुवाडी) ता. सांगोला, जि. सोलापूर |

या कामी अर्जदार बँक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमुद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहोत.

**उपनिर्दिष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार शुक्रवार, दि. १७/०१/२०२५ रोजी दुपारी १२.00 वाजता कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.**

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पूर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. ३१/१२/२०२४ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

शिक्का

**सही/-**
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**



### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम सोलापूर जिल्हा व विशेषतः मौजे सोरेगांव, ता.उत्तर सोलापूर येथील लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन : डि. व सब डि. सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी मौजे सोरेगांव येथील जिरायत शेतजमीन याचा गट नं.१०३/१ब याचे एकूण सामाईक क्षेत्रफळ 0हे. ८0 आर. यांसी आकारणी 0१ रुपये ५0 पैसे यांसी चतुःसिमा पुर्वेसः गट नंबर १0३ पैकी शेतजमीन, दक्षिणेसः गट नं.१0२ ची शेतजमीन, पश्चिमेसः गट नंबर ९६ ची शेतजमीन व उत्तरेस गट नंबर १0३ ची शेतजमीन.

येणेप्रमाणे चतुः सिमेतील मिळकत आतील दगड, माती व मालकी वहिवाटीचे सर्व हक्कासह. सदरची मिळकतीतील निम्मा हिस्सा म्हणजे 0हे. ४0 आर. शेतजमीन ही श्री. विश्वनाथ रेवणय्या स्वामी, रा. सोलापूर यांची मालकी, कब्जे वहिवाटीची असून, सदर मिळकत त्यांनी आमचे अशिलांना कायम खुषखरेदी देण्याचे तोंडी बोलणी करुन इसाऱ्यापोटी रक्कम स्विकारलेली आहे, तसेच त्याप्रमाणे खरेदी देण्याचे ठरलेले आहे. तथापि, सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांना दिला आहे. त्यानुसार खरेदीखताचा व्यवहार आमचे अशिल लवकरच पूर्ण करणार आहेत.

तरी परंतू वर नमुद मिळकतीवर अन्य कोणाची जप्ती, टाच, दान, गहाण, बक्षीस, साठेखत, कब्जापावती, करार, अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून 0५ (पाच) दिवसात आमचे अशिलास खालील पत्त्यावर लेखी कागदोपत्रीनिशी हरकती नोंदवाव्यात. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल वर वर्णन केलेली मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे समजून खरेदी करतील, मग त्यानंतर कोणाचीही व कसल्याही प्रकारची हरकत, हक्क हितसंबंध असल्यास तो आमच्या अशिलावर व मिळकतीवर मुळीच बंधनकारक राहणार नाही.

ही जाहीर नोटीस दिली ता.३१/१२/२०२४

**सही/-**
**ॲड. श्री. डी.एम. होसमनी**
**ॲड. श्री. संतोष डी. होसमनी**
**बी.एससी., एलएल.बी., ॲडव्होकेटस्**
**चेंबर नं.२, तिसरा मजला, पिसपॅराडाईज अपार्टमेंट, सिध्देश्वर पेठ, जिल्हा व सत्र न्यायालय समोर, सोलापूर मो. ९९६000९२८९**



**बँक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda**
**नवी पेठ, शाखा पहिला मजला, डांगेकर कॉम्प्लेक्स, नवी पेठ, सोलापूर - ४१३००१**

### मागणी नोटीस U/S 13(2)
**सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ चे कलम १३(२) अनुसार नोटीस**

१. कर्जदाराचे, जामिनदार व कायदेशीर वारसदार यांचे नाव व पत्ता

| अ. क्र. | शाखा / कर्जदार / जामिनदार / गहाणदारांची नावे आणि पत्ते | मागणी नोटीसीची तारीख / अनुत्पादक मालमत्तेची तारीख | मंजूर कर्ज रक्कम | खाते क्रमांक / खात्याचा प्रकार / व्याज दर | येणे रक्कम | स्थावर / जंगम मालमत्तेचा तपशील |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | (कर्जदार) १) श्री. इस्माईल उमरसाब नदाफ (मयत) यांचे कायदेशीर वारसदार १) श्री जैनोद्दीन इस्माईल नफाद २) श्रीमती शरीफबी इस्माईल नदाफ ३) सौ. मुबिना अब्दुल नदाफ ४) सौ. रुबिना उल्लाद्दीन नदाफ रा. ११/१ ब, विष्णु अपार्टमेंट पाठीमागे, पश्चिम मंगळवार पेठ, सोलापूर (सह-अर्जदार) २) श्री. दाऊद उमरसाब नदाफ रा. ११/१ ब, विष्णु अपार्टमेंट पाठीमागे, पश्चिम मंगळवार पेठ, सोलापूर | ३१/१२/२०२४ / २८/०२/२०२४ | रु. ११,३०,०००/- | ९८६२०४०००००२६६ / ओ.डी. / ११.१५% | रु. ८,३४,८७६/- दि. ३०/१२/२०२४ पासूनचे व्याज + इतर खर्च; एकुण येणे रक्कम रु. ८,३४,८७६/- (रुपये आठ लाख चौतीस हजार आठशे श्याहत्तर) दि. ३०/१२/२०२४ पासूनचे व्याज, आणि इतर खर्च | सर्व्हे नं. ८९ प्लॉट नं. १७ एकुण क्षेत्रफळ १८० स्के.मी. ओपन जागा १८० स्के.मी. गाव - बाळे, ता. उत्तर सोलापूर, जिल्हा सोलापूर; चतुःसिमा पुढील प्रमाणे: पुर्वेस - प्लॉट नं. १६, पश्चिमेस - प्लॉट नं. १८, उत्तरेस - ओपन जागा, दक्षिणेस - रोड |

२) मुख्य कर्जदार (कर्जदार) याने / हिने / त्याच्या / त्यांच्या देणे रक्कमेची फरतफेड करण्यास कसूर केले असल्याने आम्ही यांचे / हिचे / त्याचे / त्यांचे खाते रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी जारी केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार निश्चित केले आहे. ३) आपणांस ही सूचना सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ नुसार जारी करण्यात आली आहे, कारण रजिस्टर्ड पोस्टाने आपणांस पाठविण्यात आलेली नोटीस पोहोच न होता परत आली, यानुसार आपणांस पुढीलप्रमाणे रक्कमेची व्याजासह भरणा करण्यास बजावण्यात येत आहे. ४) आपणांस देण्यात आलेली कर्जसुविधेची रक्कम वरीलप्रमाणे मालमत्ता / सिक्युरिटीजद्वारे सुरक्षित करण्यात आली आहे ५) आता या जाहीर सूचनेद्वारे आम्ही आपणांस या सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत येणे रक्कम, व्याज, भविष्यातील व्याज आणि प्रासंगिक खर्च आणि किंमत यांसह परत करण्याचा सल्ला देत आहोत. अन्यथा बँक सरफेसी ॲक्ट २००२ अनुसार कारवाई करतील. खाली सही करणार यांच्याकडे सदर मालमत्तांचा ताबा घेणे. त्यानंतर सदर मालमत्तांची विक्री करण्याचे अधिकार आहेत आणि ते सरफेसी ॲक्ट सेक्शन १३ अनुसार बँकेचे अधिकृत अधिकार आहेत.

दिनांक - ३१-१२-२०२४, स्थळ - सोलापूर
(मजकूरात संधिग्ता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरा)
सही/-
**अधिकृत अधिकारी**
**बँक ऑफ बडौदा**

नव्या वर्षातही...

# ‘मायक्रोप्लॅनिंगने जिल्हाविकास’

## हाच माझा ध्यास!

- उजनी पर्यटन विकास; पंढरपूर कॉरिडोर; विमानसेवा; कामगार, शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांची उकल करणार...

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**

**गतवर्षी जानेवारीपासूनच जिल्ह्यातील विविध कामांना सुरूवात केली आणि आज डिसेंबरअखेर पर्यंत सतत बैठका, विकासकामांना गती देण्याचे काम जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद करताना दिसतात. कोणत्याही कामात मायक्रोप्लॅनिंग करुन ते काम फत्ते करायचेच असा त्यांचा मानस असतो. मग ते काम छोटे असो अथवा मोठे. गतवर्षी विकासाचे नाना संकल्प सोडून त्यांनी अनेक विकासाची कामे मार्गी लावली होती; त्याच धर्तीवर आगामी नववर्षातही गतवर्षीची पेंडिंग विकासकामांना चालना देत नाविण्यपूर्ण उपक्रम जिल्ह्यात राबविणार असल्याचा मनोदय जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दैनिक तरुण भारतशी खास संवाद साधताना व्यक्त केला. त्यांच्या आगामी वर्षातील कामाच्या सोडलेल्या संकल्पांमध्ये उजनी पर्यटन विकास, विमानसेवा, पंढरपूर कॉरिडोर, भाविकांसाठीचा दर्शन मंडप आणि शेतकरी-कामगार यांच्या हिताची कामे करणे आदींचा समावेश आहे.**




जिल्हाधिकारी आशीर्वाद यांच्या महत्वाच्या संकल्पांपैकी उजनी एकात्मिक पर्यटन विकासाच्या माध्यमातून राज्यातील पर्यटन विकासाला चालना देण्याबरोबरच स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. जिल्ह्यातील उजनी धरण परिसरातील २८२ कोटी ७५ लाख रुपयांच्या एकात्मिक पर्यटन विकास आराखड्याला सप्टेंबर २०२४ मध्ये म्हणजे निवडणूक लोकसभा निवडणूक आचारसंहितेच्या अगोदरच मंजुरी मिळाली होती. त्याचा शासनदरबारी पाठपुरावा करून त्यांनी निधीही मंजूर करून घेतला आहे. या महत्वाकांक्षी प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामाला आता लवकरच सुरूवात होणार असून, आगामी वर्षात हे काम पूर्ण करण्याचे त्यांचे स्वप्न आहे. यासाठी या जलाशयात चालविण्यात येणाऱ्या विविध स्वरूपाच्या प्रवाशी बोटींची निविदा आता लवकरच ते काढणार आहेत. या प्रकल्पासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी वारंवार बैठका, मॅपिंग करून सुक्ष्म आराखडा केला होता.

जिल्हाधिकाऱ्यांनी २०२४ मध्ये प्रत्येक गोष्टीत मायक्रोप्लॅनिंग करून विविध विषयांवर लिलया मार्ग काढला आहे. आगामी २०२५ मध्येही हाच पॅटर्न ते राबविणार आहेत. महसूल विभागातील वरिष्ठ सहकाऱ्यांबरोबर चर्चा करणे, स्थानिक लोकप्रतिनिधी, त्यांचे पीए व इतर विभागातील विभागप्रमुखांशी संवाद साधून सध्या जिल्हा विकासाचा प्रगतीचा आलेख कसा आहे व भविष्यात नव्याने काय करावे लागेल, यासाठी ते विशेष प्रयत्न करणार आहेत. त्यांनी कर्तव्यात स्वत:ला कधीच वेळेचे बंधन घालून घेतले नव्हते आणि नाही. ते सकाळी जरी कार्यालयात लवकर आले अन् सायंकाळी महत्वाची बैठक घ्यायची असेल तर ते रात्री ८ किंवा ९ वाजले तरी हातातील काम पूर्ण करूनच कार्यालयाबाहेर पडतात.

२०२५ या आगामी वर्षातही जिल्हाधिकाऱ्यांसाठी अत्यंत महत्वपूर्ण वर्ष आहे. गतवर्षी जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी देशातील सर्वात मोठ्या कामगार वसाहतीचा म्हणजेच रे-नगरचा देखणा कार्यक्रम नववर्षाच्या सुरूवातीलाच करून दाखविला होता. यानंतर दुष्काळजन्य स्थिती निर्माण झाल्याने त्यांनी आपला मोर्चा शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांकडे वळविला. शेतकऱ्यांना दुष्काळी मदत, विमा मिळवून दिला. पाणी वाचविण्यासाठी ऊस पीक कमी करून डाळिंब, रेशीम उद्योगाला चालना देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. यानंतर आषाढी सोहळा केला. अशातच २०२४ मध्ये लोकसभा, विधानसभा निवडणुकांही निर्विघ्नपणे त्यांनी पार पाडल्या. मराठा आरक्षणासाठी कुणबी नोंदी घेणे, दिव्यांग अभियान, माझी वसुंधरा अभियान, अग्रीस्टीक आदी विविध अभियान योग्य पध्दतीने राबविली. विधानसभा निवडणुकीनंतर ईव्हीएम संभ्रमाबाबत तापलेल्या वातावरणात योग्य तो खुलासा त्यांनी केला. गतवर्षी उजनीचे पाणी वाटपाचे नियोजन पालकमंत्र्यांच्या मार्गदर्शनानुसार योग्य पध्दतीने केले. लाडकी बहीण योजना योग्य पध्दतीने राबविली.

सोलापुरात विमानसेवा सुरू करण्यासाठी ते गेल्या ६ म हिन्यांपासून प्रयत्नशील आहेत. त्यांनी स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात घेवून विशेष प्रयत्न केले आहेत. आता जानेवारी २०२५ च्या पहिल्या महिन्यात विमानसेवा सुरू करण्याचा त्यांचा मानस आहे. यानंतर लागलीच पंढरपूर येथील भाविकांच्या दर्शन मंडपाचे काम ते हाती घेणार आहेत. याचबरोबर उजनी योजनेच्या पर्यटन विकास कामालाही ते एक-दोन महिन्यात प्रारंभ करणार आहेत. याच बरोबर यंदाही स्थानिक स्वराज्य संस्थांचे पडघम वाजणार असल्याने यंदाही जिल्हाधिकाऱ्यांचे शेड्युल बिझीच राहणार असल्याचे दिसून येत आहे. इतकेच नाहीतर सोलापूर महापालिकेचीही निवडणूक याच वर्षी लागणार आहे. उजनी धरण भरले असले तरी त्यातील पाण्याचा वापर काटकसरीने व्हावा म्हणून जिल्हाधिकारी त्यावरही करडी नजर ठेवून राहणार आहेत. यंदा दुष्काळी स्थिती निर्माण होणार नसल्याने शेतकऱ्यांचे काम त्यांचे थोडे कमीच राहणार आहे. यंदा सर्वात महत्वाचे म्हणजे उजनी पर्यटन विकास कामांना जास्तीची चालना देण्याचा आपला प्रयत्न राहील, असाही खुलासा जिल्हाधिकाऱ्यांनी शेवटी केला. एकंदरीत, जिल्ह्यात शांतता, सुव्यवस्था राखून जिल्ह्यातील नागरिकांना मुलभूत गरजा पुरविण्याचा त्यांचा कायम प्रयत्न दिसून येतो.

### जिल्हा विकासासाठी ‘रात्रंदिन’ काम करण्याची तयारी..!

शालेय जीवनापासून माझे एक स्वप्न होते की, नोकरी लागल्यावर सर्वसामान्य नागरिक, कामगार वर्ग, शेतकऱ्यांच्या विविध अडचणी सोडविणार आहे. त्यांच्याच आनंदात माझा आनंद द्विगुणीत करणार आहे. यामुळे माझ्या कार्यकाळात मी सोलापूर जिल्ह्यातील नागरिकांची अशी कामे करणार आहे की, मी कायम त्यांच्या स्मरणात राहीन. यासाठी माझी रात्रंदिन काम करण्याची तयारी आहे. माझ्याकडे कोणताही शेतकरी, उद्योजक, कामगार व सामान्य नागरिक आला तरी त्यांची समस्या जाणून घेवून त्याच वेळी ती अडचण दूर करणे, हा माझा पॅटर्न आहे. या पॅटर्नमुळेच माझे नाव बदली झाल्यावरही सोलापुरातील जनतेच्या कायमस्वरूपी स्मरणात राहावे, अशी माझी अपेक्षा आहे.

**- कुमार आशीर्वाद,**
जिल्हाधिकारी सोलापूर,

# नवीन कोर्ट होणार.. स्काय वॉकने जोडणार

- सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मनोज ठाकरे यांचा संकल्प..!

**तभा वृत्तसेवा । जगन्नाथ हुक्केरी**



नव्या वर्षात संकल्प करण्याची जुनीच पद्धत. प्रत्येकजण तो सोडतही असतो. तो तडीस जाईल की नाही, याचा नेम नसतो. मात्र नेहमीच संकल्प सोडून त्याला तडीस नेण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचा प्रयत्न असतो. नव्या वर्षात कार्यकारी अभियंता मनोज ठाकरे यांनी आरोग्यसेवेबरोबरच न्यायालयीन कामकाज, सुरळीत आणि निर्धोक दळणवळ, हरित मार्ग अन् कार्यालयाचा संकल्प सोडला आहे. सोलापूर जिल्हा न्यायालयाची भव्य आठ मजली इमारत बांधण्यात येणार असून, नवीन इमारत आणि जुन्या इमारतीला चक्क स्काय वॉकने जोडण्यात येणार आहे.


मनोज ठाकरे

नव्या वर्षामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मनोज ठाकरे यांनी तब्बल ९० कोटी रुपये खर्च करुन बांधण्यात येणाऱ्या जिल्हा न्यायालय इमारतीला लक्ष्य केले आहे. सुसज्ज आणि तितकीच दे खणी इम ारत बांधणार आहेत. ग्राउंड फ्लोअरला पार्किंग असल्याने न्यायालय आवारातील पार्किंचा प्रश्न निकाली निघणार आहे. २४ हजार ५६४ चौमी क्षेत्रात बांधकामामध्ये तब्बल २५ कोर्ट हॉल असणार आहेत. यामुळे न्यायालयीन कामकाज सुरळीत होण्याबरोबरच वकील, पक्षकारांची चांगलीच सोय होणार आहे. गत वर्षात नवीन जिल्हाधिकारी कार्यालय, गुरुनानक चौकातील जिल्हा रुग्णालय, महिला व नवजात शिशू रुग्णालय, बाह्यवळण रस्ते, पूल बांधणीनंतर आता १०० खाटांचे ७० कोटी खर्च करुन अक्कलकोट ग्रामीण रुग्णालय आणि ६० कोटींच्या निधीतून अक्कलकोट न्यायालयाची इमारत उभारण्यात येणार आहे. सोलापुरातील राज्य उत्पादक शुल्कची नवीन इमारत, सोलापूर शहरासह दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, अक्कलकोट तालुक्यात नव्याने रस्ते आणि पूल बांधण्याचेही त्यांचे नियोजन आहे.

### हरित मार्ग... हिरवेगार परिसर...

नव्याने बांधण्यात येणाऱ्या रस्त्याच्या कडेला चालू वर्षात १२ हजार झाडे लावून त्याचे संगोपन, संरक्षण करण्यात येणार आहे. याशिवाय विविध शासकीय कार्यालय परिसर वृक्षाछादित करण्यासाठी मोठ्या प्रामणात झाडे लावण्यात येणार आहेत. यामुळे रस्त्यावरुन प्रवास करताना गर्द अशा वनराईची सर्द अशी सावली अनुभवता येणार असून, परिसरात अभ्यंगतांना सावलीखाली थांबता येणार आहे.

# एसटी चालक वाहकांना “प्रोत्साहन भत्ता” योजनेतून मिळणार नवी चालना

- **नव्या वर्षात महामंडळाची नवी संकल्पना**

**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अर्थात एसटी महामंडळाच्या वतीने एसटी बसेसच्या चालक वाहकांसाठी नवीन वर्षात नवी योजना कार्यान्वित केली जाणार आहे. माहे जानेवारी २०२५ मध्ये १ जानेवारी ते ३१ जानेवारी याकालावधी दरम्यान प्रायोगिक तत्त्वावर उत्पन्नावर आधारित प्रोत्साहन भत्ता योजना राबविण्यात येणार असल्याचे महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाचे सोलापरचे विभागीय नियंत्रक अमोल गोंजारी यांनी सांगितले.


अमोल गोंजारी

एसटी महामंडळाच्या चालक वाहकांना आपल्या कामात अधिक प्रोत्साहन मिळावे. त्यासोबत अर्थार्जण व्हावे यासाठी, एस टी महामंडळाने नवी योजना कार्यान्वित केली आहे. हंगामी काळ नसताना एसटी बसेसना प्रवाशांची गर्दी कमी असते. अशावेळी एसटी महामंडळाच्या वतीने या योजने अंतर्गत चालक वाहकांना प्रोत्साहन मिळावे आणि प्रवाशांचे भारमान वाढावे यासाठी उपयोजनात्मक योजना महामंडळ दरवर्षी कार्यान्वित करते. या योजनेमध्ये प्रत्येक क्रू ड्युटीचे निव्वळ वाहतूक उत्पन्न माहे जानेवारी २०२४ च्या उत्पन्नावर आधारित उद्दिष्ट काढण्यात येणार आहे.सदर उद्दिष्ट चालक वाहक यांनी पूर्ण करून त्यापेक्षा जास्त वाढीव उत्पन्न आणलं तर वाढीव उत्पन्नापैकी २० टक्के रक्कम ही ‘‘प्रोत्साहन भत्ता‘‘ म्हणून चालक वाहक यांना समप्रमाणात तात्काळ रोखीने अदा करण्यात येणार आहे. एखाद्या सोलापूरहून पुणेकडे जाणाऱ्या बसेसचे उद्दिष्ट उत्पन्न १० हजार रुपये आहे. तर चालक वाहक यांनी सदरचे उत्पन्न वाढून १२ हजार रुपये आणले. उद्दिष्टांपेक्षा २००० रुपये जास्त आले, तर अशावेळी २००० रुपयांचे २०टक्के म्हणजेच ४०० रुपये प्रोत्साहन भत्ता मिळेल. यामध्ये २०० रुपये चालक तर २०० रुपये वाहक असे दोघांना सम प्रमाणात मिळेल. सोलापूर एसटी विभागातील जास्तीत जास्त चालक वाहकांनी उद्दिष्टापेक्षा जास्त उत्पन्न आणावे आणि जास्त प्रोत्साहन भत्ता मिळवावा असे आवाहन एसटी विभागाने केले आहे.



# शहर कचरा, प्लास्टिक, धुळमुक्त करण्यात येईल...

- मनपा अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांचा संकल्प

**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**



सर्वांच्या प्रयत्नातून नुकतीच स्वच्छता मोहीम यशस्वी झाली आहे. सोलापूर शहर हे स्वच्छ - सोलापूर सुंदर सोलापूर म्हणून कायम राखणार आहे. नव्या वर्षाची हे शहर कचरा, प्लास्टिक, धुळमुक्त करण्यात येईल, असा संकल्प नव्या वर्षानिमित्त महापालिका अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी व्यक्त केला आहे.

सरत्या वर्षाच्या महिन्यात सोलापूर शहरात महापालिकेचे सर्व आठ विभाग एकत्रित येऊन प्रथमच मुख्य रस्ते स्वच्छतेची मोहीम यशस्वी करण्यात आली. यामुळे सोलापुरातील धूळ मोठ्या प्रमाणात कमी झाली. रस्त्याने मोकळा श्वास घेतला. येणाऱ्या नव्या वर्षातील सोलापूर महापालिकेच्या वतीने सोलापूर शहर स्वच्छ व सुंदर करण्याचा प्रयत्न राहणार आहे. सोलापूर शहर कचरा ढीगमुक्त करण्यात येईल. सोलापूर शहर कचरामुक्त, प्लास्टिक मुक्त आणि धुळ मुक्त करण्याचा आमचा संकल्प आहे.

या संकल्पपूर्तीसाठी महापालिका प्रशासन सदैव तत्पर राहणार आहे. सोलापूरकरांनी महापालिका प्रशासनाला साथ द्यावी किंबहुना सोलापूरकरांनीही स्वच्छ सोलापूर - सुंदर सोलापूर करण्यासाठी योगदान देण्याचा संकल्प या नववर्षानिमित्त करावा, असे आवाहनही अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी केले आहे.

# नववर्षात नवीन योजना नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचा राहणार संकल्प

- अतिरिक्त सीईओ संदीप कोहिनकर

**सोलापूर, दि.३१ डिसेंबर-**



गत २०२४ या वर्षात अपूर्ण राहिलेली प्रलंबित कामे आणि आगामी नवीन वर्षात केली जाणारी विविध विकास कामे याकडे सर्वार्थाने लक्ष राहील. यंदाचा जिल्हा परिषदेचा आर्थिक संकल्प सादर करताना ग्रामविकास हेच लक्ष डोळ्यासमोर त्या दृष्टिकोनातून कामकाज राहील असा संकल्प अतिरिक्त सीईओ संदीप कोहिनकर यांनी नववर्षात पदार्पण करताना व्यक्त केला आहे.

दरम्यान यंदाचा अर्थसंकल्प सादर करण्याचे भाग्य मला लाभले. या अर्थसंकल्पातून संपूर्ण सोलापूर जिल्ह्याचा विकास डोळ्यासमोर ठेवून अर्थसंकल्प सादर केला. राज्य शासनाच्या विविध योजना गावातील शेवटच्या नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्नशील राहणार असून ठेवून, या नववर्षात हेच संकल्प आणि ध्येय दृष्टीपथात असणार आहे. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सुरू असलेली विकास कामे तात्काळ पूर्ण करण्याच्या सूचना यापूर्वीच ग्रामसेवकांना दिल्या आहेत. त्याच पद्धतीने शैक्षणिक स्तर सुधारण्यासाठी प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभागाला देखील गुणवत्ता पूर्ण शिक्षण देण्यासाठी निर्देश दिले आहेत. या विविध सूचना आणि नियमांच्या अंमलबजावणी नवीन वर्षात काटेकोरपणे केली जाईल असा विश्वास कोहिनकर यांनी व्यक्त केला.

तत्पूर्वी प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी हे पद सांभाळताना सर्वांना समान न्याय देण्याचा प्रयत्न देखील या काळात केला. विशेष करून अर्थसंकल्पमध्ये हे कार्य तत्परतेने केले असे देखील त्यांनी यावेळी सांगितले.

# रुग्णांना सर्वोत्तम आरोग्य सेवा प्राप्त व्हावी हेच राहणार ध्येय

- जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.संतोष नवले

**सोलापूर, दि.३१ डिसेंबर-**



सोलापूर जिल्ह्यातील रुग्णांना सर्वोत्तम रुग्णसेवा मिळावी यासाठी जिल्हा परिषद आरोग्य विभाग या नव्या वर्षात कार्यरत राहील. माता आरोग्य, बाल आरोग्य, चांगले व सुदृढ कसे राहील. त्याच पद्धतीने रुग्णांना सर्वोत्तम आणि मोफत आरोग्य सुविधा प्राप्त व्हाव्या या उद्देशाने आरोग्य विभाग या नववर्षात कार्यरत राहील असा विश्वास जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ संतोष नवले यांनी व्यक्त केला.

दरम्यान, सोलापूर जिल्ह्यातील रुग्णांना पैशाअभावी आरोग्य सेवा मिळत नाही. अशा घटना निदर्शनास आल्यानंतर जिल्ह्यातील सर्व आरोग्य केंद्रात सर्व पद्धतीच्या आरोग्य निदान उपचार आणि चाचण्या मोफत प्राप्त होतील याकडे आरोग्य विभागाचा भर राहील. तसेच विविध शिबिराच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येईल. रक्तदान शिबिर, अवयव दान शिबिर या माध्यमातून नागरिकांना त्याचे महत्त्व पटवून देण्यात येईल. कोणताही रुग्ण आरोग्य सेवे अभावी मृत्यूमुखी पडणार नाही याकडे जाणीवपूर्वक लक्ष देण्यात येईल, असा आशावादही डॉ.नवले यावेळी व्यक्त केला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

तरुण भारत

## संक्षिप्त वृत्त

### भोसले वाचनालयाच्यावतीने निबंध स्पर्धेचे आयोजन

**अक्कलकोट, दि ३१ डिसेंबर-**

महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा अक्कलकोट व श्रीमंत शहाजीराजे भोसले वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने निबंध स्पर्धेचे आयोजन केले असल्याची माहिती संस्थेच्या अध्यक्षा शैलशिल्पा जाधव यांनी सांगितले. लहान गट ८ वी ते १०वी, विषय : आवडते पुस्तक/ लेखक, आपण भेट दिलेल्या निसर्गरम्य स्थळांची माहिती, आपल्या गावची जत्रा. मोठा गट ११ वी ते १२वी साठी विषय : वाचन साहित्याचे महत्त्व, वाचन संस्कृतीचे महत्त्व, अक्कलकोट एक नाम ांकित संस्थान. लहान गटासाठी ३०० शब्द व मोठ्या गटासाठी ५०० शब्दांची मर्यादा आहे. निबंध हे पाटपोट लिहू नये. निबंध २० जानेवारी पर्यंत कार्यालयीन वेळेत ग्रंथपाल दत्तात्रय बाबर यांचेकडे समक्ष आणून द्यावे. यशस्वी विद्यार्थ्यांना मानपत्र देऊन सत्कार करण्यात येणार आहे.

# सरत्या वर्षात विठ्ठल-रूक्मिणी मंदिरास ५३ कोटी ९७ लाखांचे दान

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३१ डिसेंबर -**

येथील श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीस सरत्या वर्षात अर्थात १ जानेवारी ते २७ डिसेंबर २०२४ या कालावधीत तब्बल ५३ कोटी ९७ लाख रुपयांचे उत्पन्न प्राप्त झाल्याची माहिती विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.



या संदर्भात माहिती देताना व्यवस्थापक श्रोत्री यांनी सांगितले की, श्रींच्या चरणाजवळ ६ कोटी २५ लाख ८९ हजार ७९७ रुपये, लाडूप्रसादातून ५ कोटी ८५ लाख २६ हजार ९०० रुपये, देणगीतून ८ कोटी १८ लाख ९८ हजार ४१७ रुपये, भक्तनिवासातून ९ कोटी ८४ लाख ७८ हजार २७९ रुपये, पुजेतून २ कोटी ३३ लाख ८६ हजार ३१२ रुपये, फोटो, मोबाईल लॉकर व महावस्त्रातून ९२ लाख ३३ हजार ४९ रुपये, हुंडीपेटीतून ७ कोटी ५६ लाख ७४ हजार ५२ रुपये,सोने-चांदीमधून २ कोटी ७२ लाख ४ हजार ४५० रुपये, परिवार देवता मंदिरातून ३ कोटी ९१ लाख ४ हजार २०३ रुपये, विधि उपचारातून ५ कोटी ९८ लाख ८ हजार ४३७ रुपये तसेच इतर जमेतून ६ कोटी ८१ लाख १ हजार ८५६ रुपये असे एकूण ५३ कोटी ९७ लाख ५ हजार ७५२ रुपये इतके उत्पन्न मिळाले आहे. दरम्यान मंदिर समितीस वारकरी भाविकांकडून चांगले दान मिळत असून, मिळालेल्या दानातून श्रींच्या दर्शनासाठी येणा-या वारकरी भाविकांना चांगल्या व अत्याधुनिक सोई सुविधा उपलब्ध करून देण्याचा मंदिर समितीचा प्रयत्न राहील असे यावेळी कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगीतले.

### मंदिर समितीमार्फत पुरविल्या जाणाऱ्या सेवा

मंदिर समिती मार्फत भाविकांना पुरेसा प्रमाणात सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. त्यामध्ये प्रामुख्याने दर्शनरांग व्यवस्थापन, अन्नछत्र, लाडूप्रसाद, निवास इत्यादीचा समावेश आहे. याशिवाय, भाविकांना श्रींच्या नित्यपुजा, पाद्यपुजा व तुळशीपूजा देखील भाविकांना उपलब्ध करून देण्यात येत आहे. यात्रा कालावधीत भाविकांच्या पायांना खडे टोचू नये म्हणून दर्शनरांगेत मॅटींग, विश्रांती कक्ष, आपत्कालिन दरवाजे, हिरकणी कक्ष, मोफत अन्नछत्र, एकादशीला शाबुदाणा खिचडी वाटप, द्वादशीला तांदळाची खिचडी, मिनरल वॉटर, चहा, आरोग्य व्यवस्थेचे स्टॉल इ. उपक्रम मंदिर समितीने सुरू केले आहेत. तसेच श्रींच्या पुजेसाठी वाढती मागणी विचारात घेऊन, नित्यपुजेत २ भाविक कुटुंबियांना संधी, अन्नछत्र सहभाग योजना, महानैवेद्य सहभाग योजना, तुळशी अर्चन पुजा सुरू केल्या असून, त्याची नोंदणी देखील ऑनलाईन करण्यात आली आहे, यास भाविकांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

# अ. भा. स्वकुळ साळी मराठी साहित्य संमेलनाचा समारोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**

(स्व.वसंतराव एकबोटे साहित्य नगरी) स्वकुळ साळी समाजाचे तिसरे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या समारोपात, न थांबता पुढे चालत रहा, यश निश्चित मिळेल, असा विश्वास समस्त मराठी साळी मांदियाळीनी व्यक्त केला. यावेळी कला, साहित्य, उद्योग, सामाजिक आणि राजकीय वाटचालीत एक पाउल पुढे राहण्याचा निर्धारही प्रकट झाला. साहित्य दिंडीपासूनच्या दुसऱ्या दिवशीच्या सायंकाळी समारोपापर्यंत उपस्थितांची गर्दी दाद देणारी होती. ही बाब अधोरेखित झाली. आणि हीच संमेलनाच्या यशस्वीतेची पावती असल्याचे मत उपस्थित साळी रसिक श्रोत्यांनी व्यक्त केले.




श्री जिव्हेश्वर प्रतिष्ठान (पुणे) आणि श्री जिव्हेश्वर विद्यार्थी विकास मंच (सोलापूर) यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार २८ आणि रविवार २९ डिसेंबर दोन दिवसीय अ.भा. मराठी साहित्य संमेलन ज्येष्ठ पत्रकार स्व. वसंतराव एकबोटे साहित्य नगरीत पार पडले. समारोपप्रसंगी चित्रकार स्व.चंद्रकांत पोरे व्यासपीठावर संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. संगीता बर्वे, प्रमुख पाहुणे ज्येष्ठ पत्रकार विजयकुमार पिसे, उद्योजक अभयकुमार एडके, स्वागताध्यक्ष शरदकुमार एकबोटे, डॉ.चंद्रशेखर बारगजे, कृष्णा सुरे, निवृत्ती गायकवाड उपस्थित होते.

डॉ. संगीता बर्वे यांनी, खऱ्या अर्थाने हे संमेलन यशस्वी झाले, याची अनुभूती आल्याचे नमूद केले. स्वकुळ साळी समाज कला आणि साहित्य जाणतो, नव्हे तर उद्योग, सामाजिक व राजकीय क्षेत्रातही ठसा उमटवण्याची क्षमता आहे. असे त्या म्हणाल्या. प्रमुख पाहुणे विजयकुमार पिसे यांनी राजकीय क्षेत्रात समाजाची उणीव लक्षात येते, ती भरून काढण्याची आवश्यकता आहे. देशात आणि राज्यात ओबीसी समाज निर्णायक असून सरकारी योजनेचे लाभ या समाजालाही मिळू शकतील. त्यासाठी राजकीय ताकद अजमावण्याकडे पिसे यांनी लक्ष वेधले. शरदकुमार एकबोटे यांनी स्वकुळ साळी समाज आणि भगवान जिव्हेश्वर अनेक रूपांचे प्रतीक आहे. त्यावरून या समाजाची व्याप्ती आणि ताकद लक्षात येते असे नमूद केले. याप्रसंगी प्रा. डॉ.चंद्रशेखर टोणपे, सदाशिव चिंचकर, लक्ष्मण सरवदे, जयहरी साखरे, अर्जुन साखरे, लक्ष्मण लोणकर, महादेव सरवदे आनंद कोंगे, सचिन चिल्लाळ, राजू सरवदे, राजेंद्र शेंद्रे, शैलेश एकबोटे, सुभाष गायकवाड, दत्तात्रय गायकवाड, ज्ञानेश्वर सपकाळ, अवधूत ढगे, अनिल दिवटे, जगन्नाथ एलगट, अनुराधा काजळे, माधुरी एकबोटे, संगीता सपार, संगीता पोरे, राजश्री दिवटे, चित्रकार हेमंत कपुरे, अरुण पोरे, मोहन कांबळे व अनेक मान्यवर उपस्थित होते.

सूत्रसंचालन प्रा.डॉ.चंद्रशेखर टोणपे, दीपाली एकबोटे, शिवानी एडके, लक्ष्मी टोणपे आणि आभार विद्यार्थी विकास मंचाचे सचिव ज्ञानेश्वर सपकाळ यांनी मानले.

### संमेलनात स्त्री शक्तीचा जागर

साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा डॉ.संगीत बर्वे यांना बहुमान मिळाला. प्रत्येक सत्रात त्यांची आवर्जून उपस्थिती आणि मार्गदर्शन झाले. बर्वे यांना मिळालेली संधी ही स्त्री शक्तीचा जागर असे गौरवपूर्ण उद्गार डॉ.चंद्रशेखर बारगजे यांनी काढले. तसेच संमेलनातील महिलांची बहुसंख्येने उपस्थिती आणि आणि अन्य कार्यक्रमांचे नेटके नियोजन महिलांनीच केले. तसेच विद्यार्थी विकास मंचच्या तरुणांचे टीमवर्क हे या साहित्य संमेलनाचे वैशिष्ट्य ठरले.



# सिंहगड इन्स्टिट्यूट रक्तदान शिबिरात ३१ जणांचे रक्तदान

**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**

येथील एनबीएन सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय आणि सिंहगड पब्लिक स्कूलच्या वतीने सोमवारी (ता. ३०) रक्तदान शिबिर आयोजित केलै. या रक्तदान शिबिरात ३१ जणांनी रक्तदान केले. सिंहगड संस्थेचे संस्थापक प्रा. एम. एन. नवले यांच्या वाढदिवसानिमित्त हे रक्तदान शिबिर घेतले. यास डॉ. हेडगेवार ब्लड बँकेचे सहकार्य लाभले. सायंकाळी केक कापून कर्मचा-यांना अल्पोपाहार देऊन वाढदिवस साजरा केला.यावेळेस सिंहगड संस्थेचे सहसचिव तथा कॅम्पस डायरेक्टर संजय नवले, प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य डॉ. शेखर जगदे, उपप्राचार्य आर टी व्यवहारे, निबंधक डॉ. डी. आय. नवले, सिंहगड पब्लिक स्कूलच्या प्राचार्या निखहत शेख, उपप्राचार्य प्रकाश नवले यांची उपस्थित होती. रक्तदान शिबिरात विद्यार्थ्यांसह कर्मचा-यांनी रक्तदान केले. रक्तदानाची सुरुवात प्राचार्य शंकर नवले यांनी स्वतः रक्तदान करुन केले. त्यांची रक्तदानाची ५७ वी वेळ असल्याचे सांगितले. रक्तदानाविषयी माहिती दिली. त्यांनी शंभर वेळा रक्तदान करुन शतकवीर रक्तदाता होण्याचा मानस असल्याचे सांगितले. रक्ताची कुठे ही निर्मिती होत नाही. रक्त हे फक्त मनुष्याच्या शरीरातच तयार होते. समाजात दान करण्याला खूप महत्त्व आहे. त्यात ज्ञानदान आणि रक्तदानाला खूप महत्त्व असल्याचे सांगितले. डॉ. हेडगेवार रक्तकेंद्राचे समन्वयक दिलीप बनसोडे आणि त्यांच्या सहायक टीमने योगदान दिले. तसेच सिंहगडचे राष्ट्रीय सेवा योजनेचे (एनएसएस) प्रो. मानिक शिंदे यांच्यासह त्यांच्या टीमने परिश्रम घेतले.

# यशाचे धडे देणाऱ्या गुरुवर्य मार्गदर्शकांची कृतज्ञपूरक भेट

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३१ डिसेंबर-**

बाळा, समाधान केवढा होतासं रे आणि किती मोठा झालास, किर्ती मिळवलीस हे अभिमानाचे शब्द आहेत एका शिक्षिकेचे. आपल्या हाताखाली विद्येचे धडे घेतलेल्या किंवा आपण शिकविलेला एक सर्वसामान्य विद्यार्थी एकदा नव्हे तर चक्क दोन वेळा आमदार बनला. आमदारकी बरोबरच आपल्या व्यवसाया मध्ये देखील त्याने उत्तुंग भरारी घेत प्रसिध्द कॉन्ट्रॅक्टर (ठेकेदार) म्हणून आपल्या यशाची किर्ती केवळ आपल्याच राज्यात नव्हे तर परराज्यासह संपूर्ण भारतभरात पसरविली अशा या विद्यार्थ्याची आणि त्याच्या शिक्षिकेची एका कार्यक्रम प्रसंगी अचानक घडलेल्या भेटीचा हा प्रसंग. शिक्षिकेचा आपल्या विद्यार्थ्याला पाहून ऊर भरुन आले तर विद्यार्थी देखील आपल्या शिक्षिकेला भेटून तृप्त झाला.



पंढरपूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे आणि त्यांना इयत्ता १ ली ते ४ थी या शालेय शिक्षणाच्या प्रवासा दरम्यान मंगळवेढा येथे शिकवणी रूपाने ज्ञानाचे धडे देणाऱ्या जेष्ठ सहशिक्षिका श्रीमती उज्वला बबन ठोंबरे यांची एका कार्यक्रमा दरम्यान भेट झाली.

कष्टातूव कर्तृत्व प्राप्त केलेल्या आपल्या विद्यार्थ्याचं यश पाहून बाईंना अक्षरशः गहिवरून आलं. बाळा, समाधान केवढा होतासं रे आणि किती किर्ती मिळवलीस...तुझा सामाजिक, राजकीय व व्यावसायिक क्षेत्रातील डोळे दिपवून टाकणारा प्रवास मी टीव्हीवर तसेच वर्तमानापत्रात पाहते रे...बेटा असाच आणखी मोठा मला तुझा सार्थ अभिमान आहे असे आपसूक जिव्हाळा भरलेले शब्द मुखातून बाहेर पडताच त्यांचे चरण स्पर्श करुन आमदार समाधान आवताडे यांनी त्यांचे आशीर्वाद घेतले. त्यामुळे विद्यार्थी आणि त्याला मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षिकेची भेट पाहून खरोखरच असे वाटले की, मुलगा कितीही मोठा झाला तरी आपल्या आई वडिलांना तो लहानच असतो त्या प्रमाणेच विद्यार्थी कितीही मोठा झाला तरी आपल्या गुरुजनांना तो विद्यार्थीच असतो.

यावेळी आपल्या बाईंच्या बरोबर असलेल्या अलका मायदेव व कमल काकू ठोंबरे या देखील भावनिक झाल्या.

# अरिहंत स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**

अरिहंत इंग्लिश स्कूलच्या प्राथमिक विभागाचे तेरावे स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले.

कार्यक्रमाची सुरुवात नटराज सरस्वती व अरिहंत यांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली. तत्पूर्वी पाहुण्यांचे औक्षण करून स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन फौजान अझहरी व तोषिता पोन्नम यांनी केले. तर अंजली रगबले यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. तसेच प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका रजनी सग्गम यांनी शाळेच्या प्रगतीचा आढावा वाचला. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून सारेगमप लिटिल चॅम्पची प्रसिद्ध गायिका स्वरा जोशी तसेच प्रसिद्ध पार्श्वगायिका केतकी जोशी उपस्थित होत्या. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध त्वचा तज्ञ व सौंदर्यप्रसाधन विशेषज्ञ डॉ. तृप्ती खटावकर उपस्थित होत्या. संस्थेचे अध्यक्ष डॉ. अजय




पोन्नम यांनी मान्यवरांचा सत्कार केला. स्नेहसंमेलनाची सुरुवात भरतनाट्यम या शास्त्रीय नृत्याने झाली. मान्यवरांच्या हस्ते यावर्षीचा प्राथमिक विभागातील शंभर टक्के उपस्थिती विद्यार्थी तसेच बेस्ट स्टुडंट म्हणून विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. यावर्षीचा टीचर ऑफ द इयर म्हणून प्रवीण चौरे तर क्रिएटिव्ह टीचर म्हणून वैष्णवी कोकल यांचाही गौरव करण्यात आला. यावेळी मंचावर संचालिका सुलक्षणा पोन्नम, उपमुख्याध्यापिका तस्नीम शेख, पर्यवेक्षिका रजनी सग्गम, चन्नेश इंडी, ज्योती आडम, रूपाली निकते, क्युरियस किड्स इंटरनॅशनल प्री स्कूलच्या प्रिन्सिपल प्रीती कुर्री उपस्थित होत्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संचालिका सुलक्षणा पोन्नम यांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्याध्यापिका तस्नीम शेख, प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका रजनी सग्गम, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

### महिलांसाठी खास जीवन विमा; उद्योगातील पहिली योजना

**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**

आयसीआयसीआय प्रुडेंशियल लाइफ इन्शुरन्सने महिलांसाठी डिझाइन केलेली आयसीआयसीआय प्रू विश ही योजना लाँच केली आहे.आयसीआयसीआय प्रु विश योजनेतून महिलांना स्तन,गर्भाशय,गर्भाशयाचे कर्करोग आणि हृदयविकार यांसारख्या गंभीर आजारांच्या निदानासाठी आरोग्य विमा कवच रकमेच्या १००% पर्यंत त्वरित परतावा दिला जाईल.महत्त्वाचे म्हणजे,प्रीमियमची रक्कम ३० वर्षांच्या कालावधीसाठी स्थिर राहणार आहे.याबाबत अमित पल्टा म्हणाले कि,आयसीआयसीआय प्रू विश हे आयुर्विमा उद्योगातील पहिले आरोग्य उत्पादन आहे जे विशेषतः महिलांच्या आरोग्यविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी डिझाइन केलेले आहे.यातून गंभीर आजाराच्या निदानाच्या वेळी महिलांना अशा कठीण प्रसंगांत आर्थिक परिस्थितीला तोंड देण्यासाठी एकरकमी रक्कमेचे पाठबळ मिळेल.

### मोहोळ तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी महेश सोवणी

**मोहोळ, दि. ३१ डिसेंबर-**

मोहोळ तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी दैनिक तरुण भारतचे मोहोळचे पत्रकार महेश सोवनी, सचिवपदी अशोक पाचकुडवे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. तर उपाध्यक्षपदी सुहास घोडके आणि दादासाहेब गायकवाड आणि खजिनदार म्हणून संमेद शहा यांची निवड करण्यात आली.

मोहोळ तालुका पत्रकार संघाच्या नव्या कार्यकारिणीच्या निवडीची बैठक रविवारी येथील शासकीय विश्रामगृहात पार पडली. या बैठकीत ही निवड करण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मावळते तालुकाध्यक्ष विष्णू शिंदे हे होते. या बैठकीला राजकुमार शहा, दिलीप देशपांडे, संजय आठवले, अशोक कांबळे, महेश कुलकर्णी, बालाजी शेळके, प्रा. चंद्रकांत देवकते, किशोर मारकड, राजू शिंदे, राम कांबळे, गो.रा. कुंभार, सुभाष शिंदे आदि पत्रकार उपस्थित होते. निवडीनंतर नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

# विज्ञान भारती, इस्त्रो यांच्यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर

## डॉ. मिनाक्षी पवार; स्वेरीमध्ये अवकाश महायात्रेचा समारोप

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३१ डिसेंबर-**

'स्वेरी'मध्ये 'विज्ञानभारती' आणि 'इस्त्रो 'यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या 'स्पेस ऑन व्हिल्स' या उपक्रमाच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आलेल्या अवकाशातील अद्भूत माहितीमुळे विद्यार्थी प्रचंड उत्साही झाले. शालेय व महाविद्यालयीन अभ्यासक्रमातून अवकाशातील ग्रह, तारे यांविषयी पुस्तकी ज्ञान मिळत आहेच परंतु या 'स्पेस ऑन व्हील्स (अंतरीक्ष महायात्रा बस)'मधील प्रदर्शनामुळे विद्यार्थी आणि अवकाश अजून जवळ आल्यासारखे वाटत होते. या अंतरीक्ष महायात्रेच्या अनुषंगाने आयोजिलेल्या प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात अधिक भर पडली.' असे प्रतिपादन स्वेरीज् कॉलेजच्या उपप्राचार्या डॉ.मिनाक्षी पवार यांनी केले.

येथील स्वेरीज् कॉलेज मध्ये 'विज्ञानभारती' आणि 'इस्त्रो' यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवस आयोजिलेल्या अंतरीक्ष महायात्रेच्या समारोप प्रसंगी स्वेरी संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) च्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार ह्या मार्गदर्शन करत होत्या.

अंतराळातील महत्वाची माहिती देण्यासाठी भारतीय अंतराळ संस्थेने (इस्त्रो) मोहीम हाती घेतली असून केंद्र सरकारचा उपक्रम असलेल्या इस्त्रोने अंतराळाच्या ज्ञानाचा लाभ विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी एक विशेष 'अंतराळ यात्रा बस' तयार केली असून बसच्या माध्यमातून चंद्र, सूर्य, ग्रह, तारे जवळून पाहण्याची अनुभूती घेत अंतराळाची वैज्ञानिक माहिती विद्यार्थ्यांना घेता आली. 'अंतराळ यात्रा बस' मध्ये भारतीय 'इस्त्रो' तथा 'अंतराळ संशोधन संस्था (इंडीयन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन- इस्त्रो)'च्या माध्यमातून अंतराळ व त्याअंतर्गत असलेल्या आर्यभट्ट उपग्रह, भास्कर उपग्रह, उपग्रहांच्या अनुषंगाने वातावरणात त्यांच्या फिरण्याच्या किंवा स्थिर राहण्याच्या कक्षा (ऑर्बिट), मंगळ ग्रह, चंद्र, चांद्रयान, ग्रहमालिका, चंद्रावर पाऊल ठेवणारा पहिला मानव, त्यावेळची स्थिती, चांद्रयान व मंगळयान मोहिमांबरोबरच सूर्यकेंद्री कक्षेत अवकाशयान पाठवून सूर्य किरणांमधील अतिनील वर्ण, सौर कण, सौर किरीट, सौर वात, चुंबकीय, सौर किरीट वर्णपट विश्लेषक, अतिनील किरणांची दुर्बीण, चुंबकीय प्रभाव मापक तसेच क्ष-किरण व प्लाझ्मा कण यांचे विश्लेषण, त्यानंतर यशस्वी उड्डाण केलेल्या चंद्रयान-३ ची साहित्य व साधने, उपग्रहांची प्रतिकृती, तसेच चंद्रावरील मृदा, याची ध्वनी क्लिप, चित्रफित, सूक्ष्म उपगृह या प्रदर्शनातून विद्यार्थ्यांना दिसून आले. 'अंतराळ यात्रा प्रदर्शन' यशस्वी होण्यासाठी स्वेरीचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन अधिष्ठाता डॉ.ए.पी. केने, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ.एम.एस. मठपती, प्रवेश प्रक्रिया अधिष्ठाता डॉ.के.बी.पाटील, इतर अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.



विज्ञानभारती आणि इस्त्रो यांच्या सहकार्याने स्वेरीमध्ये आयोजिलेल्या अंतराळ माहितीच्या प्रदर्शनामुळे अवकाशातील कक्षा, उपग्रह, ताऱ्यांची सविस्तर माहिती मिळाली त्याची प्रतिकृती व व्हीडीओच्या माध्यमातून अधिक ज्ञान मिळाले. अभ्यासक्रमात वाचनात आलेले उपग्रह प्रदर्शनाच्या माध्यमातून जवळून पाहता आले. स्वेरीने आयोजिलेल्या या स्पर्धेमुळे ज्ञान आणखी भक्कम झाले.

**- नाझिया मुजावर,**
विद्यार्थिनी, छत्रपती शिवाजी विद्यालय, मुंढेवाडी

### प्रश्नमंजुषा, चित्रकला, निंबध स्पर्धेचे आयोजन

कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पॉलिटेक्निकतर्फे प्राचार्य डॉ. एन.डी. मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा.ए.एस.भातलवंडे यांच्या नेतृत्वाखाली प्राध्यापकांच्या सहकार्याने अवकाश प्रदर्शन संबंधित प्रश्नमंजुषा, चित्रकला, निबंध या स्पर्धांचे आयोजन केले होते. विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली तसेच या दोन दिवसीय प्रदर्शनासाठी विज्ञानभारती, पश्चिम महाराष्ट्रचे सचिव कौस्तुभ साखरे यांच्या मार्गदर्शनाखाली एमबीए विभागातील विद्यार्थ्यांना एक दिवसीय विशेष प्रशिक्षण दिले होते.

### अडीच हजार विद्यार्थ्यांचा सहभाग

सलग दोन दिवस चाललेल्या या प्रदर्शनाचा लाभ श्री दर्लिंग विद्यामंदीर चळे, सिताराम महाराज विद्यामंदीर खर्डी, शरदचंद्र कृषी विद्यालय मारापूर, दौलतराव विद्यालय कासेगाव, जिजामाता प्रशाला आंबे, आचार्य दोंदे विद्यालय ओझेवाडी, लोटस इंग्लिश स्कूल कासेगाव, मातोश्री ईश्वरम्मा विद्यालय पंढरपूर, आपटे उपलप प्रशाला पंढरपूर, मातोश्री सखुबाई कन्या प्रशाला पंढरपूर, आदर्श प्रशाला व ज्युनिअर कॉलेज करकंब, श्री छत्रपती शिवाजी विद्यालय मुंढेवाडी, मातोश्री रुक्मिणी गंगाराम होळकर विदयालय व्हळे, यशकिर्ती विद्यालय पंढरपूर, माध्यमिक विद्यालय नेपतगाव, जवाहरलाल नेहरू हायस्कूल सिद्धेवाडी, शांताप्रभू प्रशाला अजनसोंड, कवठेकर प्रशाला पंढरपूर या विद्यालयांतील जवळपास २५०० विद्यार्थी व शिक्षकांनी घेतला.

# मल्लिकार्जुन देवस्थान ट्रस्टच्यावतीने डॉ. शैलेश पाटील यांचा होणार गौरव

### चार जगद्गुरूंच्या उपस्थितीत शुक्रवारी कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**

ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन देवस्थान ट्रस्ट शेळगी यांच्या वतीने शुक्रवार दि.३ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजता डॉ. शैलेश पाटील यांची उज्जैन, श्रीशैलम आणि काशीपीठ समितीवर ट्रस्टी म्हणून निवड झाल्याबद्दल तसेच त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून त्यांचा गौरव यावेळी करण्यात येणार आहे. त्याचबरोबर नवनिर्वाचित आमदार आणि विविध क्षेत्रांतील पदाधिकाऱ्यांचादेखील यावेळी सत्कार करण्यात येणार आहे.



भवानी पेठ येथील पाटील इस्टेट येथे उज्जैन, श्रीशैल व काशी जगद्गुरूंच्या दिव्य सान्निध्यात गौरव समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे.या गौरव समारंभाचे स्वागताध्यक्ष औसाचे माजी आमदार बसवराज पाटील हे असून अध्यक्षस्थान आमदार विजयकुमार देशमुख हे भूषविणार आहेत.

यावेळी सुभाष देशमुख, सचिन कल्याणशेट्टी, देवेंद्र कोठे या आमदारांसह उमाकांत आचवले (चाकूर), आदिनाथ सांगवे (लातूर),माधवराव पाटील (लातूर),माधवराज पाटील (लातूर), प्रदीपकुमार दिंडेगावे (लातूर) आदींचा यावेळी सन्मान करण्यात येणार आहे. या गौरव समारंभास माजी खा. डॉ. जयसिध्देश्वर शिवाचार्य महास्वामीजी, नागणसूरचे श्रीखंड शिवाचार्य महास्वामीजी, मैंदर्गीचे नीलकंठ शिवाचार्य महास्वामीजी, बृन्हमठ होटगी मठाचे बाल तपस्वी चेन्नयोगिराजेंद्र शिवाचार्य स्वामीजी, शरणाप्पा स्वामी हिरेमठ, सिध्दया स्वामी हिरेमठ, बसवराज शास्त्री हिरेमठ, शिवयोगी शास्त्री हिरेमठ, विश्वजित नंदीमठ शेळगी यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

या गौरव समारंभास उपस्थित राहण्याचे आवाहन देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष जगदीश पाटील, ट्रस्टी ॲड. केदार पाटील यांनी केले आहे.

# घनकचरा वर्गीकरणासाठी १ लाख ८० हजार मिळकतींवर लावले क्यूआर कोड

## सुमारे २.९१ लाख मिळकतींवर लावणार कोड, २००हून अधिक कर्मचारी कार्यरत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**

घनकचरा वर्गीकरणासाठी आता शासनाच्या माध्यमातून महापालिका क्षेत्रात क्यूआर कोड पद्धतीची नवी नियंत्रण प्रणाली राबविण्यात येत आहे. या अंतर्गत शहरातील प्रत्येक घर , व्यवसायिक आस्थापनासह सर्व मिळकतींवर क्यूआर कोड लावण्यात येणार आहेत. आतापर्यंत एकूण १ लाख ८० हजार मिळकतींवर हा क्यू आर कोड लावण्यात आला आहे. यासाठी दोनशेहून अधिक कर्मचारी कार्यरत आहेत.

घनकचरा व्यवस्थापनामध्ये सुधारणा करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून विविध उपाययोजना वेळोवेळी राबविल्या जातात. याचाच एक भाग म्हणून घनकचरा व्यवस्थापन व शहर स्वच्छतेच्या कामांच्या परिणामकारक व्यवस्थापनाकरीता राज्यातील ड वर्ग महानगरपालिका तसेच सर्व नगर परिषद नगर पंचायतमध्ये




माहिती तंत्रज्ञानावर आधारित प्रणालीचा आयसीटी बेस्ड ( ) वापर आवश्यक असल्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. केंद्र शासनाच्या आयटीआय लिमिटेड कंपनीमार्फत एक नवीन तंत्रज्ञान विकसित करण्यात आले आहे. या अंतर्गत शहरातील प्रत्येक मालमत्तेवर एक विशिष्ट प्रकारचे क्यूआर कोड , ओला व सुका कचरा डब्यांवर दोन क्यूआर कोड या कंपनी मार्फत लावण्यात येणार आहे. तसेच या सोबत क्यूआर कोड लावण्याबरोबरच नागरिकांना कचरा वर्गीकरणबाबत माहितीचे पँप्लेट सुद्धा देण्यात येत आहेत.

### आयटीआय लिमिटेडने केली प्रणाली विकसित : सुषमा वाघ

केंद्र शासनाच्या संचार मंत्रालयाच्या अखत्यारीतील सार्वजनिक क्षेत्रातील कंपनी आय टी आय लिमिटेड यांच्याद्वारे प्रणाली विकसित केली गेली असून महाराष्ट्र शासनाद्वारे जारी शासन निर्णयाच्या अनुषंगाने प्रणाली शहरात कार्यान्वित केली जात आहे. आतापर्यंत शहरातील एकूण १ लाख ८० हजार मिळकतींवर क्यू आर कोड लावण्यात आला आहे. या प्रकल्पासाठी दोनशेहून अधिक कर्मचारी कार्यरत आहेत, अशी माहिती आयटीआय लिमिटेड अंतर्गत या प्रकल्पाच्या व्यवस्थापिका सुषमा वाघ यांनी दिली.

### रिअल टाइम मॉनिटरिंग शक्य होणार

या टेक्नॉलॉजीच्या माध्यमाने शहरातील घनकचरा संकलन प्रक्रियेचे रिअल टाइम मॉनिटरिंग शक्य होणार आहे. प्रणालीद्वारे घंटागाडी आली अथवा नाही, कचरा घेतल्या गेला किंवा नाही, शहरातील किती नागरिकांनी कचरा वर्गीकृत किंवा मिश्र दिला अथवा कचरा दिला नाही याबाबत रिअल टाइम माहिती तसेच डम्प यार्ड मध्ये किती कचरा जमा आहे व त्यापैकी किती ओला व किती सुका कचरा आहे असे अनेक प्रकारचे महत्वपूर्ण रिपोर्ट्स महानगरपालिकेस उपलब्ध होणार आहे, असेही प्रकल्पाच्या व्यवस्थापिका सुषमा वाघ यांनी सांगितले.

या प्रणालीमध्ये विविध पद्धतीने नियंत्रण ठेवण्याची सुविधा सुद्धा उपलब्ध आहे. त्याच सोबत शहरातील झाडण्याची नियंत्रण प्रणाली व लिक्विड वेस्टचे स्वच्छता नियंत्रण प्रणाली सुद्धा या प्रणालीमध्ये समावेश करण्यात येणार आहे. यामुळे दैनंदिन करण्यात येणाऱ्या कचरा संकलनामध्ये सुधारणा करण्यास मदत होऊ शकणार आहे.

या नव्या प्रणालीचा शुभारंभ महापालिकेचे नूतन अतिरिक्त आयुक्त रवि पवार, उपायुक्त तैमूर मुलाणी, मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, सफाई अधीक्षक अनिल चराटे तसेच आयटीआय कंपनीचे प्रतिनिधी यांच्या उपस्थित महापालिका प्रशासकीय इमारतीच्या समोरील बाजूस पहिले क्यूआर कोड लावून करण्यात आला होता. शहरातील सुमारे दोन लाख ९१ हजार मिळकतींवर हे क्यू आर कोड लावण्यात येणार आहेत.

## संक्षिप्त वृत्त

### दै. तरुण भारतचे उपसंपादक किरण बनसोडे यांना कै. बाबुराव भूमकर पत्रकारिता पुरस्कार जाहीर

#### ८ जानेवारीला वितरण



**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**

पत्रकार दिनाचे औचित्य साधून येथील सहस्त्रार्जुन शैक्षणिक संकुलातर्फे संकुलाचे संस्थापक अध्यक्ष 'कै. बाबुरावसा दत्तात्रयसा भूमकर पत्रकारिता पुरस्कार' संस्थेचे अध्यक्ष संजीव बिद्री यांनी जाहीर केले आहेत. दै. तरुण भारतचे उपसंपादक किरण बनसोडे यांच्यासह पत्रकारांचा या पुरस्काराने गौरव करण्यात येणार आहे. बुधवार दि. ८ जानेवारी रोजी दुपारी १२.३० वा. श्रीशैल्य नगर,भवानी पेठ येथील सहस्त्रार्जून शैक्षणिक संकुल सभागृह येथे पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे. हा कार्यक्रम सहस्त्रार्जुन शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष राजू भुमकर यांच्या हस्ते तर सो.स.क्षत्रिय समाज विठ्ठल मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष संजीव बिद्री यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला आहे. या समारंभास प्रमुख अतिथी म्हणून सचिव गजानन गोयल, जयकुमार कोल्हापुरे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या समारंभास उपस्थित रहावे, असे आवाहन सो.स.क्षत्रिय समाज (विठ्ठल मंदिर)ट्रस्टचे अध्यक्ष संजीवसा बिद्री यांनी केले आहे.


**हे आहेत पुरस्काराचे मानकरी**

किरण बनसोडे (तरुण भारत), संगमेश्वर जेऊरे (दैनिक पुढारी), प्रसाद दिवाणजी (तरुण भारत संवाद),अनिल कदम (दैनिक संचार), विक्रम पाठक (दैनिक सकाळ), उमेश कदम (दिव्य मराठी), शीतलकुमार कांबळे (लोकमत), शिवाजी सुरवसे (येस न्यूज),श्रीनिवास गाजूल( पुण्यनगरी), अजित उंब्रजकर (सुराज्य), रोहित थळवे (इन सोलापूर), सागर सुरवसे (टीव्ही नाईन), आदित्य केंगार (बि.आर. न्यूज) यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल व फेटा असे पुरस्काराचे स्वरूप आहे.



### गुजराती मित्र मंडळाच्या नूतन वर्ष दिनदर्शिकेचे अनावरण

**सोलापूर : गुजराती मित्र मंडळाद्वारे नुतन वर्षाचे दिनदर्शिकेचे अनावरण ज्येष्ठ पत्रकार सौरभभाई शाह यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी छायाचित्रांत डावीकडून खजिनदार चिमणभाई पटेल, उपाध्यक्ष मणिकांत दंड, अध्यक्ष मुकेश मेहता, सचिव जयेश पटेल, सहसचिव संदीप जव्हेरी**



### येशू ख्रिस्त जन्मोत्सव

**सोलापूर : हुतात्मा स्मृती मंदिरात येशू ख्रिस्त जन्मोत्सव नाट्य प्रयोग सादर करण्यात आला.**

**(छायाचित्र : केवल तिवारी)**

# दागिना हा स्त्री सौंदर्याचा आविष्कार : सुवर्ण चौरे

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**

''सरत्या वर्षाच्या पूर्वसंध्येला स्त्री सौंदर्यात भर घालणाऱ्या औरंगाबादकर सराफी पेढीने मोत्यांच्या दागिन्यांचा नजराणा नव्या वर्षाच्या प्रारंभानिमित्त सादर करून श्री सौंदर्याच्या अविष्कारांची जणू ओटीच भरली आहे'' असे गौरवोद्गार निसर्गवारी कृषी पर्यटन केंद्र च्या संचालिका सौ सुवर्णा चौरे यांनी काढले आज सकाळी हॉटेल ऐश्वर्या येथे मोत्यांच्या दागिन्यांचा प्रदर्शनाच्या शुभारंभ प्रसंगी त्या बोलत होत्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सिद्धेश्वर सहकारी बँकेचे संचालक पशुपती माशाळ यांच्या सौभाग्यवती मीनाताई माशाळ होते.

अस्सल मोती आणि रत्ने म्हणलं की, ग्राहकांच्या तोंडी नाव येतं ते १७८वर्षांची अखंड परंपरा लाभलेल्या औरंगाबादकर सराफांचंच यावेळी सुमारे ३०० वर्षांचा इतिहास असलेल्या मराठमोळ्या मोत्यांच्या दागिन्यांना थीम




**सोलापूर : औरंगाबादकरांच्या सराफी पेढीतर्फे आयोजित मोत्यांच्या दागिन्यांचा प्रदर्शनाचा शुभारंभ हॉटेल ऐश्वर्या येथे दीपप्रज्वलनाने झाला. यावेळी सुवर्णा बिभीषण चौरे, मीना आणि पशुपती माशाळ, प्रशांत बडवे, गौरी वैद्य भुवनेश्वर व सुवर्णा औरंगाबादकर आदी.**

यावेळी साकारून यंदा पारंपारिक दागिने प्रामुख्याने उप्लब्ध केले आहे.

मराठमोळ्या दागिन्यांत यावेळी वज्रटिक, चिंचपेटी, मोत्याचा लफ्फा, तन्मणी, पेंड, बाजीराव नथ, पारंपरिक नथ, बानू नथ ,वेल झुब्बा शबाना, कॉलर, रामराज तोडे, कंगन, फुलतोडा, राणीहार ,चोकर,साज, पुतळी हार, ठुशी, गरसळी, मोत्यांच्या कुड्या, बुगडी, वाकी, बाजूबंद आदी व्हरायटी उपलब्ध आहेत.

काळानुसार होणाऱ्या बदलांची नोंद घेऊन त्यानुसार नव्या डिझाइनचे दागिने सुद्धा इथे उपलब्ध करून देत आहेत, हे प्रदर्शन ६ जानेवारी पर्यंत हॉटेल ऐश्वर्या येथे सर्वांसाठी खुले आहे.

प्रारंभी मोहन वैद्य यांनी प्रास्ताविक केले याप्रसंगी प्रसिद्ध उद्योजक संजय रघोजी, संदीप पंढरपूरला, संतोष दिवाण, प्रशांत बडवे महेश रायखेलकर, प्रमोद तम्मनवार, मनोज पत्की आदी उपस्थित होते.

# ज्येष्ठांच्या संयुक्त शिखर समिती अध्यक्षपदी प्रा. विलास मोरे

## सचिवपदी कोनापूरे यांची निवड



प्रा. विलास मोरे



अरूण कदम



मन्मथ कोनापुरे



जयश्री जहागीरदार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर -**

शहरातील विविध भागात कार्यरत ज्येष्ठ नागरिक संघटनांमध्ये समन्वय साधण्यासाठी सक्रिय असलेल्या ज्येष्ठ नागरिक संघटना संयुक्त शिखर समितीच्या अध्यक्षपदी प्रा. विलास मोरे, उपाध्यक्षपदी अरुण कदम, जयश्री जहागीरदार तर सचिवपदी मन्मथ कोनापुरे यांची एकमताने निवड करण्यात आली.

डफरिन चौकातील सारस्वत ब्राम्हण मल्टिपर्पज सभागृहात पार पडलेल्या बैठकीस शहरातील विविध भागात कार्यरत असलेल्या १६ ज्येष्ठ नागरिक संस्थांचे प्रतिनिधी आवर्जून उपस्थित होते. प्रारंभी गुरुलिंग कन्नूरकर यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन आपल्या प्रास्तविकाद्वारे सभेचा उद्देश विषद केला. मन्मथ कोनापुरे यांनी विषय पत्रिकेचे वाचन करून विषयवार चर्चेत सहभागाची विनंती केली. समितीच्या कार्यकारी मंडळाचे सन्माननिय सदस्य म्हणून सोलापुरातील प्रत्येक ज्येष्ठ नागरिक संघटनांचे विद्यमान अध्यक्ष व सचिव यांना स्थान देण्याचा निर्णय एकमुखाने घेण्यात आला. यात दोन महिला सदस्य असणेही अनिवार्य करण्यात आले. पुरुशोत्तम बगले यांनी आभार मानले.

### नुतन पदाधिकारी असे

अध्यक्ष - प्रा. विलास मोरे, उपाध्यक्ष -अरुण कदम, श्रीमती जयश्री जहागीरदार, सचिव - मन्मथ कोनापुरे, सहसचिव - डॉ. चन्नय्या स्वामी, सिद्राम सनके, कोषाध्यक्ष - प्रा. कृष्णात देवकर, सहकोषाध्यक्ष - बाळासाहेब पाटील, समन्वयक - गुरूलिंग कन्नूरकर, सल्लागार - महादेव माने.










हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/**. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक 2025

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.






## संक्षिप्त वृत्त...

### वीरभद्रेश्वर यात्रा कमिटी अध्यक्षपदी शिवलिंग शहाबादे

**सोलापूर, दि.३१ डिसेंबर-**

शिवयोग धाम सेवा समितीचे अध्यक्ष राजशेखर हत्ती यांच्या मार्गदर्शनाखाली गौडगाव महाराजांच्या मठात यात्रेच्या नियोजनाच्या बैठकीत शेळगीचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते शिवलिंग शहाबादे यांची वीरभद्रेश्वर यात्रा कमिटी अध्यक्ष पदी सर्वांनुमते निवड झाली. प्रा. सुरेश तानवडे स्वागत करुन प्रास्ताविक केले. माजी खासदार तथा मठाध्यक्ष शिवाचार्य रत्न प.पू. डॉ.जय सिद्धेश्वर महास्वामीजींच्या हस्ते शहाबादे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी चंद्रकांत रमणशेट्टी, सोमनाथ रगबळे, महादेव पाटील, बसवराज इटकळे, महाशिवलिंगप्पा परम शेट्टी, विश्वनाथ होसाळे, सुरेश हत्ती, चौडप्पा भैरामडगी, विश्वनाथ हणमशेट्टी, शिवानंद सरसंबी, आप्पासाहेब विभुते, स्वामीनाथ पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. पंचप्पा मेणसे यांनी आभार मानले.



### साईबाबा चौकात ७० हजारांची घरफोडी

**सोलापूर, दि.३१ डिसेंबर-**

हैदराबाद येथे कुटुंबीयांसह देवदर्शनासाठी गेल्यावर अज्ञात चोरट्यांनी घरातील ७० हजार रुपयांचे सोने चांदी लंपास केले आहे. ही घटना २४ ते ३० डिसेंबरच्या दरम्यान न्यू पाच्छा पेठ, साईबाबा चौक सोलापूर याठिकाणी घडली आहे. याबाबत अंबादास सायण्णा येमुल (वय ४५, रा. न्यू पाच्छा पेठ,साईबाबा चौक)यांनी फिर्याद दिली असून जेलरोड पोलिसांत ३० डिसेंबर रोजी मध्यरात्री अज्ञातावर गुन्हा नोंद झाला आहे. फिर्यादी हे कुटुंबीयांसह देवदर्शनासाठी हैद्राबाद येथे गेले होते. घर बंद होते. अज्ञात चोरट्याने घराचे कुलूप व दरवाज्याचा कडी कोयंडा तोडून घरात प्रवेश केला. घरातील लोखंडी कपाटातील ७० हजार ५८० रुपयांचे सोनं चादीचे दागिने लंपास केले. याप्रणाचा तपास सहा पोलिस निरीक्षक सोनवणे करीत आहेत.

### सृजनरंग स्पर्धेत माणदेश नियतकालिकेस सहा पारितोषिके

**सांगोला, दि.३१ डिसेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर येथे आयोजित सृजनरंग नियतकालिक २०२३-२४ स्पर्धेमध्ये सांगोला महाविद्यालयाच्या माणदेश नियतकालिकेस सहा पारितोषिके प्राप्त झाली. यामध्ये मराठी विभाग काव्यात्म लेखन तृतीय शिवानी होळकर, कथात्म लेखन तृतीय शुभम गरंडे, हिंदी विभाग कथात्म लेखन प्रथम गुलामगौस तांबोळी, इंग्रजी विभाग काव्यात्म लेखन प्रथम सानिका माने, चित्रकला विभाग प्रथम योगराज भोसले आणि मुखपृष्ठ विभाग द्वितीय योगराज भोसले अशी सहा पारितोषिके प्राप्त झाली. या यशाबद्दल प्रा.डॉ. विद्या जाधव व प्रभारी प्राचार्य डॉ. सुरेश भोसले यांचे संस्था अध्यक्ष बाबुरावजी गायकवाड, उपाध्यक्ष प्रा.पी. सी.झपके, सचिव ॲड.उदय घोंगडे व सर्व संस्था सदस्यांनी कौतुक केले. हे माणदेश पूर्ण करण्यासाठी डॉ. सुरेश भोसले, कार्यालयीन अधीक्षक प्रकाश शिंदे यांनी सहकार्य केले.

### पदवीधर प्राथमिक शिक्षक संघटना जिल्हाध्यक्षपदी जाधव

**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**

महाराष्ट्र राज्य पदवीधर प्राथमिक शिक्षक व केंद्रप्रमुख संघटना जिल्हा शाखा सोलापूरच्या जिल्हाध्यक्षपदी गिरीश जाधव यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. संघटनेची जिल्हा कार्यकारिणीची सभेत जिल्हा कार्याध्यक्षपदी दत्तात्रय येडवे, शिक्षक नेतेपदी रामचंद्र बिराजदार, जिल्हा सरचिटणीसपदी मनोज ठोंबरे यांच्या निवडी करण्यात आल्या. यावेळी राज्य प्रतिनिधी अनिल गुंड, ज्येष्ठ नेते ह. न.पाटील, संजय बिदरकर, पाटील, संजीदाबानो मुल्ला आदी शिक्षक, शिक्षिका उपस्थित होते. पदवीधर शिक्षक व केंद्रप्रमुख यांचे अनेक प्रश्न जिल्हा व राज्य स्तरावर प्रलंबित आहेत. त्यांची सोडवणूक करण्यासाठी जिल्हा कार्यकारिणी गांभीर्यपूर्वक काम करेल तसेच राज्यस्तरावरच्या प्रश्नांसंदर्भात राज्य कार्यकारिणीकडे योग्य तो पाठपुरावा करण्यात येईल असे नूतन जिल्हाध्यक्ष गिरीश जाधव यांनी याप्रसंगी सांगितले. यावेळी नूतन पदाधिका-यांचा सत्कार करण्यात आला. पूर्वीचे जिल्हाध्यक्ष राम बिराजदार यांनी संघटनेसाठी केलेल्या कार्याचा गौरव करण्यात आला.



शासनाच्या योजना तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी

# ‘थर्ड पार्टी’कडून आता होणार ‘क्रॉस टॅली’

**जिल्हाधिकाऱ्यांचा हटके पॅटर्न**

**रेशन कार्डधारक, लाडक्या बहिणींशी थेट संवाद साधणार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**

केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी शासकीय कर्मचारी-अधिकारी नीट करतात का? योग्य लाभार्थ्यांना त्याचा लाभ मिळतो का? हे पाहण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात ‘कॉल सेंटर’ उभारणी करून याद्वारे क्रॉस टॅली करण्याची आगामी वर्षासाठी संकल्पना त्यांच्या सहकाऱ्यांसमोर एका बैठकीद्वारे मांडली आणि त्यास सर्वांनी होकारही दिला आहे. या जिल्हाधिकाऱ्यांच्या हटके पॅटर्नमुळे योग्य त्याच लाभार्थ्यांना शासनाच्या योजनेचा लाभ मिळणार आहे. इतकेच नाहीतर जिल्हाधिकारी स्वत:ही अधून-मधून थेट अशा लाभार्थ्यांशी संवाद साधणार आहेत.

ज्याप्रमाणे राज्य सरकारचे ‘आपले सरकार’ पोर्टल आहे; त्याच धर्तीवर जिल्हाधिकाऱ्यांची ही कॉलसेंटर यंत्रणा राबविण्यात येणार आहे. यासाठी आता लवकरच ई-टेंडरिंग प्रक्रिया होणार आहे. या खाजगी कर्मचाऱ्यांवर कंट्रोल करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची एक टीमही राहणार आहे. या कॉल सेंटरमधील खाजगी कर्मचारी जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानाचे ग्राहक, लाडक्या बहिणी आणि इतर योजनांच्या लाभार्थ्यांशी रोजच संवाद साधणार आहेत. ज्या लाभार्थी नागरिकांना आजपर्यंत धान्यच मिळाले नाही, मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेसाठी पात्र असतानाही ज्यांना या योजनेचा लाभ मिळाला नाही, त्यांचीही दखल घेवून त्यांची कामे गतीने याद्वारे मार्गी लागणार आहेत. पैसे खात्यावर येवूनही काही लाडक्या बहिणींचे पैसे बँकांकडून देण्यात येत नसतील तर त्याचीही माहिती घेण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील ११ तालुक्यातील नागरिक आपल्या अडचणी, तक्रारी थेट या पोर्टलकडे करू शकतात. या कॉलसेंटरमधून सामान्य नागरिकांनाही आता थेट आपल्या समस्या मांडण्याची संधी मिळणार आहे. पिकविमा, ईकेवायसी, दुष्काळी मदत, कामगार कार्ड, राशन कार्ड नसणे अशा तक्रारींचा निपटारा याद्वारे होणार आहे. या कॉल सेंटरला संबंधित शासकीय अधिकारी काही प्रश्नावली तयार करून देणार असून, त्या प्रश्नांद्वारे रोजच जिल्ह्यातील सामान्य नागरिकांशी ते थेट संवाद साधणार आहेत. इतकेच नाहीतर जिल्हाधिकारी आशीर्वाद हे देखील स्वत:ही अधून-मधून जिल्ह्यातील राशन कार्डधारक, लाडक्या बहिणींशी थेट संवाद साधणार असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून मिळाली. एकंदरीत, शासनाच्या कल्याणकारी योजना तळागाळातील योग्य लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठीचा हा प्रयोग राहणार असून, याचा फायदा योग्य लाभार्थ्यांनाच होणार आहे.





**जिल्हाधिकारी कार्यालयात सुरू केल्या ‘व्हिजीटर नोंदी’**

सर्वसामान्य नागरिकांनी जिल्हाधिकारी कार्यालयाला भेट दिल्यावर कोणत्या विभागाकडे ते आले, त्यांचे नाव, मोबाईल नंबर, कामाचे स्वरूप आदी सुक्ष्म बाबींच्या व्हिजीटर नोंदीही घेण्यास जिल्हाधिकाऱ्यांनी चालू केले आहे. या रजिस्टरद्वारेही सामान्य नागरिकांची कामे आता गतीने मार्गी लागणार आहेत. एखादा व्हिजीटर वारंवार येवूनही त्यांचे काम झाले नसेल तर तेही या रजिस्टर नोंदीतून निष्पन्न होते. यामुळे आता जिल्हा प्रशासनातील प्रत्येक कर्मचाऱ्यांना सर्व सामान्य नागरिकांची कामे गतीनेच करावी लागणार असून, प्रत्येक विभागात आगामी वर्षांपासून झिरो पेंडन्सीच दिसून येणार आहे.




## कुत्र्याला वाचविण्याच्या प्रयत्नात दुचाकी घसरून १७ वर्षाच्या बालकाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर -**


दुचाकी चालविताना कुत्रा आडवा येऊन घसरून पडलेल्या सतरा वर्षाच्या बालकाचा मृत्यू झाला. सात नोव्हेंबर रोजी अप्सरा हॉटेल समोर हा अपघात घडला. मुस्तकिम अनिस बागवान (वय १७, रा. बेगम पेठ, सोलापूर) असे अपघातात मृत्यू पावलेल्या बालकाचे नाव आहे. ७ नोव्हेंबर रोजी दुपारी दोन वाजता मुस्तकिम व त्याचा मित्र दोघे दुचाकीवर बसून जात होते. बेगम पेठेतील अप्सरा हॉटेल समोर आल्यावर आडवा कुत्रा आल्याने त्याला वाचविण्याच्या प्रयत्नात दुचाकी घसरून मुस्तकीम व त्याचा मित्र खाली पडले. दरम्यान रस्त्याच्या कडेला असलेल्या ब्युटी पार्लरच्या फलकास जाऊन धडकले यामुळे मुस्तकींच्या डोक्याला गंभीर जखम झाली. तर यातील फिर्यादी यदुल्ला इम्रान बिदरी हा दोन्ही गुडघ्यास मार लागून जखमी झाला. अपघातानंतर गंभीर जखमी झालेला मुस्तकीम याचा मृत्यू झाला. या घटनेत मुस्तकिम स्वतःच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास हवालदार परीट करत आहेत.

## काँग्रेसचे माजी शहराध्यक्ष प्रकाश वाले भाजपच्या वाटेवर

**पक्षातून हकालपट्टी करा : काँग्रेसच्या रसाळे यांची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३१ डिसेंबर-**

काँग्रेस पक्षाचे माजी शहराध्यक्ष प्रकाश वाले यांनी काँग्रेस पक्षाला सोडचिट्टी देत भाजपची वाट धरली आहे. लवकरच ते भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याचे कळल्यानंतर काँग्रेस पक्षामधून वाले यांच्या विरोधात तीव्र प्रतिक्रिया दिल्या जात आहेत. काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष सुनील रसाळे यांनी वाले यांच्यावर टीका करताना ज्या काँग्रेस पक्षाने आणि सुशीलकुमार शिंदे यांनी वाले यांना प्रत्येकवेळी प्रतिष्ठा,आणि महत्त्वाची पदे बहाल केली. ज्यावेळेस ते नगरसेवक निवडणुकीत उभारले होते तेव्हा त्यांचा पराभव त्यानंतर सुशीलकुमार शिंदे यांनी त्यांना नवी उभारी काँग्रेस शहराध्यक्ष पद तसेच सिद्धेश्वर बँकेच्या चेअरमनपदी विराजमान झाले. आमच्यासारख्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना बाजूला ठेवून शिंदे यांनी वाले यांना भरभरून प्रेम दिले. ज्या व्यक्तीने कधीही काँग्रेस पक्षाची शाखा उघडली नाही. शिंदे साहेबांच्या सहकार्याशिवाय साधे कसबा गणपतीचे अध्यक्षपदी त्यांना मिळाले नसते. दरम्यान, नगरसेवक निवडणूक हरल्यानंतर तेव्हा शिंदे साहेब यांनी त्यांवर शहराध्यक्ष पदाची मोठी जबाबदारी दिली. यानंतर देखील त्यांनी काँग्रेस पक्ष विरोधी कामकाज केले. मागील लोकसभा निवडणुकीत त्यांनी भाजपचे उमेदवार जय सिद्धेश्वर महास्वामी यांना सहकार्य केलं. त्यांच्या वार्डामध्ये काँग्रेसला कधीही मताधिक्य मिळाले नाही. कोरोना झाला नसता तरीही कोरोना झाला म्हणून खोटे प्रसार केला. केवळ आपल्या मुलाच्या भवितव्यासाठी ते भाजप प्रवेश करत आहेत. अशा व्यक्तीची काँग्रेस पक्षामधून तात्काळ हकालपट्टी करावी अशी मागणी शिंदे साहेबांकडे केली असेही सुनील रसाळ यांनी यावेळी सांगितले.



**रसाळे यांना फारसे महत्त्व देत नाही**

भाजप पक्ष प्रवेश निश्चित आहे. यासंबंधी लवकरच कळवले जाईल. रसाळे यांच्या निरर्थक बोलण्याकडे मी लक्ष देत नाही. त्यांना फारसे महत्त्व देत नाही.

**- प्रकाश वाले, माजी शहराध्यक्ष काँग्रेस.**

**पक्षप्रवेशासंदर्भात चर्चेअंती निर्णय**

वाले यांची भाजप पक्षप्रवेश संदर्भात आमच्याशी कोणतीही चर्चा झाली नाही. आ.विजयकुमार देशमुख यांच्या सोबत प्राथमिक चर्चा झाल्याचे सांगण्यात आले. त्यांना पक्षप्रवेशाची इच्छा असल्यास भेट घेतील, त्यावर चर्चा होईल.

**- नरेंद्र काळे, शहराध्यक्ष भाजप.**


## आजपासून दळण महागणार; ६ ते १५ रुपये किलो असेल दर

**कांडपाचे दर ६० ते ८० रुपये किलो : गिरणी मालक संघटनेचा निर्णय**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**

शहर जिल्हा पीठ गिरणी मालक सर्वोतोपरी कल्याणकारी मंडळाची बैठक अध्यक्ष अभिमन्यू शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या सभेत वाढलेली वीज दरवाढ, महागाई आणि जात्याचे दुपटीने वाढलेले भाव व इतर उपसाधने व मजुरी यांच्यातील दुपटीने झालेल्या दरवाढीमुळे दळणारे दर १ जानेवारी २०२५ पासून वाढविण्याचे ठरविण्यात आले.

यावेळी उपाध्यक्ष मल्लिनाथ जाधव, मल्लिनाथ कुलकर्णी, नेताजी मेरगू, रुकमोद्दीन सय्यद, मुर्तुजा सलोटगी, स्वामीराज शीलवंत, रवी बेडगू, सलीम शेख, सिद्धेश्वर चिमलगी, राजू लोकापुरे, चंद्रशेखर आडकुळे, वानकर काटेवे, कोळेकर उपस्थित होते.



**असे आहेत दळणाचे नवीन दर**

| धान्याचे प्रकार | परिमाण | दर रु. पैसे |
|---|---|---|
| गहू | १ किलो | ६ रुपये |
| ज्वारी | १ किलो | ७ रुपये |
| बाजारी, मका, तांदूळ, दाळ, इतर कडधान्ये | १ किलो | १५ रुपये |

**असे आहेत कांडपाचे दर**

| प्रकार | परिमाण | दर रु. पैसे |
|---|---|---|
| लाल मिरची | १ किलो | ६० रुपये |
| मसाला मिरची | १ किलो | ८० रुपये |
| धने, हळद, इतर मसाला | १ किलो | ७० रुपये |



## ‘देशी गायीं’च्या अनुदान योजनेला ५ जानेवारीपर्यंत मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ३१ डिसेंबर-**

गोशाळांमध्ये ठेवण्यात येणाऱ्या देशी गायींच्या पालन पोषणासाठी प्रति दिन, प्रति गाय पन्नास रुपये अनुदान देण्यात येणार आहे. योजनेसाठी महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडे नोंदणीकृत व सदर शासन निर्णयामधील नमुद निकषानुसार पात्र गोशाळा, गोसदन पांजरापोळ व गोरक्षण संस्थांनी दि. ०५ जानेवारी २०२५ रोजीपर्यंत ऑनलाईन अर्ज करावा असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, डॉ. विशाल येवले यांनी केले आहे.

सदर योजनेचा उद्देश व स्वरुप, अनुदान पात्रतेच्या अटी व शर्ती, योजनेची अंमलबजावणी, तसेच योजनेचा ऑनलाईन अर्ज व त्यासोबत जोडावयाची अनुषंगिक कागदपत्रे इत्यादी बाबतची सविस्तर माहिती www.mahagosevaayog.org d https//schemes.mahagosevaayog.org या संकेतस्थळावर उपलबध करुन देण्यात आलेली आहे.

पशुसंवर्धन विभागाच्या दि. ८ ऑक्टो. २०२४च्या शासन निर्णयातील नमूद पात्रतेच्या अटीनुसार इच्छुक पात्र संस्थांनी ऑनलाइन पध्दतीने विहित नमुन्यातील अर्ज उपरोक्त संकेतस्थळावर दि. ५ जानेवारी २०२५ रोजीपर्यंत ऑनलाईन सादर करावेत. महाराष्ट्र गोसेवा आयोग कार्यालयाकडे थेट प्रस्ताव सादर केलेला तसेच ई-मेल किंवा तत्सम द्वारे सादर केलेले अर्ज ग्राहय धरले जाणार नाहीत. असे आवाहनही जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, डॉ. विशाल येवले यांनी केले आहे.

## विवाहितेच्या छळप्रकरणी दोन गुन्ह्यांत ११ जणांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर -**

हैद्रा,(अक्कलकोट) व पुणे याठिकाणी विवाहितेस शारिरीक व मानसिक त्रास देवून जाचहाट केला, याप्रकरणी दोन्ही ठिकाणाच्या सासरकडील एकुण ११ जणांवर एम आयडीसी पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे. पहिल्या वैष्णवी सागर बोगा (वय २९ रा. न्यू सुनिल नगर,एमआयडीसी सोलापूर) या २६ नोव्हेंबर २०२१ ते १० जून २०२३ दरम्यान सासरी पुणे येथे नांदत होत्या. तीस सासरच्या मंडळींनी मानसिक त्रास व जाच करून छळ केला. यावरून विवाहित महिलेने दिलेल्या फिर्यादीवरून पती सागर बोगा, सासरे भारत बोगा, सासू अन्नपूर्णा, दीर गोवर्धन,जाऊ राजश्री, नणंद माधुरी(सर्व रा. वाघोली,बकोरी रोड,पुणे) यांच्यावर एमआयडीसी पोलिसांत ३० डिसेंबर रोजी गुन्हा दाखल झाला आहे. दुसऱ्या घटना ३ जून ते २२ जुलै दरम्यान हैद्रा अक्कलकोट येथे घडली आहे. मुबशीरीन सोहेल मुजावर (वय २० रा. सितारा चौक, विजय नगर नई जिंदगी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पती सोहेल, सासरे बाबुलाल, सासू नूरजहॉं, नणंद सना, नणंदेचे पती मस्जिद शेख (रा हैद्रा ता अक्कलकोट) यांच्यावर गुन्हा नोंद झाला आहे. या दोन्ही प्रकरणाचा तपास पोलिस हवालदार गायकवाड व पवार हे करीत आहेत.



## आंतरराज्य सराईत गुन्हेगारास अटक; २ लाखांचा मुद्देमाल जप्त

**२ गुन्हे उघडकीस; शहर गुन्हे शाखेची कारवाई**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर -**

महाराष्ट्र राज्यासह गुजरात व मध्य प्रदेशात चोरी करणारा सराईत गुन्हेगार शहर गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केला. त्याने सोलापुरात केलेल्या दोन गुन्ह्यांची उकल करत १ लाख ९३ हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला.

सॅमसन रुबेन डॅनियल (वय २६, रा. डॅनिअल हाऊस, रूम नं. ५, बेतुरकरपाडा क्वालिटी कंपनी जवळ, कल्याण वेस्ट, ठाणे) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. सॅमसन डॅनियल हा दिवसा घरफोडी करणारा गुन्हेगार आहे. डॅनियलने सोलापुरसह ठाणे, रत्नागिरी, सांगली, जळगाव तसेच गुजरात व मध्य प्रदेशात त्याने घरफोडीचे गुन्हे केले आहेत. सोलापुरातील सदर बझार पोलीस स्टेशनच्या हद्दीतील दोन घरफोडीत त्याने ४८.१३ ग्रॅम सोने, ३४ ग्रॅम चांदी व एक मोबाईल असा एक लाख ९३ हजारांचा मुद्देमाल चोरला होता. या गुन्ह्याचा तपास करताना शहर गुन्हे शाखेच्या पथकाला सगुना सॅमसन डॅनियल याने केला असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार त्याचा शोध घेऊन त्यास ताब्यात घेतले. त्याच्याकडे या गुन्ह्या संदर्भात केलेल्या चौकशीत त्याने गुन्हयाची कबुली दिली. यानंतर पथकाने त्याच्याकडील सोन्याचे व चांदीचे दागिने हस्तगत केले.

ही कामगिरी पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उपायुक्त डॉ. दिपाली काळे, सहाय्यक पोलीस आयुक्त राजन माने, पोलीस निरीक्षक सुनील दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक संदीप पाटील, पोलीस अंमलदार विजयकुमार वाळके, विद्यासागर मोहिते तात्यासाहेब पाटील, निलोफर तांबोळी, गणेश शिंदे, सतिश काटे यांनी केली.



## ज्ञानामृत आनंदलहरी - ९९१

**मान अपमान गोवें । अवघे गुंडूनी ठेवावें ।।**

मान अपमान ह्या मानवी जीवनात चढ उतार करणाऱ्या प्रमुख बाबी आहेत. आपल्या वाट्याला अपमान यावा असे कोणालाही वाटत नाही. मानाच्या प्राप्तीसाठी सर्वांची धडपड असते. विशिष्ट स्थळी, विशिष्ट काळीच मान मिळावा अशी अपेक्षा न ठेवता प्रत्येक ठिकाणी मान मिळावा अशी अपेक्षा ठेवणाऱ्यांची संख्या खूप आहे. पण असेही कांही महात्म्ये आहेत की, जे मान आणि अपमान यात फरक करीत नाहीत. मान-अपमानात फरक न करणारा म्हणजेच अभेद दृष्टीने वागणारा खऱ्या अर्थाने सुखी-समाधानी असतो. ज्याच्याकडे मान-अपमानाला स्थानच नाही, त्याच्याकडे शांती आपोआप वास करते. खरे म्हणजे माणसाला सुख समाधानासाठी, शांतीसाठीच जगावे वाटत असते. असे वाटणे तो प्रत्येक कृतीत उतरविण्यासाठी मान-अपमानाचा त्याग करीत नाही, हे माणसांचे एक खास वैशिष्ट्य आहे. केवळ कांही वाटून चालत नसते, तर त्यासाठी कांही कृतीही करावी लागते. केवळ मान होऊन सुख-समाधान मिळावे म्हटले तर चालत नाही. कारण जीवनात असे अनेक प्रसंग येतात की, जेथे अपमानालाही सामोरे जावे लागते. अपमान हा मानसाचे



मानसिक खच्चीकरण करणारा विषय आहे. शारीरिक खच्चीकरणावर औषध पाणी मिळू शकते. पण मानसिक खच्चीकरणावर सहजासहजी औषधोपचार उपलब्ध नसतो. त्यामुळे मूळात मान-अपमानात भेदच करू नये. मान-अपमानाला गुंडाळून ठेवणारा खऱ्या अर्थाने समाधानी होतो. असे समाधान हेच भगवंताचे दर्शन होय. अंतःकरणाची समाधानता, शांती हेच भगवंताचे अस्तित्व, हेच भगवंताचे दर्शन असल्याचे स्पष्ट करतांना तुकाराम महाराज म्हणतात,

**मान अपमान गोवें । अवघे गुंडूनी ठेवावें ।।**

मानाच्या प्राप्तीसाठी अनेक लोक वाट्टेल ते करीत असतात. अर्थात मान मिळावा म्हणून प्रयत्नशील असणाऱ्यांकडून बऱ्याचवेळा नको त्या गोष्टी, घटना घडून जातात. कांही लोक मानासाठी जाणून-बुजून नको ते करतात. विशेष म्हणजे असे नको ते करनही खरा मान यांना प्राप्त होत नाही. यांच्या आवती-भोवती असणारे चार-दोन भाट यांना स्वार्थापोटी मान देतात. असा व्यवहारिक मान जास्त दिवस टिकत नाही. मानाच्या मागे लागणाऱ्यांना खऱ्या अर्थाने सुख-समाधान प्राप्त होत नाही. असेही कांही महात्म्ये आपणाला पहायला मिळतात की, मान त्यांच्या मागे लागला असतांनाही ते मानाला धुडकावतात. त्यांना मानाशी कांहीच देणे-घेणे नसते. कोणी यांचा अपमान केला तरी त्यांना त्याचे कांहीच वाटत नाही. तुकोबांना केलेली मारहाण, ज्ञानदेवादी भावंडांची पावलो-पावली केलेली आडवणूक, नाथांच्या अंगावर थुंकण्याची घटना या संतांच्या अपमानाची आठवण आपणाला देतात. पण या संतांना त्याचे कांहीच वाटले नाही. म्हणूनच आज त्यांची ग्रंथसंपदा आपल्यासोर उभी आहे. आपल्यापैकी अनेक लोक अपमान सहन झाला नाही म्हणून आत्महत्येकडे वळतात, अपमानाचा बदला घेण्यासाठी समोरच्यावर हल्ला करतात. रात्रं-दिन अपमानाच्या आगीत अंतर्बाह्य जळत असतात. त्यांचे असे जळणे किंवा बदल्याची भावना जागृत ठेवणे शांती-समाधानाला कसे जवळ येऊ देईल. ज्या ठिकाणी शांती-समाधानच नाही त्या ठिकाणी भगवंताचा वास होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. आपणाला शांती-समाधानाची आवश्यकता असल्याने संतांप्रमाणे आपणही मान-अपमानातील भेद नष्ट करण्याचा प्रयत्न करु या.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : बुधवार | दिनविशेष - चांगला दिवस |
| दि. १ जानेवारी २०२५ | सुर्यनारायण मंदिर किरणोत्सव |
| विक्रम संवत् २०८०-८१ | अंबिका यात्रा नाईचाकूर |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - पौष | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. द्वितीया - (०२.२४) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - उत्तराषाढा (११.४५) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - व्याघात (०५.०५) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बालव (०२.५५) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** आपल्या कामातील नियमीतपणाच आपल्याला यश देणार आहे. दुसऱ्याच्या भरोशावर काम टाकू नका. कौटुंबिक जीवन आनंदमय राहणार आहे.

**वृषभ :** शुभकार्यात भाग घेतल्यामुळे आनंदी रहाल. शत्रूवर विजय मिळवाल. आळस झटकून कामास लागा.

**मिथुन :** धैर्यामुळे आपली सर्वात मोठ्यातली मोठी म हत्वकांक्षा पूर्ण होईल. साहस, पराक्रमात वाढ होईल.

**कर्क :** घराची समस्या दूर होईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. वायफळ बडबड करू नका.

**सिंह :** गुंतवणूकीच्या योजना फायदेशीर ठरतील. स्वाध्याय व ज्ञानात भर पडणार आहे.

**कन्या :** प्रतिष्ठीत व्यक्तिंचा संप होईल ज्यामुळे आपली प्रगती होणार आहे. भावनेच्या आधारावर कोणताही निर्णय घेऊ नका.

**तुळ :** संकोच केल्यामुळे आपल्याला निष्कारण नुकसान होण्याची शक्यता आहे. आर्थिक कामात अडचणी निर्माण होतील.

**वृश्चिक :** अनोळखी व्यक्तिच्या सहकार्यामुळे आत्मविश्वासात वाढ होईल. खर्चावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करा.योजलेले कामे पार पडतील.

**धनु :** फायद्याच्या संधी मिळून कार्यक्षमता वाढल्यामुळे उत्साह वाढणार आहे. रागावर नियंत्रण ठेवून कामे पार पाडा.

**मकर :** मान सन्मान मिळण्याच्या संधी आल्यामुळे कार्यशील रहाल. वाद विवादापासून दूर रहा. व्यापारात वेळेवर निर्णय घेऊ न शकल्यामुळे नुकसान होण्याची शक्यता आहे.

**कुंभ :** स्थावर संपत्तीबाबतचे वाद मिटल्यामुळे आनंदी रहाल. आरोग्याच्या तक्रारी दूर होतील. व्यापार व्यवसाय चांगला चालेल.

**मीन :** जवळच्या व्यक्तिची भेट झाल्यामुळे आनंदी वातावरण निर्माण होईल. आधिकारी लोकांचे सहकार्य मिळेल. मुलांच्या बाबतीत चांगल्या बातम्या ऐकावयास मिळतील.

# १५ बक्षिसे पटकावून वालचंद शिक्षण समूह अव्वल

## विद्यापीठ आविष्कार संशोधनात कामगिरी



**तभा वृत्तसेवा- सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्यावतीने वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी मध्ये आयोजित 'आविष्कार २०२४' विद्यापीठस्तरीय संशोधन महोत्सवमध्ये वालचंद शिक्षण समूहातील विविध महाविद्यालयांनी विद्यापीठस्तरीय ४८ बक्षिसांपैकी १५ बक्षिसे पटकावून वालचंद शिक्षण समूह पुन्हा एकदा अव्वल ठरला आहे.

वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी मध्ये आयोजित या महोत्सव समारोपात पारितोषिक वितरण पार पडले. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा, वालचंद शिक्षण समूहाचे विश्वस्त भूषण शहा, वोम्सी लॅबचे व्यवस्थापकीय संचालक एम. के. रेड्डी, प्राचार्य डॉ. विजय आठवले, विद्यापीठ अविष्कार २०२४ समन्वयक डॉ. विनायक धूळप, प्रा. अशोक शिंदे, डब्ल्यू.आय.टी. अविष्कार २०२४ समन्वयक डॉ. सतीश काशीद आणि डॉ. रश्मी दीक्षित उपस्थित होते.

वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स ७, वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ४, कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन ३ आणि हिराचंद नेमचंद महाविद्यालय १ अशी १५ बक्षिसांची लयलूट वालचंद शिक्षण समूहाने केली आहे. नाशिक येथे होणाऱ्या राज्यस्तरीय आविष्कार महोत्सव स्पर्धेसाठी या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

या यशाबद्दल वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी, सर्व विश्वस्त प्राचार्य डॉ. विजय आठवले, डॉ. सत्यजित शहा, डॉ. संतोष कोटी, प्राचार्य डॉ. अश्विन बोन्दार्डे यांनी यशस्वी विद्यार्थी, समन्वयक, म र्गदर्शक यांचे अभिनंदन करुन पुढील स्पर्धेस शुभेच्छा दिल्या.

**पारितोषिके प्राप्त विद्यार्थी, मार्गदर्शक, प्रकल्प असे : वालचंद कला, शास्त्रला सात पारितोषिके**

जान्हवी कोम्पा (डॉ. श्रीकांत होटकर) : वाणिज्य, व्यवस्थापन व कायदा प्रवर्गातून अर्थशास्त्र पदव्युत्तर विभाग शास्त्रार सोन्याचा वाढता दर आणि ग्राहक पसंती, तृतीय).सिंधुबाई भरम शेट्टी (डॉ. दिपाली पाटील): सोन्याच्या दरवाढीची कारणे व त्याच्या परिणामाचा अभ्यास, तृतीय). जावेद नागर (डॉ. अभय जाधव): विद्यावाचस्पतीस्तरावर प्रथम). प्रेरणा लगशेट्टी (श्रीकन्या दुडम): अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान या प्रवर्गातून पदव्युत्तर विभागात तृतीय). स्नेहा जिनगे (वर्षा पाणीकर) : औषध आणि फार्मसी प्रवर्गातून पदवीधर विभागात तृतीय). विद्या कटके (डॉ. वैशाली गरगडे) : प्युअर सायन्स या प्रवर्गातून पदवी विभागात तृतीय). स्नेहा करदास (अक्षय वाघमारे) : पदव्युत्तर विभाग, द्वितीय).

**डब्ल्यू आयटीला ४ पारितोषिके**

काली भाग्यलक्ष्मी (प्रा. ए. डी. माळी) ऍग्रीकल्चर अँड एनिमल हजबंडरी पदवी विभागात प्रथम). सात्विक तोतड (प्रा. अमोल मोफरे): इंजिनीरिंग अँड टेक्नोलॉजी प्रवर्गातून पदवी स्तरावर प्रथम). प्रा.डॉ. भाग्येश देशमुख (प्रा. सचिन राठोड): विद्यावाचस्पती स्तरावर मेडिसिन अँड फार्मसीच्या प्रकल्प, द्वितीय). प्रा. रविकांत खमितकर (प्रो. डॉ. राजेंद्र दुबे) : इंजिनीरिंग अँड टेक्नोलॉजी प्रवर्गातून विद्यावाचस्पती, द्वितीय)

**कस्तुरबाई शिक्षणशास्त्रला तीन**

सविता विराजदार (डॉ. दत्ता वाघमारे): मानवविद्या, भाषा व ललित कला विभागात सायबर सुरक्षा कायदा जाणीव जागृतीसाठी कृती कार्यक्रमाची परिणामकारकता तपासणे, प्रथम). विजया नारायणकर (प्रा. डॉ. अश्विन बोंदार्डे) : मानवविद्या, भाषा व ललित कला विभागात आनंददायी व मनोरंजक उपक्रमांच्या माध्यमातून द्वारे समायोजन क्षमतेचे विकसन प्रकल्प, द्वितीय). मानसी गांधी (डॉ. बाळकृष्ण भावे) : मानवविद्या, भाषा व ललित कला आदी विभागात विविध संख्या व संख्यावरील क्रियांचे आकलन - अद्भुत संख्यारेषा एक अविष्कार प्रकल्प तृतीय).

**हिराचंद नेमचंदला १ पारितोषिक**

सलोनी लिघाडे (डॉ. शिवकुमार बिरादार) : मानवविद्या, भाषा व ललित कला विभागात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या अनुपस्थितीची कारणे आणि उपाय प्रकल्प, द्वितीय). आविष्कार समन्वयक डॉ. प्रा. डॉ. जगताप.

# रोशन प्रशालेत दहावीच्या विद्यार्थ्यांना एस. के. फौंडेशनतर्फे शैक्षणिक साहित्य भेट



**तभा वृत्तसेवा सोलापूर, दि. ३१ डिसेंबर -**

येथील एस.के. फाऊंडेशन व लायन्स क्लब सोलापूर सेंट्रल यांचे संयुक्त विद्यमाने अक्कलकोट रोडवरील रोशन प्रशाला इयत्ता दहावी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य लेखन पॅड, पेन आणि डेअरी मिल्क चॉकलेट भेट दिले.

या कार्यक्रमांस एस.के फाऊंडेशनचे अध्यक्ष अँड. श्रीनिवास कटकूर यांचे अध्यक्षतेखाली, सचिव यशवंत इंदापुरे, अँड.आकाश आयंची, लायन्स क्लब सोलापूर सेंट्रलचे अध्यक्ष चक्रधर अन्नलदास, सचिव केदार स्वत्रे, चंद्रकांत यादव, रोशन प्रशालेचे मुख्याध्यापक बी.जे. इंगळगी आदी उपस्थित होते.

यावेळी एस.के. फाऊंडेशनचे अध्यक्ष अँड. श्रीनिवास कटकूर यांनी मार्गदर्शनपर भाषणात सध्याच्या स्पर्धेच्या युगात जीव ओतुन अभ्यास केले शिवाय पर्याय नाही. चांगले मार्क मिळविले तरच चांगल्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळेल असे सांगितले. सचिव यशवंत इंदापुरे यांनी जिद, चिकाटी आणि मेहनत घेतल्यास यश नक्की मिळते. स्वतःच्या आवडीच्या क्षेत्रात पुढील शिक्षण घेतले असता पुढील कॅरीअर चांगले बनू शकते हे उदाहरणासह पटवून दिले. चंद्रकांत यादव व लायन चक्रधर अन्नलदास यांनी विद्यार्थ्यांना दहावी परीक्षेचे महत्व पटवून दिले तर अँड. आकाश आयंची यांनी दहावी च्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिले. सर्व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दहावीत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेसाठी लेखन पॅड, पेन या शैक्षणिक साहित्याचा वाटप करण्यात आले.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संकुलातील मराठी व उर्दू विभागाचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांचे सहकार्य लाभले.



# सातारा सैनिक शाळेच्या माजी विद्यार्थी संघटना अध्यक्षपदी प्रकाश कदम

**तभा वृत्तसेवा, सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**

सैनिक स्कूल सातारा माजी विद्यार्थी संघटनेच्या अध्यक्षपदी प्रकाश कदम यांची निवड झाली आहे. सातारा येथे दिनांक २८ व २९ डिसेंबर रोजी पार पडलेल्या संघटनेच्या मेळाव्यात ही निवड झाली. देशमुख हे २०१७ साली महाराष्ट्र शासनाचे सह सचिव म्हणून ३० वर्षाच्या सेवेनंतर निवृत्त झाले व सध्या पुणे टाटा मेट्रो मध्ये सल्लागार म्हणून कार्यरत आहेत.

शाळेच्या स्थापनेच्या पहिल्या दिवशी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांपासून ते गत वर्षी शाळेबाहेर पडलेल्या माजी कॅडेट्स पर्यंत शेकडो माजी विद्यार्थी या मेळाव्यास उपस्थित होते, अशी माहिती सैनिक शाळा माजी विद्यार्थी संघटनेचे प्रवक्ते विलास तोकले यांनी दिली. सर्जिकल स्ट्राईक फेम लेफ्टनंट जनरल राजेंद्र निंभोरकर (निवृत्त), पुणे महानगरपालिका आयुक्त राजेंद्र भोसले, राज्य उत्पादन शुल्क आयुक्त डॉ विजय सूर्यवंशी, विशेष पोलिस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, आयकर आयुक्त नितीन वाघमोडे हे माजी विद्यार्थी यावेळी उपस्थित होते. संघटनेच्या सल्लागार समितीचे सदस्य सुरेश जाधव, अमर जाधव, मदन पवार, राजेंद्र सूर्यवंशी, प्रदीप मोहिते व नितीन कणसे यांनी यावेळी संघटनेच्या कार्याची माहिती दिली.

**संघटनेचे इतर सदस्य**

उपाध्यक्ष रवींद्र देशमुख, सचिव महेश खिलारे, सहसचिव लेफ्टनंट कर्नल जयंत मुळगिर, खजिनदार दिग्विजय नलावडे, सहखनिदार निवृत्त विंग कमांडर गणेश येवले.

# पाणी प्रश्नाबाबत जलसाक्षरता निर्माण होणे काळाची गरज

## शेखर गायकवाड; २०२४ चा जलमित्र पुरस्कार निलेश देसाई यांना प्रदान



**तभा वृत्तसेवा, पुणे, दि. ३१ डिसेंबर-**

देशभर पाणी विषयक वेगवेगळ्या स्वरूपाचे प्रश्न निर्माण होत असताना त्यावर शासन स्तरावर तसेच विविध सामाजिक संस्था उपाय शोधून ते अंम लात आणण्याचे प्रयत्न करत आहेत. महाराष्ट्रात पाणी प्रश्नावर काम व्हायचं असेल तर पाण्याच्या विविध पैलूंबद्दल समाजात साक्षरता निर्माण व्हायला हवी, असे प्रतिपादन राज्याचे निवृत्त साखर संचालक तथा यशदा या राज्य सरकारच्या संस्थेचे अतिरिक्त महासंचालक शेखर गायकवाड यांनी केले.

महाराष्ट्र विकास केंद्र या संस्थेच्या वतीन दिला जाणारा जलमित्र पुरस्कार या वर्षी मध्य प्रदेश राज्यातील झाबुआ जिह्यासह आदिवासी भागात जलक्षेत्रात काम करणारे संपर्क समाज सेवी संस्थेचे संचालक निलेश देसाई यांना जलक्षेत्रातील ज्येष्ठ कार्यकर्ते तथा सम्यान्यी पाणी हक्क परिषदेचे अध्यक्ष व भारती विद्यापीठाचे कार्याध्यक्ष आनंदराव पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते. जलमित्र पुरस्कार सोहळ्याचे हे १२ वे वर्ष असल्याने संस्थेच्या सातत्यपूर्ण कामाबद्दल देखील गायकवाड यांनी गौरवोद्गार काढले. यावेळी आनंदराव पाटील, कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी कुलगुरू नांदेड तथा निवृत्त संचालक उच्च शिक्षण विभाग डॉ.के. एम. कुलकर्णी, निवृत्त सचिव जलसंपदा विभाग अविनाश सुर्वे, ज्येष्ठ कृषी तज्ञ निवृत्त प्राचार्य डॉ. मुकुंदराव गायकवाड यांनी जलक्षेत्रातील आपले अनुभव सांगून महाराष्ट्र विकास केंद्राच्या कार्यास व जलमित्र सन्मानार्थी निलेश देसाई यांना शुभेच्छा दिल्या. देशाचे माजी रेल्वे मंत्री डॉ. सुरेश प्रभू यांचा संदेश देखील वाचण्यात आला. महाराष्ट्र विकास केंद्राचे अध्यक्ष अनिल पाटील यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमासाठी राज्याच्या जलसंपदा विभागाचे निवृत्त सचिव अनुक्रमे राजेंद्र पवार व हिरालाल मेंढेगिरी, भुजल वैज्ञानिकसुरेश खानापुरकर व उपेंद्र धोंडे, जल अभ्यासक डॉ. सतीश खाडे, पिंपरी चिंचवडचे माजी नगरसेवक राजाभाऊ गोलांडे, सोलापूर जि.प.चे माजी सदस्य झुंझार भांगे, भुजल तज्ञ प्रा.डॉ. साबळे उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा.प्रदीप कदम यांनी व सन्मानपत्र वाचन राजेंद्र शेलार यांनी केले तर आभार डॉ. कम लकांत वडेलकर यांनी केले.

# अजान आणि चालिसा काव्य संग्राहास नारायण सुर्वे साहित्य पुरस्कार



**तभा वृत्तसेवा, सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**

येथील प्रसिद्ध ज्येष्ठ कवी यांच्या अजान आणि चालिसा या लक्षवेधी काव्य संग्रहास नाशिकच्या सार्वजनिक वाचनालयातर्फे कविवर्य नारायण सुर्वे साहित्य पुरस्कार जाहिर झाला आहे. दहा हजार रुपये रोख, शाल श्रीफळ, स्मृती चिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे ३ जानेवारीला नाशिक येथे ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे यांच्या प्रमुख उपस्थित व ज्येष्ठ विचारवंत रावसाहेब कसबे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान कार्यक्रम होणार आहे.

अखिल भारतीय मुस्तीम मराठी साहित्य परिषदेचे संस्थापक सहसचिव असलेले मुबारक शेख यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेतर्फे प्राचार्य इ.जा. तांबोळी, अय्युब नल्लामंद्, हसीब नदाफ, प्राचार्य शकील शेख, प्रा. बेन्नूर यांनी अभिनंदन केले

# रोज वाचनाची सवय अंगी बाणवावी : सुजीत बनसोडे



**तभा वृत्तसेवा, सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**

आज वाचनाची आवड कमी होत असल्यामुळे वाचनकौशल्य व संवाद कौशल्याचा अभाव जाणवत आहे. पुस्तके वृत्तपत्र यांचे वाचन हे ज्ञानाचे मुख्य स्त्रोत असून प्रत्येकाने रोजच्या जुन्या सवयीला वाचन ही एक सवय जोडावी आणि आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करावा. त्यासाठी दुर्मिळ पुस्तकांच्या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा असे प्रतिपादन सोलापूर आकाशवाणीचे कार्यक्रम अधिकारी सुजीत बनसोडे यांनी केले.

श्री हिराचंद नेमचंद वाचनालयाने प्रा. श्रीराम पुजारी जन्मशताब्दीच्या निमित्त आयोजित अस्पर्शित व दुर्मिळ ग्रंथांचे प्रदर्शनाच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते. ५ जानेवारी २०२५ पर्यंत हे प्रदर्शन सकाळी ८-३० ते १२ सायंकाळी ५ ते ८ पर्यंत असेल सर्वांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन वाचनालयाने केले आहे.

वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी प्रास्ताविक केले तर कार्यवाह डॉ. नभा काकडे यांनी आभार मानले. यावेळी वाचनालयाच्या संचालक मंडळाचे कार्यवाह दत्ता गायकवाड संचालक प्रा. पुष्पा आगरकर, प्रा. सुलभा पिशवीकर, मोहन सोहनी, डॉ. नवनीत तोष्णीवाल, मंजुषा गाडगीळ जुळे सोलापूर महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी, वसंत सावंत,ग्रंथपाल दत्ता मोरे आदी उपस्थित होते.

# संघ हीच जीवनगाथा



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.

**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती
मो. ९९६००५३५२१

## अलक (१) वारस

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक व सरसंघचालक आहेत परमपूजनीय डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार. ही हिंदुत्ववादी संघटना आहे. डॉक्टर हेडगेवार म्हणजे उदंड कीर्ती चे एक समर्पित जीवन. यांच्याप्रमाणेच यांच्यानंतरचे सारेच वारस समर्पित जीवनाच्या आदर्शाचे सन्माननीय-आदरणीय व्यक्तिमत्वाचे मानकरी. या सर्वांना सादर प्रणाम. आत्ता मी त्यांची आठवण करून देते.

सरसंघचालक
१) श्री केशव बळीराम हेडगेवार (१९२५ ते १९३०; १९३१ ते १९४०)
२) श्री लक्ष्मण वामन परांजपे (१९३० ते १९३१)
३) श्री माधव सदाशिव गोळवलकर (१९४० ते १९७३)
४) श्री मधुकर दत्तात्रय देवरस (१९७३ ते १९९३)
५) श्री राजेंद्र सिंग (१९९३ ते २०००)
६) श्री के एस सुदर्शन (२००० ते २००९)
७) श्री मोहन मधुकर भागवत २२/६/२०२२ ते विद्यमान.

**(क्रमशः)**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# भूसंपादनाचा मोबदला अडकला; पालखी महामार्ग रखडला

## संत तुकाराम महाराज पालखी महामार्गाबाबत राष्ट्रीय महामार्ग व भूसंपादन अधिकारी यांच्यात समन्वयाचा आभाव?

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.३१ डिसेंबर-**

'सरकारी काम आणि सहा महिने थांब' अशी एक म्हण प्रचलित आहे. परंतु या म्हणीलाही मागे टाकत आता 'सरकारी काम आणि सह वर्ष थांब' अशी म्हणण्याची वेळ आली आहे. त्याला कारण म्हणजे माळशिरस तालुक्यातून गेलेला संत तुकाराम महाराज पालखी महामार्ग. तब्बल सहा ते सात वर्षे झाली तरी पालखी महामार्गासाठी भूसंपादन झालेल्यांना अद्याप मोबदला मिळाला नसल्याची गंभीर बाब समोर आली असून याचा परिणाम रस्त्याच्या पुर्णत्वावर होताना दिसत आहे.

पालखी सोबत येणाऱ्या लाखो वैष्णवांना महाराष्ट्राचे आराध्य दैवत पंढरपूरच्या विठोबारायाचे दर्शन सोयीस्कर व्हावे त्यांचा पायी मार्ग सुखकर व्हावा या हेतूने केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी पालखी महामार्गासाठी कोट्यावधीचा निधी मंजूर केला. यासाठी या महामार्गात भूसंपादित होणार्या जमिनींना अगदी चारपट रक्कम देण्याचे प्रयोजन करण्यात आले मात्र भूसंपादन करणारे अधिकारी व राष्ट्रीय महामार्गाचे अधिकारीच गोलमाल कारभार करणारे निघाल्याने महामार्गावरील प्रश्न मार्गी लागलेले दिसत नसल्याची चर्चा आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी महामार्गाचे काम रखडले आहे. याचा परिणाम म्हणून वारकर्यांची वाट बिकट बनली आहे.



कोर्टाच्या आदेशाप्रमाणे काहींची व्याजाची रक्कम देण्याबाबत नॅशनल हायवेकडे मागणी करण्यात आली आहे परंतु नॅशनल हायवेकडून प्रतिसाद मिळालेला नाही. आमच्या लेवलला कोणाचाही मोबदला अडकलेला नाही. आणि मोबदला मिळाला नसल्यामुळे काम कोणी अडवले असल्याबाबत आम्हाला नॅशनल हायवेने अद्यापपर्यंत कळवलेले नाही.
**- विजया पांगारकर,**
**प्रांताधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, अकलूज**

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार भूसंपादन प्रक्रियेमध्ये संयुक्त समिती नेमण्यात आली होती. यामध्ये कृषी, वनीकरण, सा बां विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, भूमी अभिलेख आणि राष्ट्रीय महामार्ग विभागातील अधिकार्यांचा समावेश होता. पण या समितीमार्फत जमीन, घरे, विहिरी, झाडे आणि पाइप लाइन यांचे मूल्यांकन करताना जाणून बुजून त्रुटी ठेवण्यात आल्या. आर्थिक अमिषा पोटी अधिकार्यांनी हा सर्व खेळ खंडोबा केला असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

या बाबत नॅशनल हायवेच्या अधिकार्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे एकंदरीतच नागरीकांच्या तक्रारी पाहता नॅशनल हायवेचे अधिकारी व भूसंपादन अधिकारी यांचे कार्यालय यांच्यामध्ये समन्वयाचा आभाव असल्याचे स्पष्टपणे जाणवत आहेत. आणि याचा परिणाम मात्र महामार्गाच्या पूर्णत्वावर होत असल्याने वाहनचालकांचे मात्र हाल होत आहेत.

श्री संत तुकाराम महाराज पालखी महामार्गात माळशिरस तालुक्यातील अकलूज ते तोंडले बोंडले हे अंतर २२ किलोमीटरचे आहे यापैकी अकलूज, माळीनगर, सवतगव्हाण, तांबवे, महाळुंग आदी गावातील अधिग्रहण होणार्यांची प्रकरणे न्यायालयात प्रलंबित असल्याने, काहींची झाडे, बोरवेल, घरे, विहिरी यांचा उचित मोबदला न मिळाल्याची प्रकरणे प्रलंबित असल्याने तसेच काहींचे थकित व्याजाची रक्कम न मिळाल्याने त्यांनी जागा रिकामी करून दिली नाही. त्यामुळे रस्ता तयार करताना अडथळा निर्माण होत आहे. यामुळे पालखी महामार्गाचे काम काही ठिकाणी रखडल्याचे परिसरातील नागरिकांतून बोलले जात आहे. अधिकार्यांच्या या दुटप्पी व दुजाभाव करणाऱ्या भूमिकेमुळे काही ठिकाणी पालखी महामार्गाचे काम रखडलेल्या अवस्थेत दिसत आहे. त्यामुळे वाहनचालकांबरोबरच वैष्णवांना नाहक त्रास सोसावा लागत आहे.

## संक्षिप्त वृत्त



### पेट्रोल पंपावरील कर्मचाऱ्याची रक्कम लुटणाऱ्याच्या १२ तासाच्या आत आवळल्या मुसक्या

**टेंभुर्णी, दि. ३१ डिसेंबर-**

बुलेट वरून पेट्रोल भरण्यासठी आलेल्या दोन सराईत गुन्हेगारांनी तीन पेट्रोल पंपांवर हल्ला करून सुमारे १० हजार रुपयांची लूट करीत एका कामगारास चाकूने मारहाण केली.ही घटना कुर्डू व टेंभुर्णी येथील पेट्रोल पंपावर दि.२७ रोजी मध्यरात्रीनंतर २ ते ३ वाजण्याच्या सुमारास घडली आहे.यातील एका आरोपीस अटक केली आहे. शत्रुघ्न नवगिरे (वय-२७), (रा.अकोले खु. ता. माढा) यास कोयत्याने मारहाण करून जखमी केले होते. दोन संशयित आरोपीपैकी लक्ष्मण यल्लाप्पा शेंडगे (रा.डोणगाव,ता. करमाळा, हल्ली रा. वारजे, जि. पुणे) यास पोलिसांनी ताब्यात घेवून अटक केली आहे.त्यास फोन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.तर एक अज्ञात अद्याप फरार आहे. या संशयित आरोपीवर वारजे (जि. पुणे) येथे मोक्का अंतर्गत गुन्हा दाखल असून नुकताच तो जामिनावर सुटला होता.त्यानंतर पुणे येथील हाफ मर्डर गुन्ह्यात तो फरार होते.ही कारवाई पोलिस निरीक्षक दीपक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक विशाल वायकर,पो. उपनिरीक्षक रविराज कांबळे,पो.उपनिरीक्षक कुलदीप सोनटक्के,प्रकाश कारटकर,विरेश कलशेट्टी,अजय वाघमारे,बाळराजे घाडगे,संदीप गिरमकर,प्रवीण साठे,अन्वर आत्तार,हरी थोरात,राहुल दोरकर,सुनील पवार या पोलीस कर्मचाऱ्यांनी केली. संशयित दोन्ही आरोपी वारजे,जि. पुणे येथून हाफ मर्डर केसमध्ये फरार होते. गेल्या आठ दिवसांपासून ते करमाळा व माढा तालुक्यात ते फिरत होते.ते डोणगाव (ता. करमाळा) येथे लपून बसले होते.जवळील पैसे संपल्याने त्यांनी प्रथम कुर्डू (ता.माढा) येथील पेट्रोल पंप तसेच पुढे मध्यरात्रीनंतर करमाळा टेंभुर्णी रोडवरील योगिराज पेट्रोल पंप येथे टाकी फूल करून पैसे मागितले असता कामगारावर कोयता उगारून धमकावत पसार झाले. पुढे करमाळा रोडवरील अकोले खु.येथील एस.जी.पाटील पेट्रोलपंप येथे कामगारावर कोयत्याने हल्ला करून त्याच्या खिश्यातून अंदाजे १० हजार रुपये हिसकावून घेवून पसार झाले होते.



### मंगळवेढ्यातील रिध्दी सिध्दी महागणपती मंदिरात गजानन विजय ग्रंथाचे एकदिवसीय महापारायण

**मंगळवेढा, दि.३१ डिसेंबर-**

मंगळवेढा येथील रिध्दी सिध्दी महागणपती मंदिरात गजानन महाराज यांच्या सेवेकरी मंडळीची महापारायणा संदर्भात विचार विनिमय बैठक पार पडली असुन सदर बैठकीत रविवार दिनांक १२ जानेवारी २०२५ रोजी मंगळवेढा येथील रिध्दी सिध्दी गणेश मंदिरात जागतीक पारायण दिनाचे औचित्य साधून गजानन विजय ग्रंथाचे एकदिवसीय महापारायण सकाळी ७ वाजता घेण्याचे सर्वानुमते ठरले आहे. मंगळवेढा तालुक्यात गजानन विजय ग्रंथाचे एवढ्या मोठ्या प्रमाणात होणारें हे पहिले महापारायण असुन सदर पारायण सेवेसाठी रिध्दी सिध्दी गणेश मंदिराचा भव्य दिव्य परीसर मंदिरांचे ट्रस्टी आशोक कोळी यांनी सर्व सोईसुविधासह अगदी मोफत उपलब्ध करून दिला आहे. पारायण सेवेसाठी येणाऱ्या भक्तांसाठी सर्व सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. पारायण सेवेसाठी चहा, पाणी, नाष्टा व पारायण समाप्ती महाआरती होवून नंतर महाप्रसादाचे नियोजन करण्यात आले आहे. गजानन विजय ग्रंथाचे एकदिवसीय महपारायणा साठी बहुसंख्येने नाव नोंदणी करावी. यासाठी संजय पाटील, ८८८८३४३१४९, अतुल उकळे सांगोला ९८८१५१७०९३, यादव ८६२५०५९५५६, पैलवान ९५७९००२७३०, रुपाली ७५८८२२०५२० येथे नावनोंदणी करवी. पारायण सेवा बैठकीसाठी मंदिराचे विश्वस्त अशोक कोळी यांच्यासह मंगळवेढा, सांगोला, पंढरपूर, मोहोळ तालुक्यातील अनेक गजानन सेवक मंडळी उपस्थित होती.



### माढातील जि.प.च्या जागेत शॉपिंग कॉम्प्लेक्ससाठी निधी मिळावा : आमदार पाटील

**माढा, दि. ३१ डिसेंबर-**

माढा विधानसेभेचे नवनिर्वाचित आमदार अभिजीत पाटील यांनी ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे याची मुंबई येथे भेट घेऊन विविध मागण्यांचे पत्र दिले. माढा येथे जिल्हा परिषद जागेमध्ये शॉपिंग कॉम्प्लेक्ससाठी आवश्यक निधी मिळावा याकरिता ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे यांना निवेदन दिले. माढा शहरामधील जिल्हा परिषदेच्या जागेमध्ये दोन मजली शॉपिंग कॉम्प्लेक्स तयार झाल्यावर स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल व अनेकांना रोजगार उपलब्ध होईल. तसेच जागेतील आतील बाजुस क्लासरूम व शाळेसाठी वॉल कंपाऊंड तयार करणे ही गरजेचे आहे. त्यासाठी आवश्यक निधी मंजुर करण्यात यावा, अशी मागणी केल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.

# शंकरराव मोहिते-पाटील कारखान्याचा ॲडव्हान्स प्रती मे.टन रक्कम २८०० प्रमाणे जाहीर


**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ३१ डिसेंबर-**

सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याचे सिझन २०२४-२०२५ मध्ये २८ डिसेंबर २०२४ पासून गळीतास आलेल्या ऊसास प्रती मे.टन रक्कम रु.२,८००/- प्रमाणे प्रथम डव्हान्स जाहिर करणेत येत असून दिपावली सणाकरीता रक्कम रु.१००/- असा एकुण रक्कम रु.२,९००/- प्रति मे.टन ऊस दर देण्यात येणार आहे. तसेच यापूर्वी जाहिर केल्याप्रमाणे माहे फेब्रुवारी २०२५ पासून पुढे गाळपास येणाऱ्या ऊसाकरीता प्रति मे.टन रक्कम रु.१००/- अनुदान देण्यात येणार असून ते दिपावली सणाचे बिलाबरोबर अदा करणेत येणार असलेबाबतची माहिती कारखान्याचे चेअरमन जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांनी दिली.



कारखान्याचे मार्गदर्शक संचालक व महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्रीविजयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व चेअरमन जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाखाली कारखाना प्रगतीपथावर वाटचाल करीत आहे. कारखान्याचा सिझन २०२४-२०२५ चा ऊस गळीत हंगाम दिनांक १५/११/२०२४ रोजी सुरु झाला असून दि. ३० डिसेंबर रोजी अखेर ३ लाख ४७ हजार ५६३ मे.टन ऊसाचे गाळप होऊन ३ लाख १५ हजार ५०० क्विंटल साखर पोत्याचे उत्पादन झालेले असून सरासरी साखर उतारा ९.८५ टक्के मिळाला आहे. सध्या प्रति दिवस ८,००० मे. टन याप्रमाणे ऊसाचे गाळप होत आहे.

यावेळी कारखान्याचे व्हाईस चेअरमन शंकरराव माने-देशमुख, संचालिका, स्वरुपाराणी मोहिते-पाटील, तसेच संचालक लक्ष्मण शिंदे, सतीश शेंडगे, नानासाहेब मुंडफणे, विजयकुमार पवार, रावसाहेब मगर, संग्रामसिंह जहागिरदार, रामचंद्र सिद, विराज निंबाळकर, रावसाहेब पराडे, महादेव क्षिरसागर, भिमराव काळे, अमरदिप काळकुटे, गोविंद पवार, सुभाष कटके, जयदिप एकतपुरे, रामचंद्र ठवरे, तज्ञ संचालक, प्रकाशराव पाटील, रामचंद्रराव सावंत-पाटील, संचालिका सुजाता शिंदे, कार्यलक्षी संचालक रणजित रणनवरे व शिवसृष्टी किल्ला व शिवछत्रपती मल्टिमेडीया लेजर शो कमिटी संचालक पांडूरंग एकतपुरे, बाळासाहेब माने-देशमुख, कालीदास मिसाळ, दत्तात्रय चव्हाण, विनायक केचे, राजेंद्र भोसले, अमृतराज माने-देशमुख, धनंजय सावंत, नामदेव चव्हाण, धनंजय दुपडे, अनिलराव कोकाटे, श्रीकांत बोडके, हर्षाली निंबाळकर, पुष्पा महाडीक उपस्थित होते.



# 'आर्या'मध्ये इंडक्शन प्रोग्रामचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. ३१ डिसेंबर-**

टेंभुर्णी येथील आर्या कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये प्रथम वर्ष डी फार्मसीच्या विद्यार्थ्यांसाठी नुकतेच इंडक्शन प्रोग्राम व फ्रेशर पार्टीचे आयोजन करण्यात आले. नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना डी फार्मसी अभ्यासक्रमाची माहिती मिळावी यासाठी संस्थेच्या मार्गदर्शिका प्रणिता शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून विठ्ठलराव शिंदे कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेंद्र कदम उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन करून झाली. प्रमुख पाहुणे डॉ. महेंद्र कदम यांनी मुलांना पदवी घेऊन बाहेर पडल्यानंतर अखंड शिकतच रहावे व जिद्ध - परिश्रमाच्या जोरावर नावलौकीक मिळावावा असे मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य धनंजय चव्हाण यांनी आपल्या भाषणातून डी फार्मसी अभ्यासक्रमाबद्दल सविस्तर माहिती दिली व डी फार्मसी पदवीकेचे महत्त्व विद्यार्थांना पटवून सांगितले व शुभेच्छा दिल्या. हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

यावेळी प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी स्वत:चा परिचय करून दिला तसेच वेगवेगळ्या उपक्रमामधे सहभाग नोंदवला. विविध प्रकारच्या स्पर्धातून विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणीत झाला. प्राचार्य धनंजय चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली मिस्टर आणि मिस फ्रेशर यांची निवड करण्यात आली.

कार्यक्रमाचे आयोजन प्रा. तुषार कन्हेरे, प्रा.हर्षवर्धन वाघमारे, प्रा. साक्षी देवकर यांनी केले. या कार्यक्रमासाठी प्रा. प्रतीक्षा मुळे, अमृता कसबे, आयेशा शेख, स्वप्नील कांबळे, विजय शिंदे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी डी फार्मसी च्या द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# भाजपा किसान मोर्चाची संघटन पर्व सभासद नोंदणी कार्यशाळा

## करमाळ्यातून दीपक चव्हाण, नरेंद्रसिंह ठाकूर यांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.३१ डिसेंबर-**

भारतीय जनता पक्षाने संघटनात्मक बळकटीसाठी लोकसभा व राज्याच्या विधानसभा निवडणुकानंतर पुढील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका डोळ्यासमोर ठेवून संघटन पर्व अंतर्गत सदस्य नोंदणी अभियान सुरू केले आहे, असे मत महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांनी व्यक्त केले ते भाजपा किसान मोर्चा राज्यस्तरीय सदस्य नोंदणी अभियान कार्यशाळा छत्रपती संभाजी नगर येथे आयोजित कार्यक्रमाप्रसंगी प्रसंगी बोलत होते यावेळी भाजपा प्रदेश सरचिटणीस संजय केनेकर भाजपा किसान मोर्चा प्रदेशाध्यक्ष गणेश तात्या भेगडे आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

पुढे ते म्हणाले की येणाऱ्या एप्रिल महिन्यापर्यंत या निवडणुका लागतील जिल्हा परिषद,पंचायत समिती, नगरपालिका महानगरपालिकांच्या आगामी निवडणुका या कार्यकर्त्यांच्या निवडणुका आहेत, या निवडणुकांमध्ये पक्ष खंबीरपणे कार्यकर्त्यांच्या पाठीशी उभा राहणार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारताचे स्वप्न खऱ्या अर्थाने पूर्ण होणार आहे राज्यातील जनतेने महायुतीच्या बाजूने एकतर्फी जनादेश दिलेला आहे या डबल इंजिन सरकारचा लाभ निश्चित राज्यातील शेतकरी वर्गांना होणार आहे.




शेतीसाठी नवीन तंत्रज्ञान धोरणात्मक व संशोधन विस्तार आराखड्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. वीज, सौर ऊर्जा, दुधाचे अनुदान याकडे शासन गांभीर्याने लक्ष देत आहे तर नाफेड, आत्मा, फार्मर प्रोड्यूसर कंपन्या यामधून शेतकऱ्यांचे हित जोपासले जात असल्याचे प्रतिपादन राज्याचे नवनिर्वाचित ओबीसी,दुग्धविकास व अपारंपारिक उर्जा मंत्री अतुल सावे यांनी व्यक्त केले.

यावेळी पदाधिकाऱ्यांनी संघटनात्मक बाबीवर विषय मांडले तसेच प्रातिनिधीक स्वरूपात सदस्य नोंदणी करण्यात आली. तसेच प्रदेश सरचिटणीस संजय केणेकर यांनी राज्याचा संघटनात्मक आढावा मांडला प्रदेश सरचिटणीस संदीप गिड्डे पाटील, रामकृष्ण वेताळ, रंगनाथ सोळंके, ललित समुद्रकर यांनी मार्गदर्शन केले. तसेच किसन मोर्चा प्रदेशाध्यक्ष गणेश भेगडे यांनी सर्व पदाधिकाऱ्यांच्या मार्फत १५ जानेवारीपर्यंत किसान मोर्चाच्या माध्यमातून राज्यामध्ये विक्रमी सभासद नोंदणी करू असे संबोधित केले. या राज्यस्तरीय कार्यशाळेत करमाळ्यातून किसान मोर्चा प्रदेश सचिव दीपक चव्हाण तसेच किसान मोर्चा जिल्हा सरचिटणीस नरेंद्रसिंह ठाकुर उपस्थित होते.

# तुरीची रास करताना अंगावरून हार्वेस्टर मशीन गेल्याने एकाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३१ डिसेंबर-**

तालुक्यातील सांगवी (बु) मधील कोळेकरवाडी येथे तुरीची रास करताना कोळेकरवाडी येथील शेतकरी मल्हारी बाजीराव घावटे वय ५० वर्ष यांच्या अंगावरून हार्वेस्टर मशीन गेल्याने त्यांचा जागेवर मृत्यू झाला आहे.



या बाबत प्राथमिक मिळालेली माहिती अशी की,अक्कलकोट येथील रमेश विश्वनाथ डिग्गे यांची शेती मयत शेतकरी मल्हारी बाजीराव घावटे यांनी बटाईने करत होते. वेळअमावशा सणादिवशी आज दुपारी हार्वेस्टर मशीन चालक जोरजोरात टेपचे आवाज सोडून तुरीचे रास करीत होता.उपस्थित शेकऱ्यानी अनेक वेळा चालकाला टेप बंद करण्यास सांगितले असतानाही मस्तवाल चालकाने बंद केले नाही. हार्वेस्टर मशीन चालकांच्या मुग्रम व अविचारीमुळे दोन शेतकरी बालबल वाचले आहेत.मात्र निष्पाप शेतकरी मल्हारी बाजीराव घावटे यांच्या पायावरून व छातीवरून हार्वेस्टर मशीन जाणून बुजून घातल्याने त्या शेतकऱ्याचा जागेवरच मृत्यू झाला असल्याची चर्चा येथील गावकरी मधून होत आहे. अशा बेजबाबदार चालकांवार तात्काळ कडक कारवाई करण्याची मागणी गावकरी मधून होत आहे. या बाबत रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्याची पोलिसांची प्रक्रिया सुरू आहे.

# करकंब-जळोली चौक दरम्यानचा धाकटी वेस पूल रखडलेलाच

## प्रवाशांसह विद्यार्थ्यांची वाट बिकट; नव्या वर्षात तरी मुहुर्त लागणार का?

**तभा वृत्तसेवा । राजेंद्र करपे**
**करकंब, दि. ३१ डिसेंबर-**

करकंब (ता. पंढरपूर) येथे करकंब गाव ते जळोली चौक या दरम्यान धाकटी वेस या परिसरात ओढा आहे. या ओढ्याच्या दोन्ही बाजूला असणाऱ्या बंधाऱ्याची उंची ही पुलापेक्षा जास्त असल्याकारणाने बंधारा भरल्यानंतर संबंधित पुलावरून ३ ते ४ फूट उंचीवरून पाणी वाहत असते. या ओढ्याच्या एका बाजूस जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा तर दुसऱ्या बाजूस ओढ्यापासून ३०० मीटर अंतरावर माध्यमिक शाळा आहे.

या दोन्ही शाळांमधील विद्यार्थ्यांना या पुलावरून पाणी वाहत असताना त्यातूनच जीव मुठीत धरूनच प्रवास करावा लागतो. पुलावरती पाणी आल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांना पाण्यामुळे पलीकडे जाता येत नसल्याने त्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. जळोली चौक व त्या परिसरातील नागरिक, शेतकरी, विद्यार्थ्यांना नेमतवाडी चौकात येऊन नंतर करकंब गावामध्ये दोन किलोमीटरचे अंतर पार करून यावे लागते. आ. अभिजीत पाटील यांनी धाकटी वेस ते जळोली चौक या दरम्यानच्या रस्त्याची दुरुस्ती करून संबंधित विभागकडे या पुलाच्या कामासाठी पाठपुरावा करून या पुलाची उंची वाढवून सदर पुलाचे काम पूर्णत्वास न्यावे, अशा प्रकारची मागणी संबंधित शेतकरी, विद्यार्थी, पालक, ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. नव्या वर्षात तरी या रखडलेल्या पुलाचे काम मार्गी लागणार का? असा सवाल सर्वसामान्य नागरिक करत आहेत. करकंब येथील अजितसिंह देशमुख मित्र मंडळ तात्कालीन आमदार बबनदादा शिंदे व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे या पुलाची उंची वाढवण्यासंदर्भात गेल्या तीन वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करत आहे. यासाठी बजेटमधून दोन कोटींची मंजुरी मिळाल्याचे अशोक देशमुख यांनी सांगितले.



**भाग -१**

करकंब येथील धाकटीवेस बंधारा पूर्णक्षमतेने भरून वाहिल्यानंतर धाकटीवेस ते जळोली चौकाकडे जाणारा रस्ता पूर्णतः बंद असतो. शालेय विद्यार्थी,शेतकरी,ग्रामस्थ, विशेषतः आबालवृद्ध व महिलांची प्रचंड गैरसोय होते. यामुळे जीवितहानी होण्याची शक्यता आहे. पावसाळ्याच्या दिवसात धाकटीवेस ते जळोली चौक या मार्गावर मोठ, मोठे खड्डे पडून त्यात पाणी साठल्याने या मार्गावरून ये-जा करणे धोकादायक बनते.पुलाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावे, अशा प्रकारची मागणी संबंधित नागरिक, शेतकरी, ग्रामस्थ, विद्यार्थी, पालक यांच्याकडून करण्यात येत आहे.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




पंढरपूर : २०२४ मधील सुख, दु:खाच्या कडू, गोड आठवणींना उजाळा देताना सरत्या वर्षातील अखेरच्या सुर्यास्ताच्या साक्षीने जीवनातील कडू आठवणी त्याला समर्पित करुन नवीन २०२५ या वर्षातील पहिल्या सुर्योदयाच्या किरणाबरोबरच सरत्या वर्षातील केवळ गोड, सुखद आठवणींचाच ठेवा जीवनात अबाधित राहू दे, अशी काहीशी साद घालीत प्रत्येक पंढरपूरकर नागरिक येणाऱ्या नवीन वर्षाच्या स्वागतासाठी सज्ज झाला आहे.

( छायाचित्र : राजू मिसाळ, पंढरपूर )



## संक्षिप्त वृत्त...



### विद्यार्थ्यांसोबत पालकही सहलीमध्ये सहभागी; माऊली इंग्लिश स्कूलचा उपक्रम

**बार्शी, दि. ३१ डिसेंबर-**

बार्शीतील दत्तनगर येथील माऊली प्री इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल मोहोळ येथील आर्या रिट्रीट पिकनिक स्पॉटला भेट दिली. विविध प्रकारची खेळणी, अनेक बुद्धिवर्धक आणि मनोरंजक खेळ, मिकी माऊस, जम्पिंग, ट्रेन, बैलगाडी सफर, रेन डान्स, वॉटर फॉल, विविध प्रकारची झाडे, निसर्गरम्य वातावरण तसेच स्विमिंगमध्ये विद्यार्थ्यांनी दिवस आनंदात घालवला. पौष्टिक नाश्ता, चविष्ट हुरडा, स्वादिष्ट जेवण विद्यार्थी आणि पालकांसाठी दिवसभर आनंदाची मेजवानी होती. बार्शीचे मा. आमदार राजेंद्र राऊत यांच्या पत्नी सौ. कविताताई राऊत आणि त्यांच्या कुटुंबीयांनी आर्या रिट्रीट येथे सदिच्छा भेट दिली. आर्या रिट्रीचे सर्वेसर्वा श्री. पुष्कराज पाटील व सौ. विद्या पाटील यांनी कविताताई राऊत यांचे स्वागत केले. या शैक्षणिक सहलीचे विशेष म्हणजे विद्यार्थ्यांसोबत पालकही सहभागी होते. संस्थेचे अध्यक्ष प्रा. विजयसिंह पाटील, सचिव प्रा.अर्चना पाटील शिक्षक इत्यादी उपस्थित होते.



### मंगळवेढ्यात काळ्या आईची ओटी भरुन वेळ अमावस्येचा सण साजरा

**मंगळवेढा दि. ३१ डिसेंबर-**

मंगळवेढा शहर व ग्रामीण भागात बळीराजाने आपल्या कुटूंबासह शेतावर जावून पाच पांडवांची पुजाअर्चा करुन कुटूंबासह भोजन करण्याचा आनंद लुटला. दरम्यान मंगळवेढा शिवारात शेतकर्यांची शेतावर जाण्यासाठी रीघ लागल्याचे चित्र होते. वेळ अमावस्येच्या पार्श्वभूमीवर शेतकर्यांनी आपल्या कुटूंबासह शेतामध्ये जावून कोप उभी करुन पाच पांडव तयार करुन त्यांना पुरणपोळी,बाजरीचे उंडे,आंबिल आदींचा नैवद्य दाखविण्यात आला. शेतातील लक्ष्म ीला प्रसन्न करण्यासाठी वर्षातून एकदा वेळ अमावस्येच्या दिवशी शेतकरी कुटूंबिय शेतात जावून काळ्या आईला प्रसन्न केले. झाडा खाली सहकुटूंब एकत्र येवून भोजनाचा आनंद लुटला. भोजनामध्ये विशेष करुन पुरणपोळी,बाजरीची भाकरी,आंबिल ,भजी भाजी आदींचा समावेश होता. मंगळवेढ्याचा काळा शिवार सोलापूर रोडला असल्यामुळे शिवारात सगळीकडे शेतकरी व त्यांचे कुटूंबिय दिसून येत होते. परिणामी वेळ अमावस्येमुळे दिवसभर या रस्त्याला वर्दळ होती. काही कुटूंबिय वाहनाने तर काही कुटूंबिय पारंपारिक बैलगाडीत शेताकडे जात असल्याचे चित्र होते. वेळ अमावस्या ही सोमवारी आल्याने तीला अधिक महत्व प्राप्त झाल्याने या दिवशी अनेकांनी अन्न,वस्त्र,धन इत्यादी पारंपारिक पध्दतीने दान केले.

### कंत्राटी कर्मचाऱ्यांना पगारवाढीची रक्कम अदा करण्यासाठी मुख्यमंत्र्यांना निवेदन

**पिलीव दि ३१ डिसेंबर**

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या विभाजित कंपन्या निर्मिती,पारेषण, वितरण मधील ४२००० कंत्राटी कामगारांच्या प्रश्नावर ९ सप्टेंबर २०२४ रोजी तत्कालीन ऊर्जा मंत्री व विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथी गृहात झालेल्या बैठकीत तिन्ही वीज कंपन्यातील कंत्राटी कामगाराच्या मूळ वेतनामध्ये १९ % कायम कामगाराप्रमाणे वाढ देऊन कंत्राटी कामगारांना १ मार्च २०२४ पासून पगारवाढ लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला होता सदर निर्णय जाहीर होऊन तीन महिन्याचा कालावधी होऊनही अद्यापही पगार वाढीचा फरक जमा न झाल्याने राज्यभरातील कंत्राटी कामगारांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे. यासंदर्भात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अकलूज




विभागातील कंत्राटी काम गारांच्या वतीने निवेदन देण्यात आले असून यामध्ये म्हटले आहे की,महावितरण कंपनीच्या बाह्यस्रोत कर्मचाऱ्यांना कायम कर्मचाऱ्यांच्या बरोबरीने मासिक पगारामध्ये १९% पगार वाढ तीन महिन्यापूर्वी जाहीर केली होती तसेच ही पगार वाढ माहे एप्रिल २०२४ पासून लागू केली होती ,माहे ऑक्टोबर महिन्याच्या पगारामध्ये फक्त चालू एक महिन्याची वाढीव रक्कम जमा झाली असून मागील महिन्याचा फरक रक्कम ही दिवाळीपूर्वी जमा करणे कर्मचाऱ्यांच्या दृष्टीने गरजेचे होते परंतु पगार वाढ जाहीर होऊन तीन महिने होऊनही एप्रिल २०२४ पासून वाढीव फरक रक्कम जमा केला नसल्याने अकलूज विभागातील संबंधित सर्व कंत्राटदार यांना आपल्या माध्यमातून सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांना तात्काळ पगारवाढीची रक्कम बँक खात्यावर जमा करण्याचे निर्देश आपण द्यावेत असे निवेदन मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांना अकलूज विभागातील कंत्राटी कामगारांच्या वतीने देण्यात आले आहे.

# एसटी बस पलटली; ९ प्रवासी गंभीर जखमी

## करमाळ्याच्या रायगावमधील घटना

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.३१ डिसेंबर-**

करमाळा तालुक्यातील रायगाव नजीक एसटी बस पलटी होऊन नऊ प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. इतर प्रवाशी किरकोळ जखमी झालेली आहे. करमाळा आगाराची एसटी बस क्रमांक (एम.एच. १३ सीयू ७८८३) कर्जतहुन करमाळा कडे येत असताना रायगाव नजीक बुधवंत वस्तीजवळ स्टेरिंगचा रोड तुटल्याने एसटी बसचा अपघात झाला आहे. चालकाचे स्टेरिंग वरील कंट्रोल सुटल्याने ही एसटी बस पलटी होऊन हा अपघात घडल्याचे प्रवाशांनी सांगितले.



करमाळा आगाराची बस कर्जतवरून करमाळाकडे येत असताना हा अपघात घडला. या बसमध्ये ३० प्रवासी प्रवास करत होते.या गावी येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या जास्त होती त्यातील नऊ प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. या प्रवाशांना स्थानिकांनी मदत करून बस बाहेर काढले यामध्ये एका व्यक्तीचा हात तुटला असून इतरांना किरकोळ मार लागला आहे बस म ध्ये प्रवास करणाऱ्या एका लहान मुलाच्या पाठीला गंभीर जखम झालेली आहे.यात बस मधून गावी येणारे अनेक शाळकरी विद्यार्थी प्रवास करत होते.

अचानक पलटी झालेल्या बसच्या काचा फोडून स्थानिकांनी प्रवाशांना बसमधून बाहेर काढले. सुदैवाने यात कोणतीही जीवित हानी झाली नाही. सदर अपघाताची माहिती कळताच स्थानिक नागरिकांनी ॲम्बुलन्स बोलून जखमींना करमाळा कुटीर रुग्णालयात दाखल केले. जखमींवरती उपचार सुरू आहेत. करमाळ पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल होऊन घटनेचा पंचनामा केलेला आहे.

### नादुरुस्त एसटी बसचा प्रश्न ऐरणीवर

करमाळा आगारातून रोज हजारो प्रवाशांना ने-आन करणारी बस ही ग्रामीण भागातल्या लोकांसाठी फायद्याची प्रवासी वाहतूक बनली आहे. मात्र करमाळा आगाराच्या अनेक एसटी बस नादुरुस्त अवस्थेतच रस्त्यांवरून ये-जा करत असतात. अनेक वेळा प्रवासादरम्यान या बसेस बंद पडतात यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर होताना दिसत आहे. मोडकळीस आलेल्या या बस रस्त्यावर न उतरता बस दुरुस्त करून अथवा नवीन घेऊन सामान्यांचा प्रवास सुखाचा करावा.

### सरकारी सवलतींमुळे एसटी बसला गर्दी

महाराष्ट्र शासनाने प्रवाशांसाठी जाहीर केलेल्या योजनेनुसार साठ वर्षांपुढील ज्येष्ठ नागरिकांसाठी एसटी प्रवास मुक्त केला. महिलांसाठी निम्या तिकिटावर एसटीचा प्रवास खुला केला आहे. म्हणून आणि एक लोक एसटीने जाणे पसंत करत आहेत. मात्र ग्रामीण भागात धावणाऱ्या बसेस पूर्णपणे खिळखिळा झालेल्या आहेत. एसटीने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना शासनाची सवलत मिळाली मात्र सुरक्षा मात्र रामभरोसे आहे. याकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे.

## पुस्तकातील विचारामुळे समाज श्रीमंत होतो : आ. सोपल

### सुरेशचंद्र कुंकूलोळ यांच्या दोन पुस्तकांचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ३१ डिसेंबर -**

चांगल्या पुस्तकांमध्ये समाजाला दिशा देण्याची ताकद असते. पुस्तकांमधील विचारधनामुळे समाज श्रीमंत होतो, असे मत माजी मंत्री तथा आमदार दिलीप सोपल यांनी व्यक्त केले. येथील ज्येष्ठ व्यापारी सुरेशचंद्र कुंकूलोळ यांच्या म ाझ्या नोंदी व अर्थपूर्ण शोध या पुस्तकांच्या प्रकाशन समारंभात ते बोलत होते.




यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ साहित्यिक श्रीकांत मोरे, व्यंकटेश जोशी, बाळासाहेब पानसरे, वैभव वानखडे, सुरेश कुंकुलोळ उपस्थित होते. प्रास्ताविक नयन प्रकाशनचे संदीप काळे यांनी केले. याप्रसंगी बोलताना सोपल यांनी अगरचंद कुंकूलोळ हे दानशूर होते. त्यांनी समाजासाठी विधायक कामांची उभारणी केली. सुरेशचंद्र कुंकुलोळ यांनी सचोटीने व्यापार केला. त्याचबरोबर साहित्य प्रेम जपले. बदलत्या काळात वाचन संस्कृती लोप पावत चाललेली आहे. त्यामुळे चांगल्या पुस्तकांची समाजाला गरज आहे .चांगल्या पुस्तकांमुळे वाचन संस्कृतीचे जतन होईल, असा आशावाद व्यक्त केला. यावेळी डॉ. संदीप रायसोनी, यश कुंकूलोळ, सुरेश राका, स्नेहल छाजेड,स्मितल कुंकूलोळ, अमृता कुंकूलोळ, भगिनी सरला बंब यांनी आपल्या कौटुंबिक आठवणी सांगितल्या. सूत्रसंचलन अपर्णा दळवी हिने केले.

## रक्तदान करत साजरा केला थर्टी फस्ट

### गोगाव, फत्तेपुरकर मित्रमंडळाचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३१ डिसेंबर-**

सरत्या वर्षाला निरोप आणि नववर्षाचे स्वागत पंढरपुरात विधायक पद्धतीने करण्यात आले. तब्बल १७५ रक्तदात्यांनी रक्तदान करून थर्टी फर्स्ट साजरा करत नवीन वर्षाचे स्वागत केले. श्याम गोगाव आणि आदित्य फत्तेपुरकर मित्रपरिवाराच्या वतीने गेल्या २० वर्षापासून रक्तदानाची चळवळ थर्टी फर्स्ट रोजी चालवली जाते.



येथील श्याम गोगाव आणि माजी नगरसेवक आदित्य फत्तेपूरकर यांच्या एन आय टी मित्र परिवाराच्या वतीने प्रतिवर्षी थर्टी फर्स्ट रोजी रक्तदान शिबिर आयोजित केले जाते. यावेळी रक्तदात्यांना प्रमाणपत्रासह भेट देण्यात आली. सलग गेल्या २० वर्षापासून थर्टी फर्स्ट रोजी रक्तदानाची ही चळवळ सुरू आहे. यावेळी शतकवीर रक्तदाते रवींद्र भिंगे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन मनसे नेते दिलीप धोत्रे, माजी उपनगराध्यक्ष नागेशकाका भोसले यांच्या हस्ते झाले. तर युवक नेते प्रणव परिचारक यांनी शिबिराला भेट दिली. तसेच राष्ट्रवादीचे सुधीर भोसले, सौदागर मोळक, एम.पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिरासाठी रेवनील ब्लड बँक सांगोला यांचे सहकार्य लाभले. रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी सर्वश्री श्याम गोगाव, आदित्य फत्तेपूरकर, विठ्ठल कदम, बाहुबली गांधी, महेंद्र जोशी, धनंजय मनमाडकर, सत्यवान दहिवाडकर, गणेश पिंपळनेरकर, अमित करंडे, गणेश जाधव, अमोल आटकळे, संतोष शिरगिरे, दत्ता पवार, विशाल पावले आदींनी परिश्रम घेतले.

## ११ ते २० डिसेंबर दरम्यानचे ऊस बील बँकेत जमा : बबनदादा शिंदे

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभूर्णी, दि. ३१ डिसेंबर-**

विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे युनिट नं.१ पिंपळनेर व युनिट नं.२ करकंब कारखान्याचा सन २०२४-२५ चा गाळप हंगाम सुरू असून या हंगामात ११ ते २० डिसेंबर या कालावधीचे प्रति टन २८०० रूपये प्रमाणे पहिला हप्ताचे ऊस बील सभासद व ऊस पुरवठादार शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले असल्याची माहीती कारखान्याचे संस्थापक चेअरमन माजी आमदार बबनराव शिंदे यांनी दिली.



अधिक माहीती देताना शिंदे म्हणाले, विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे युनिट नं. १ पिंपळनेर व युनिट नं.२ करकंब या कारखान्याचा सन २०२४-२५ चा गाळप हंगाम सुरू असून या हंगामात आज अखेर युनिट नं.१ पिंपळनेर येथे आजअखेर ४ लाख ७१ हजार ०३९ मे.टन व युनिट नं.२ करकंब येथे १ लाख ६६ हजार ३३३ मे.टन ऊसाचे गाळप झालेले आहे. या हंगाम ात १० दिवसाला ऊस बील देणेची परंपरा कायम राखली असून ११ ते २० डिसेंबर या कालावधीचे प्रति टन २८०० रूपये प्रमाणे पहिला हप्ता ऊस बील सभासद व ऊस पुरवठादार शेतक-यांच्या बँक खात्यात जमा करणेत आले आहे. या ऊस बिलासाठी ४९ कोटी ४१ लाख रूपये बँकेत जमा करणेत आलेले आहेत. तसेच दोन्ही युनिटकडे ऊस तोडणी वाहतूक करणा-या वाहनमालकांची बिलेही अदा करणेच्या दृष्टीने कार्यवाही सुरू आहे. अखेर सर्व सभासद व ऊस पुरवठादार शेतक-यांनी सातत्याने कारखान्यास ऊस पुरवठा करून विश्वास दाखविला आहे. सन २०२४-२५ गळीत हंगामामध्येही ऊस पुरवठादारांनी त्यांचा सर्व ऊस विठ्ठलराव शिंदे कारखान्याचे पिंपळनेर व करंकब युनिटला पुरवठा करून गाळप हंगाम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन संस्थापक चेअरमन बबनराव शिंदे यांनी केले.

## आत्मजा घोडके हिची विद्यापीठाच्या बुध्दीबळ संघात निवड

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३१ डिसेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या बुध्दीबळ संघात निवड आत्मजा घोडके, साम ग्लोबल विद्यापीठ भोपाळ येथे दि.२ ते ५ जानेवारी या दरम्यान होणाऱ्या साऊथ वेस्ट झोन राष्ट्रीय स्पर्धेमध्ये बी.पी.सुलाखे महाविद्यालयातील बी.सी.ए. भाग तीन मधील आत्मजा घोडके हिने स्वबळावर मेहनत व दररोज सराव याच्या जोरावर निवड होऊन स्पर्धे ला रवाना झाली. शारीरिक शिक्षण संचालक डॉ. दत्तप्रसाद प्रेमलता, मनोहर सोनटक्के मार्गदर्शन करुन सराव शिबिरासाठी पाठवले.




श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ.बी.वाय. यादव, उपाध्यक्ष नंदनजी जगदाळे, जनरल सेक्रेटरी प्रकाश पाटील, अरुण देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे व सर्व संस्था सदस्य यांनी अभिनंदन केले.


# उजनीच्या पाणी विसर्गामुळे पक्षांना मुबलक चारा उपलब्ध

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.३१ डिसेंबर-**

सोलापूर शहरवासीयांच्या तहान भागवण्यासाठी प्रशासनाने उजनी धरणाच्या जलसाठ्यातून बुधवार (ता.२६ डिसेंबर)पासून पाणी सोडण्याचा निर्णय घेतला आहे,परिणामी तुडुंब भरून १११.२८ टक्के (५९.६२ पीएमसी) २४ ऑक्टोबर रोजी असलेल्या यशवंत सागर जलाशयातील पाण्याचे विसर्ग होऊन काही अंशी भांड्यातील पाणी कमी होणार आहे. यामुळे जलाशयाचे काठ उघडा पडून स्थानिक व स्थलांतरित पक्ष्यांना मुबलक खाद्यान्न उपलब्ध होईल व येत्या काही दिवसांत पक्ष्यांची गर्दी वाढेल.







यावर्षी पावसाळ्याच्या सुरुवातीपासून झालेल्या झालेल्या पावसामुळे धरणातली पाणिसाठयाची क्षमता वाढल्यामुळे पक्ष्यांचा चराऊ भाग लवकरच म्हणजे सप्टेंबर महिन्यातच पूर्णपणे पाण्याने झाकला होता. सतत पडणारा पाऊस व लांबलेल्या पावसाळा या कारणांमुळे जलाशयाच्या काठावर खाद्यान्नाची तुटवडा जाणवत होती. विशेष करून पाण्याच्या काठावर चरणारा करकोचा वर्गातील पक्षी खाद्यापासून वंचित झाले होते.आता विविध प्रकारचे करकोचे पाणलोट क्षेत्रात गर्दी करतील असा अंदाज आहे. २६ डिसेंबर रोजी उजनी धरणाचा असलेला पाणीसाठा १०३.०१ टक्के (५५.१८ टीएमसी) वरून २९ डिसेंबर रोजी १००.२२ टक्के (५३.५९ टीएमसी) वर आला आहे.सध्या सोलापूरला नदीद्वारे ६ हजार क्युसेसने पाणी जात आहे.

**फ्लेमिंगोची संख्या वाढणार**

उजनिचे मुख्य व खास आकर्षण असलेले फ्लेमिंगो (रेहित ) पक्ष गेल्या म हिन्यात पाच पन्नास संखेने येऊन दाखल झाले आहेत. धरणातील पाण्याच्या विसर्गामुळे या पुढे मुबलक खाद्य उपलब्ध होणार. त्यामुळे आणखी फ्लेमिंगो येथील असा अंदाज वर्तविला जात आहे.



उजनी धरणातून सोलापूरला सोडल्याने सोलापूरकर आनंदित झाले आहेत.त्याचप्रमाणे विविध पक्षीही आनंद होतील. विविध पक्ष्यांसाठी नंदनवन ठरलेली उजनी धरणावर येत्या काही दिवसांत अनेक प्रकारचे पक्षी गर्दी करतील.पक्षी निरीक्षकही गर्दी करतील.

**-कल्याणराव साळुंखे, पक्षी निरीक्षक, करमाळा**



जिल्ह्यात सर्वात मोठे जलस्थान ठरलेल्या उजनी धरण गेले तीनं म हिने काठोकाठ भरून असल्यामुळे पक्ष्यांचा चराऊ भाग पाण्यात बुडाला होता.त्यामुळे पक्ष्यांना खाद्य उपलब्ध होत नव्हते.अन्नाच्या शोधार्थात पक्षी जिल्यातील अन्य छोट्या मोठ्या तलाव,पाणवठे व शेतशिवारातील तालीत विकलेले होते.आता धरणातील पाण्याचा विसर्ग केल्यामुळे स्थानिक पक्ष्यांसह स्थलांतरित पक्षी उशीवर गर्दी करतील

**-डॉ. अरविंद कुंभार, ज्येष्ठ पक्षी व पर्यावरण अभ्यासक**

### पाण्याच्या काठावर गर्दी करणारे पक्षी

चित्रबलाक (पेंटेड स्टॉर्क), मुग्धबलाक (ओपन बिल स्टॉर्क), चमचेचोच (स्पून बि), काळा व पांढरे कुदळे (ब्लॅक अँड व्हाईट आयबिस), पाणकावळे (कार्मोरंट), सर्प पक्षी (स्नेक बर्ड), शेकाट्या (स्टिल्ट), राखी बगळा (ग्रे हेरॉन), वंचक (पाँड हेरॉन), मध्यम व पात बगळे(मेडियन ड लिट्ल इग्रेट), लाल गाल्या टिटवी (रेड वॅटल्ड लॅपविंग), तुतुवार, अबलक व छोटा खंड्या (पाईड व लिट्ल किंगफिशर), बंड्या (व्हाईट ब्रेस्टेड किंगफिशर) पाणीटिलवा (शांक), पाणटिवळा (गॉडविट) पाणलावा (स्नाईप), तुतुवार (सँडपाईपर) आदी.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेसाठी मंगरूळच्या विद्यार्थ्यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ,दि.३१ डिसेंबर -**



श्री प्रोॲक्टिवह अबॅकस मंगरूळ (ता. तुळजापूर) येथील ९ विद्यार्थी राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत. सोलापूर येथील हुतात्मा स्मृती मंदिर येथे झालेल्या प्रोॲक्टिवह अबॅकस कॉम्पिटिशन मधुन ह्या विद्यार्थीची निवड करण्यात आली.

६ मिनिटा मध्ये १०० गणिते सोडवण्याचा या स्पर्धेत विद्यार्थीना ३ ते ४ मिनिटांत १०० गणिते सोडवून नवीन विक्रम प्रस्थापित केला आहे. हदया जगताप, जुबेर शेख, ईश्वरी चौधरी, समेरा मकानदार, श्रुती डोंगरे, अदनान मकानदार, आर्यन शिंदे, रुद्र जांभळे, इंद्रायणी हुककीरे ह्या विद्यार्थीची निवड कोल्हापूर येथे होणाऱ्या राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

त्याच सोबत श्री प्रोॲक्टिवह अबॅकसचे संचालक आशिष साठे यांना ब्रेन डेव्हलपमेंट या कार्यासाठी २०२४ चा उत्कृष्ट पुरस्कार देण्यात आला.

या यशस्वी विद्यार्थी व आशिष साठे यांचे सर्वस्रातून अभिनंदन व कौतुक केले जात आहे.

### संक्षिप्त वृत्त...



## केंद्रीय युवा महोत्सवात उपपरिसर विद्यापीठास सात पारितोषिके

**धाराशिव, दि.३१ डिसेंबर -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर, आयोजित केंद्रीय युवा महोत्सवात उपपरिसर धाराशिवने वेगवेगळ्या कलाप्रकारात सात पारितोषिके मिळवली. मुकाभिनय प्रथम, मिमिक्री प्रथम, लोकनाट्य प्रथम, भारुड प्रथम, प्रहसन द्वितीय, पोवाडा द्वितीय, गोंधळ द्वितीय. तसेच नाटक विभागाची जनरल चॅम्पियनशिप आणि नाडापुडे फिरता करंडक सुद्धा मिळवला. सर्व विद्यार्थ्यांचे उपपरिसराचे संचालक, विभाग प्रमुख आदिंनी अभिनंदन केले आहे.

## जिल्हा संयोजकपदी इंद्रजीत देवकते यांची निवड

**धाराशिव, दि.३१ डिसेंबर -**

भारतीय जनता पक्षाचे सदस्यता अभियान संपूर्ण देशभरात मोठ्या उत्साहाने राबवले जात आहे. या



अभियानाच्या अनुषंगाने धाराशिव जिल्ह्यासाठी नवी जबाबदारी वाटप करण्यात आली आहे. भाजप प्रदेश कार्यालयाकडून धाराशिव जिल्हा संयोजक पदी इंद्रजीत देवकते यांची निवड करण्यात आली आहे. सहसंयोजक म्हणून मीना सोमाजी, विक्रांत संगशिट्टी, सुदाम पाटील, आणि मकरंद पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच सोशल मिडिया प्रतिनिधी म्हणून श्किशोर तिवारी, तर सेल प्रतिनिधी म्हणून जगदीश जोशी यांना जबाबदारी देण्यात आली आहे. या निवडीबद्दल आ. राणाजगजितसिंह पाटील, माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, जिल्हाध्यक्ष संताजीराजे चालुक्य पाटील यांनी स्वागत करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



## एकलव्य क्लासेसतर्फे विज्ञान, गणित प्रदर्शन

**जळकोट, दि.३१ डिसेंबर -**

कलव्य क्लासेस, वराडे (उंब्रज) येथे विज्ञान व गणित प्रदर्शन घेण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून श्री. रितेश सावंत हे उपस्थित होते. विद्यार्थ्यांचे उद्याचा शास्त्रज्ञ हा एकलव्य क्लास मधीलच होणार आहे, असे सावंत यांनी सांगितले. कार्यक्रमास शिंदे, वराडे गावचे सरपंचतेजस्विनी इंगळे, रवींद्र पवार, शिवकुमार शेटे, सर्व पालक, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमात क्लासच्या सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जान्हवी शेटे व साक्षी यांनी केले. आभार वैष्णवी फुले हिने केले.

## सखी मल्टीस्टेटच्या दिनदर्शिकाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग,दि.३१ डिसेंबर -**

नळदुर्ग येथील सखी मल्टीस्टेट को -ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीने काढलेल्या वार्षिक दिनदर्शिका २०२५ या दिनदर्शिकेचे प्रकाशन दि.३१ डिसेंबर रोजी नळदुर्ग शहर पत्रकार संघाचे पदाधिकारी व सदस्यांच्या हस्ते करण्यात आले. दि. ३१ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता सोसायटीच्या कार्यालयात नळदुर्ग शहर पत्रकार संघाचे पदाधिकारी व सदस्यांच्या हस्ते या दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी नळदुर्ग सुहास येडगे, सुधीर हजारे, अमर भाळे, सुनिल गव्हाणे, बाळु पाटील, अजय राजेंद्र ठाकुर व रामानंद लंगडे यांच्यासह सोसायटीचे ग्राहक उपस्थित होते.

### मंगळवार ७ जानेवारी रोजी होणार घटस्थापना... शनिवार ११ जानेवारी रोजी जलयात्रा...

# तुळजाभवानी देवीच्या शाकंभरी नवरात्र महोत्सवास प्रारंभ

### आजपासून १४ जानेवारीपर्यंत श्री तुळजाभवानी मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमाचे मंदिर संस्थानच्या वतीने आयोजन...









**तुळजापूर :** तुळजाभवानी देवीच्या निद्रेसाठी नवीन गादी तयार करण्यासाठी कापूस पिंजताना भाविक भक्त.२) तुळजाभवानी देवीचा फोटो. ३) मंदिर महाद्वारचा फोटो. ४) तुळजाभवानी देवीचा मंदिर परिसर.

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर,दि.३१ डिसेंबर -**

श्री तुळजाभवानी देवीच्या शाकंभरी नवरात्र महोत्सव दि.३१ डिसेंबर ते दि.१४ जानेवारी पर्यंत होणार आहे या पंधरा दिवसांमध्ये नवरात्र उत्सवातील विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन मंदिर संस्थांनी केले आहे.

आज मंगळवार दि.३१ डिसेंबर दिवशी तुळजाभवानी देवीच्या मंचकी निद्रेस प्रारंभ झाला आहे. सात दिवसाच्या मंचकी निद्रेनंतर मूळ सिंहासनावर प्रतिष्ठापना होऊन नित्योपचार पूजेनंतर मंगळवार दि. ७ जानेवारी रोजी घटस्थापनेने देवीच्या शाकंभरी नवरात्रास प्रारंभ होईल.



रात्री याच दिवशी श्री तुळजाभवानी मातेचा छबिना काढण्यात येणार आहे.

### शाकंभरी नवरात्रात देवीच्या मंचकी निद्रेसाठी कापूस पिंजून नवीन गादी...

श्री तुळजाभवानी मातेचा धाकटा दसरा म्हणजे शाकंभरी नवरात्र महोत्सव आजपासून दि.१ जानेवारीला सुरू होणार असल्याने तुळजाभवानी मंदिरात देवीच्या निद्रेसाठी कापूस पिंजून नवीन गादी तयार करण्यासाठी आराधी महिला भावीक भक्त मोठ्या संख्येने मंदिरातील ओव्हरी मध्ये जमा झाल्या होते. आराधी महिला आणि भाविक भक्तांनी मिळून आराधी आणि देवीचे गाणे म्हणत म्हणत देवीच्या गादीचा कापूस पिंजून घेतला. त्यानंतर देवीच्या निद्रेसाठी नवीन गादी तयार करून घेण्यात आली. तसेच देवीच्या चांदीच्या पलंगाची देखील साफसफाई स्वच्छता देवीचे सेवेकरी पंलगे बांधवांनी करून घेतली. मंगळवार ३१ डिसेंबर रोजी रात्री साडे नऊ वाजता देवीची मंचकी निद्रा सुरू झाली आहे.

### यजमान पदाचा पाळीकर पुजारी मंडळाला मान...

श्री तुळजाभवानी देवीच्या तिन्ही पुजारी मंडळाला प्रत्येक वर्षी क्रमाने यजमान पदाचा मान दिला जातो. यावर्षी पाळीकर पुजारी मंडळाला हा मान मिळाला आहे. यावर्षी शाकंभरी नवरात्र महोत्सवांमध्ये मुख्य यजमान म्हणून विवेक गंगणे यांची निवड पुजारी मंडळाच्या वतीने करण्यात आली आहे.

शाकंभरी नवरात्र महोत्सवातील सर्वात मोठा उत्सव म्हणजे जलयात्रा शनिवार दि.११ जानेवारी रोजी पापनास तीर्थ येथून देवीची भव्य जल यात्रा मंदिरापर्यंत काढण्यात येते. रविवार दि.१२ जानेवारी रोजी अग्निस्थापना सतचंडी होम हाऊस सुरुवात होईल.

त्यानंतर रात्री देवीचा छबिना काढण्यात येईल. सोमवार दि.१२ जानेवारी रोजी पौर्णिमा असल्याने देवीची धुपारती होऊन घटोत्थापन होत.

त्यानंतर पूर्णाहुती आणि रात्री देवीचा छबिना काढण्यात येतो. मंगळवार दि.१४ जानेवारी रोजी मंदिर संस्थांच्या वतीने सर्व भाविक भक्तांसाठी अन्नदान महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती पुजारी मंडळाच्या वतीने देण्यात आली आहे.

## एसडीओ साहेबांची कर्मचाऱ्यास धमकी

### कर्मचाऱ्यांकडून एसडीओंच्या बदलीची मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ डिसेंबर -**

दफ्तर तपासणीची कसलीही पूर्वसूचना न देता थेट कार्यालयात येवून दफ्तर तपासणी करणाऱ्या आणि कर्मचाऱ्यांना एसीबीची भिती दाखवत फौजदारी गुन्हा दाखल करण्याची धमकी देणाऱ्या उपविभागीय अधिकारी यांची बदली करण्याची मागणी धाराशिव तहसीलच्या कर्मचाऱ्यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

यावेळी दिलेल्या निवदेनात म्हटले आहे की, दि.२६ डिसेंबर रोजी दुपारी साधारणतः ५.३० वाजण्याच्या दरम्यान उपविभागीय अधिकारी संजयकुमार डव्हळे व त्यांचे कार्यालयातील अधिकारी,कर्मचारी यांनी तहसील कार्यालयात अचानक भेट दिली. त्यांनंतर उपविभागीय अधिकारी व त्यांचा स्टाफ यांनी इनाम, सीलिंग व एलएनडी संकलनाचे सहायक महसूल अधिकारी यांची दप्तर तपासणी केली. सदरील दप्तर तपासणी ते कार्यालयात आल्यापासून उक्त शाखेच्या खोलीचे दार बंद करून रात्रीचे ७ वाजेपर्यंत केली. त्यामुळे त्यांचे शारिरिक व मानसिक संतुलन खराब झाले आहे. त्यानंतर ते तहसिलदार यांच्या दालनात बसून रात्री ८.३० वाजेपर्यंत इतर कर्मचारी यांना बोलावून घेतले. तसेच तहसिलदार दौऱ्यावरुन परत आल्यानंतर गौणखनिज शाखेतील संचिकेची पाहणी केली. त्यानंतर नैसर्गिक आपत्ती शाखेचा अनुदान वाटप बाबत चौकशी केली. कुळ विभागाच्या संचिकांची तपासणी केली. लेखा शाखेच्या कॅशबुकची पाहणी केली. उपविभागीय अधिकारी यांनी संचिकेची मागणी करून संचिकेबाबत विचारणा केली असता तहसिलदार व संबंधित कार्यासनाच्या कर्मचारी यांनी त्याबाबत स्पष्टीकरण दिले असता त्यांची त्याबाबत ऐकून घेण्याची त्यांची मनःस्थिती नव्हती व त्यांना सगळ्यांसमोर अपमानास्पद वागणूक दिली.

दप्तर तपासणी करत असताना कोणत्याही प्रकारचा फॉर्म भरून घेण्यात आला नाही. त्यानंतर तहसिलदार यांचेसमक्ष भूसंपादन व प्रमाणपत्र कार्यासनाचे महसुल सहायक यांना कार्यालयात बोलावण्यात आले. त्यांची वैयक्तिक तक्रार झालेली असल्याने त्याबद्दल संबंधितास एसीबीमध्ये घालतो, तालुकास्तरीय भ्रष्टाचार समिती अध्यक्ष आहे. तुमची सगळ्यांची वाट लावतो. तुमची एसीबीमध्ये माझ्याकडील लोकांकडून तक्रार करून वाट लावतो, अशा धमकी दिल्या आहेत. यामुळे कार्यालयात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. कर्मचारी दहशतीमध्ये व मानसिक त्रासामध्ये आहेत. त्यामुळे याचा कार्यालयीन कामकाजावर विपरीत परिणाम होणार आहे. उपविभागीय अधिकारी यांनी तहसिलदार व इतर कर्मचारी यांना अपमानास्पद वागणूक देऊन फौजदारी गुन्हे करतो, अशी धमकी देण्यात आलेली आहे. या निषेधार्थ तहसिल कर्मचाऱ्यांनी दि.३१ रोजी बेमुदत कामबंद आंदोलन सुरु केले आहे.

निवेदनावर तहसिलदार डॉ. मृणाल जाधव, ना. तहसिलदार एम.जी.शिंदे, महसुल संघटनेचे तालुकाध्यक्ष धिरज बनसोडे, बा.प. ढवण, एस.ए. तुगावे, एम.एम.लोखंडे, बी.के. पवार, विरभद्र स्वामी आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## सारोळा मांडवा येथे एसटी बस चालकाला मारहाण; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव,दि.३१ डिसेंबर -**

वाशी तालुक्यातील सारोळा मांडवा येथे एसटी बस चालकाला मारहाण करण्यात आल्याची घटना दि. ३० डिसेंबर २०२४ रोजी घडली. याप्रकरणी वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, सुदाम शेषराव मोहिते (वय ५२, रा. घोडकी) हे महाराष्ट्र राज्य परिवहन मार्ग विभागात चालक म्हणून कार्यरत आहेत.

ते कळंब आगारातून बस क्रमांक एमएच २० बीएल १६२९ ही बस घेऊन कळंब-ईटकुरते-लिंगी-पिंपळगाव मार्गे जात असताना सारोळा मंडवा येथे बाबुराव मोरे (रा. सारोळा मांडवा) यांच्या कारने (क्रमांक एमएच १४ जी एच १२२७) त्यांच्या बसला रस्ता अडवला. यावरून बाबुराव मोरे यांनी सुदाम मोहिते यांना शिवीगाळ करून लाथाबुक्यांनी मारहाण केली. तसेच शासकीय कामात अडथळा निर्माण करून



जिवे मारण्याची धमकी दिली.

याप्रकरणी सुदाम मोहिते यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वाशी पोलीस ठाण्यात बाबुराव मोरे यांच्याविरुद्ध भादंवि कलम १३२, ११५, ३५२, ३५१(२), ३५१(३) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## उमरग्यात मागील भांडणावरुन तरुणाला मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव,दि.३१ डिसेंबर -**

श्रीकृष्ण महाविद्यालय गुंजोटी येथील गेट समोर एका तरुणाला मागील भांडणाच्या कारणावरून काही जणांनी बेदम मारहाण केल्याची घटना दि. ३० डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजता घडली.

याबाबत माहिती अशी की, विशाल सुरेश गायकवाड (वय २२, रा. औराद) या तरुणाला अंकुश टाकळे, प्रमोद पाटोळे, रोहित घोडके, गंगाधर स्वामी, रोहन थोरात, मनोज कारभारी, विक्रांत गायकवाड, आकाश पात्रे (सर्व रा. गुंजोटी) यांनी गैरकायद्याची मंडळी जमवून शिवीगाळ केली. तसेच लाथाबुक्यांनी, हंटर, रॉड व चाकूने मारहाण करून जखमी करून जिवे मारण्याची धमकी दिली.विशाल गायकवाड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून उमरगा पोलीस ठाण्यात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## 'सुंदर माझी शाळा' या योजनेला प्रशासनाकडून केराची टोपली







**आकाश पोतदार**
**उमरगा,दि.३१ डिसेंबर -**

तालुक्यातील मल्लिकार्जुन नगर, बलसुर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये बरेच वर्षापासून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व शाळेची दरवाजे देखील दुरावस्थेत असून याआधी या शाळेमध्ये दोनदा चोरीच्या घटना देखील घडल्या आहेत. तसेच शौचालयाची व्यवस्था नसल्याने येथील विद्यार्थ्यांना मोठी कसरत करावी लागत आहे.

या शाळेच्या बाजूला अंगणवाडी आहे. या अंगणवाडी मधील महिला शिक्षक व मदतनीस यांना देखील शौचालयासाठी तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसल्याने समस्येला सामोरे जावे लागत आहे. प्रत्यक्षात पाहणी केली असता शाळेमध्ये पाण्याची टाकी बांधण्यात आली आहे. मात्र या टाकीला पाण्याचं नळ कनेक्शनच नाही. शाळेतील विद्यार्थ्यांसाठी मुख्याध्यापकाकडून पिण्याच्या पाण्यासाठी रोज पाण्याचा जार विकत आणण्याची नामुष्की ओढवली आहे. शाळा व शाळेलगत असलेल्या अंगणवाडीमध्ये लाईटचे कनेक्शन नाही. सीसीटीव्हीची व्यवस्था नाही. शाळेला कंपाउंड वॉल अर्धवट अवस्थेत आहे. वास्तविक गटशिक्षणाधिकारी यांनी जिल्हा परिषद शाळांना वेळोवेळी भेट देऊन मूल्यांकन करावयाचे असते. या सर्व बाबी त्यांच्या निदर्शनास आल्या नसल्याचे नवलच म्हणावे लागेल. तसेच ग्रामपंचायतच्या चौदाव्या वित्त आयोगामधून जो काही निधी मिळतो तो देखील ग्रामपंचायत कार्यालय योग्यरित्या वापरत नसल्याचे चित्र यावेळी दिसून आले.

यामुळे येथील नागरिकांमधून संतप्त प्रतिक्रिया येत असून या शाळेला कोणी वाली नाही का? असा सवाल उपस्थित केला जात आहे. काही महिन्यापूर्वीच शाळकरी विद्यार्थिनीवर अत्याचार झाल्याच्या प्रकरणावरून संपूर्ण महाराष्ट्र संतप्त झाला होता. मात्र मल्लिकार्जुन नगर बलसुर येथील शाळेकडे प्रशासनाचे पूर्णतः दुर्लक्ष होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

एकीकडे महाराष्ट्र शासनाकडून सुंदर माझी शाळा तसेच विद्यार्थ्यांसाठी विविध योजना राबवण्यात येत आहेत. मात्र ग्राम पंचायत कार्यालय व प्रशासनाकडून अशा योजनेला केराची टोपली दाखवण्यात आली असल्याचे दिसून येत आहे.


याबाबत शिक्षण अधिकारी यांच्याशी अधिक माहिती घेण्यासाठी वारंवार संपर्क साधला असता संबंधित गटशिक्षणाधिकारी यांनी फोन उचलला नाही.


> शाळेच्या दुरावस्थेबाबत आम्ही वारंवार ग्रामपंचायत व वरीष्ठ कार्यालयाशी पत्रव्यवहार केला. मात्र ग्रामपंचायत कार्यालय, गटशिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडून कोणतेही ठोस पावले उचलली गेलेली नाहीत.
>
> **- हर्षराज किल्लारीकर, मुख्याध्यापक**


> शाळेच्या दुरावस्थेबाबत आम्ही देखील ग्रामपंचायत यांच्याशी वारंवार शाळेच्या मार्फत संपर्क साधला. परंतु अद्यापही ग्रामपंचायत व शिक्षण विभागाकडून कोणतीही ठोस पावले उचलली गेलेली नाही. शाळेला पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही. शौचालयाची व्यवस्था झालेली नाही. अर्धवट कंपाऊंड आहे. या सगळ्या बाबीकडे शिक्षण विभागाने गांभीर्याने लक्ष घालून तात्काळ शाळेच्या समस्या प्रशासनाने सोडवावे जेणेकरून शाळकरी मुलां-मुलींची होणारी हेळसांड दूर होऊन पालक आपल्या पाल्यांना शाळेत निसंकोच पाठवतील.
>
> **- ओम देवणे, नागरिक बलसुर**

### रानच्या पाखरांची रानात भेट झाली... पाहून डौलदार पिके शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर दिसे खुशाली...

# तेरखेडा शिवार हरभरा, गहू, ज्वारी पिकांनी बहरले







**तभा वृत्तसेवा**
**तेरखेडा,दि.३१ डिसेंबर -**

राज्यात यंदा मागच्या वर्षीच्या तुलनेत चांगल्या स्वरूपाचा पाऊस बरसला आहे. विहिरी बोरला सध्या मुबलक पाणी असून नदी देखील आणखी झुळझुळ वाहत आहे. त्यामुळे चालू रब्बी हंगामातील शेतकऱ्यांची पाण्याची चिंता मिटलेली आहे.

वाशी तालुक्यातील तेरखेडा शिवारात गहू, हरभरा, ज्वारी पिकांची पेरणी मोठ्या प्रमाणात केली आहे. पिके जोमदार अवस्थेत आहेत. शेतकऱ्यांची कोळपणी फवारणी झालेली आहे. शेतकरी पिकांना पाणी देण्यात व्यस्त असल्याचे दिसत आहे. पिकाला पाटाने पाणी न देता आता शेतकरी तुषार सिंचनाकडे वळाले आहेत.

८० टक्के शेतकरी स्पिंकलरच्या साह्याने पाणी देत असल्याचे दिसते. त्यामुळे पाण्याची देखील मोठी बचत होत असल्याचे शेतकरी सांगत आहेत.

सध्या हिरव्यागार पिकामुळे तेरखेडा शिवारात जणू काय काळ्या आईने हिरवा शालू पांगरला आहे, असेच म्हणावे लागेल. रानच्या पाखरांची रानात भेट झाली रानपाखरे शिवारात किलबिल आवाज करत ज्वारीच्या पिकावर ह्या झाडावरून त्या झाडावर उड्या मारत मस्ती करत आहेत.

तर दुसरीकडे स्पिंकलरची पिकावर रिमझिम सुरू आहे. त्यामुळे बळीराजा शिवारात रमला आहे.

# बीडमधून निघाली भव्य व्यसनमुक्ती जनजागृती फेरी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ डिसेंबर**

लोकनेते विनायकराव मेटे यांनी उभ्या हयातीत सामजिक प्रश्नावर लढा दिला. समाज व्यसनमुक्त व्हावा यासाठी नेहमीच त्यांचा प्रयत्न राहिला त्यांच्या दुर्दैवी जाण्याने त्यांची ही चळवळ आता शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ ज्योती विनायकराव मेटे या पुढे घेऊन जात आहेत. प्रति वर्षी प्रमाणे यंदाही तुकाराम रूरल अँड ह्युमन डेव्हलपमेंट चॅरिटेबल ट्रस्ट, बीड च्या माध्यमातून व्यसनमुक्ती अभियान राबविण्यात येत असून आज दि. ३१ डिसेंबर रोजी शहरात जनजागृती रॅली काढण्यात आली. येथील श्रीमंत योगी छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा क्रिडा संकुल येथून डॉ. ज्योतीताई मेटे यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी या जनजागृती रॅलीला हिरव झेंडा दाखवत सुरुवात केली.

श्रीमंत योगी छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा क्रिडा संकुल येथून निघालेली फेरी सुभाष रोड, माळीवेस, धोंडीपुरा, बलभीम चौक, बशीरगंज, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनात पोचली. 'मद्यपान संसाराची धुळधाण', 'व्यसनाची गोडी अन् संसाराची राखरांगोळी', 'घ्याल तंबाखुची साथ', 'आयुष्य होईल बरबाद', अशा विविध घोषणांनी परिसर दणानूण गेला. वारकरी मंडळी हे या रॅलीतील मुख्य आकर्षण ठरले त्याचबरोबर परिचर्या महाविद्यालये, शाळा, महाविद्यालयातील हजारो विद्यार्थी, तरुण, समाजातील विविध घटकांतील नागरिकांसह महिलांनीही मोठ्या प्रमाणावर सहभाग घेतला. सहभागींच्या हाती घोषणांचे फलक होते. यावेळी तंबाखू जन्य पदार्थांची होळी देखील करण्यात आली आणि जनजागृती रॅलीचा समारोप हा व्यसनमुक्तीची शपथ देऊन करण्यात आला.

यावेळी शिवसंग्रामचे प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, सुशिलाताई मोराळे,शिवसंग्राम जिल्हाध्यक्ष नारायणराव काशिद, नितीन शेठ कोटचा ,भाजपा सरचिटणीस सर्जेराव तांदळे, एमआयएमचे जिल्हाध्यक्ष शेख शफीक भाऊ, अशुतोश मेटे, नितीन लाठकर, अनिल घुमरे पाटील, सुहास पाटील, उत्तमराव पवार ,नारायण थोरात, गौतम खटोड,ए. आर. पाटील, गोपाळ धांडे, सुभाष जाधव, बन्सी हावळे सर, बाळासाहेब हावळे, पंडित माने, गोपीनाथ घुमरे , सचिन कळकुटे, नवनाथ



प्रभाळे आदींसह प्रतिष्ठानचे , शिवसंग्रामचे शेकडो कार्यकर्ते यांच्यासह विद्यार्थी, तरुण , नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जगातील सर्वाधिक तरुणांचा देश म्हणून भारत पुढे येतो आहे. त्याचबरोबर आर्थिक दृष्ट्या संपन्न आणि अनेक बाबतीत महाराष्ट्राची ख्याती आहे. असे असताना देखील २०१९ ते २१ या कालावधीमध्ये दाखल झालेल्या गुन्ह्यांचा विचार करता देशात सर्वप्रथम उत्तर प्रदेश त्यानंतर पंजाब आणि महाराष्ट्राचा नंबर लागतो हे राज्यसभेमध्ये पटलावर ठेवलेल्या माहितीवरून दिसून येते हे गुन्हेगारीचे वाढते प्रमाण फक्त व्यसनामुळेच होत आहे. ही बाब संस्कृत महाराष्ट्रला वेदना देणारी आहे. याची जाणीव ठेवत लोकनेते विनायकराव मेटे यांनी ही व्यसनमुक्तीची चळवळ उभी केली ती चळवळ आम्ही निर्धाराने पुढे नेत आहोत असे प्रतिपादन डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी व्यसनमुक्ती जनजागृती रॅलीच्या समारोपाप्रसंगी व्यक्त केले. तसेच कार्यक्रमात सुशिलाताई मोराळे, शिवसंग्राम जिल्हाध्यक्ष नारायणराव, भाजपा सरचिटणीस सर्जेराव तांदळे, एमआयएमचे जिल्हाध्यक्ष शेख शफीक भाऊ, अशुतोश मेटे, शिवसंग्राम जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले.

# श्री मंगलनाथ मल्टीस्टेटचे कार्य दीपस्तंभाप्रमाणे-काका कोयटे

## ग्राहक मेळावा व आर्थिक साक्षरता अभियानास ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

माजलगाव (प्रतिनिधी)-दिनांक २९ डिसेंबर रोजी श्री मंगलनाथ मल्टीस्टेट च्या परळी शाखेचा ग्राहक मेळावा व आर्थिक साक्षरता कार्यक्रम संपन्न झाला.श्रीमंगलनाथ मल्टीस्टेट या संस्थेला २५ वर्ष पूर्ण होत असून त्यानुषंगाने संस्थेच्या रोप्यमहोत्सव व परळी शाखेच्या १३ व्या वर्धापन दिनानिमित्त परळी शाखेचा ग्राहक मेळावा आयोजित करण्यात आला होता. ग्राहक मेळाव्याचे प्रमुख मार्गदर्शक महाराष्ट्र पतसंस्था फेडरेशन चे अध्यक्ष श्री काकासाहेब कोयटे तर प्रमुख अतिथी म्हणून माजलगाव मिस्कीन स्वामी मठ संस्थान चे मठाधिपती श्री चंद्रशेखर शिवाचार्य महाराज माजलगावकर हे होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री आर.जी. कानडे साहेब तर प्रमुख पाहुणे म्हणून मा .सोमनाथअप्पा हालगे मा. नगराध्यक्ष परळी,मा. अशोकशेठ जैन माजी चेअरमन वैद्यनाथ बँक परळी,मा दत्ताअप्पा इटके गुरुजी सचिव जवाहर एजुकेशन सोसायटी,मा.विष्णुपंत कुलकर्णी संचालक भा.शि.प्र.म.अंबेजोगाई, मा. चेतन सौंदळे माजी नगरसेवक परळी व श्री रमेश सपाटे संचालक श्री मंगलनाथ मल्टीस्टेट इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

सदरील कार्यक्रमाचे उदघाटक श्री काका साहेब कोयटे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, श्री मंगलनाथ समूह हा गेली २५ वर्षांपासून सहकार क्षेत्रात यशस्वी कार्य करत आहे. बीड जिल्ह्यातील सहकारक्षेत्राचा पाया श्री मंगलनाथ मल्टीस्टेट संस्थेने उभारला असुन संस्थेचे अध्यक्ष हे निवृत्त लेखापरीक्षक असल्यामुळे त्यांनी संस्थेचे आर्थिक धोके लक्षात घेऊन कामकाज पहिले त्यामुळे संस्था गेली २५ वर्षांपासून अविरत आपल्या सेवेत भक्कम उभी आहे.सोनेतारण कर्ज सारख्या सुरक्षित कर्जा ला प्राधान्य देत ठेवीदारांना भक्कम सुरक्षा कवच निर्माण करण्याचे कार्य संस्थेने केले आहे.. मंगलनाथ मल्टीस्टेट या संस्थेचे सहकार चळवळीत महत्वपूर्ण योगदान राहिले असून आर्थिक साक्षरता अभियान राबवत ग्राहकांमध्ये जनजागृती करणारी मंगलनाथ ही पहिली संस्था आहे असे गौरव उद्गार त्यांनी काढले, यापुढे देखील संस्था सभासदांच्या गरज जाणून कार्य करत राहील व सहकारातून समृद्धीकडे वाटचाल करत सर्व सहकारी पतसंस्थांसाठी दीपस्तंभा प्रमाणे कार्य करत राहील असा विश्वास व्यक्त करत संस्थेला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष आर.जी. कानडे साहेब यांनी अध्यक्षीय समारोप केला व सांगितले कि संस्थेला २५ वर्ष पूर्ण होत आहेत या २५ वर्षातील एकंदरीत गुणवत्ता पूर्वक प्रगतीमध्ये सभासद वर्गाचे मोलाचे सहकार्य सभासदांचे लाभले त्यामुळे सभासदांचे आभार व्यक्त करतो व येत्या काळामध्ये संस्था सभासदांकरिता अनेक उपयोगी योजना राबवणार असून संस्थाया पुढे देखील सभासदांचे हित जोपासून कार्य करेल असे आश्वासन दिले. कार्यक्रमास परळी परिसरातील मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते . कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक श्री रवींद्र कानडे यांनी केले तर कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता शाखेचे व्यवस्थापक गजानन हालगे उमाकांत काळे, मुळे आनंद श्री सर्वेश सपाटे यांनी परिश्रम घेतले व कार्यक्रम यशस्वी संपन्न झाला.

# बाल साहित्य परिषद शाखा,बीड व सौ.के.एस.के.महाविद्यालय,बीड तर्फे फिरते वाचनालय ग्रंथपेटी शिवाजी विद्यालय बीड यांना सुपूर्द

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ डिसेंबर**

दिनांक ३१ डिसेंबर २०२४ रोजी बालरंगभूमी परिषद शाखा बीड जिल्हयाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर यांच्या हस्ते श्री.शिवाजी महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री.आमटे विक्रम यांना फिरते वाचनालयाची ग्रंथपेटी सुपूर्त करण्यात आली. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर यांचे मार्गदर्शन लाभले.



सौ.के.एस.के.महाविद्यालय आणि बीड बालरंगभूमी परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने हा फिरत्या वाचनालयाचा उपक्रम राबवला जात आहे.मुलांना वाचनाची गोडी लागावी म्हणून शासनस्तरावरती विविध उपक्रम राबवले जात आहे. त्याचा एक भाग म्हणून हे फिरते वाचनालय बीड येथील शिवाजी विद्यालयाचे ग्रंथपाल यांना ही पुस्तक पेटी सुपूर्त करण्यात आली आहे.

यावेळी मनोगत व्यक्त करताना नवगण शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्ष प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर म्हणाल्या की, लहान वयातील विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची अभिरूची निर्माण करण्यासाठी हा उपक्रम आवश्यक आहे.यामुळे विद्यार्थ्यांना थोर व्यक्तींचे चरित्र वाचून प्रेरणा मिळेल.देशाला सुजान नागरीक तयार करण्यासाठी याचा फायदा होईल.या कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर, महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा.शेख जी.आय तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.




भाजपा संघटन पर्व सदस्य नोंदणी अभियानात बोलतांना सदस्य नोंदणी अभियानाचे भाजपाचे नवनाथ आण्णा शिराळे पाटील दिसत आहेत.

# सिद्धीविनायक अर्बनच्या दिनदर्शिका चे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.३१ डिसेंबर**

मंगळवार दि. ३१, माजलगाव, सिद्धीविनायक अर्बन को-ऑप. क्रे. सो. लि. माजलगाव च्या २०२५ दिनदर्शिकेचे लोक प्रकाशन उत्साहात करण्यात आले.याप्रसंगी सेवा समितीचे जिल्हा अध्यक्ष डॉ. किशोर रत्नपारखी, श्री. सिद्धेश्वर माध्यमिक विभागाचे प्रमुख प्रशांत भानप, भाजपा सोशल मीडियाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य दत्ता महाजन मा. सरपंच प्रल्हाद दळवी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ प्रशांत पाटील संचालक



विनायक रत्नपारखी कैलास जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी बोलताना सिद्धीविनायक अर्बनचे संस्थापक अध्यक्ष डॉ.प्रशांत पाटील म्हणाले की सिद्धीविनायक अर्बन संस्था ही पहिल्या वर्षापासून आजतगायत आपल्या उत्कृष्ट कामामुळे अ वर्ग असलेली एकमेव संस्था आहे, संस्थेला आय.एस.ओ. ९००१:२०१५ नामांकन आहे, संस्था संपूर्ण संघनीकृत आहे, संस्थेत कोअर बँकिंग सुविधा आहे, संस्थेचा शैक्षणिक सामाजिक व सहकार चळवळीत सहभाग, आय.एम.पी.एस, एन.इ.एफ.टी, आरटीजीएस ची सुविधा असलेली संस्था, ठेवीवर आकर्षक व्याजदर व सर्व प्रकारचे कर्ज देणारी संस्था, सर्वात महत्वाचे म्हणजे पारदर्शक कारभार, तत्पर व विश्वसनीय सेवा देणारी संस्था असे अनेक वैशिष्ट्ये असणारी व अल्पावधीतच नावारुपाला आलेली आपली सिद्धीविनायक अर्बन को ऑप. क्रे. सो. लि. हि आपली संस्था असल्याचे त्यांनी बोलताना डॉ. प्रशांत पाटील यांनी सांगितले.याप्रसंगी संस्थेचे सर्व संचालक मंडळ स्थानिक सल्लागार व कर्मचारी उपस्थित होते.

# राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता प्रगती अभियान

## प्रस्तावासठी ५ जानेवारीपर्यंत मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ डिसेंबर**



राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा या स्पर्धेचे प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करणे तसेच अभियान व स्पर्धेशी संबधित सर्व अनुषंगिक बाबींवर कार्यवाही करण्यासाठी ऑनलाईन पोर्टल विकसित करण्यात आले असून या पोर्टलच्या संकेतस्थळाची लिंक pragatiabhiyan.maharashtra.gov.in अशी आहे.

दि. ३/२/२०२१ च्या शासन निर्णयाच्या तरतुदीनुसार या योजनेअंतर्गत घेण्यात येणा-या स्पधेसाठी सर्व स्तरावर प्रस्ताव स्विकारण्याची मुदत दि. १६ ते ३१ ऑक्टोबर २०२४ होती. या कालावधीत वाढ करुन दि. ५ जानेवारी २०२५ पर्यंत ऑनलाईन प्रस्ताव स्वीकारण्यास मुदतवाढ दिली आहे.

स्पर्धेत सहभाग घेण्याच्या अनुषंगाने सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या सचिवांनी राज्यस्तरावर त्याचप्रमाणे विभागीय,महानगरपालिका व तालुका स्तरावर स्पर्धेचे अर्ज परिच्छेद २ मध्ये नमूद केल्यानुसार दि. ५ जानेवारी २०२५ पर्यंतच्या कालावधीत ऑनलाईन (ONLINE) पध्दतीने पाठविण्याच्या सूचना सामान्य प्रशासनाचे उपजिल्हाधिकारी शैलेस सुर्यवंशी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे दिल्या आहेत. या प्रस्तावावर शासन नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. तरी इच्छुकांनी वरील मुदतीत ऑनलाईन प्रस्ताव सादर करावेत.

# लातूर पॅटर्न प्रमाणे मोटे क्लासेस ने नाव करावे-तहसीलदार संदिप खोमणे



**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.३१ डिसेंबर**

मोटे कोचिंग क्लासेसच्या दिनदर्शिकेचा प्रकाशन सोहळा नुकताच संपन्न झाला या प्रकाशन सोहळ्या प्रसंगी बोलताना तहसीलदार संदिप खोमणे यांनी मोटे कोचिंग क्लासेसचे कौतुक करीत महाराष्ट्रात लातूर पॅटर्न तर गेवराईमध्ये मोटे पॅटर्न हे नाव अबाधित राहण्यासाठी येथील शिक्षकांनी हे नेहमीच प्रयत्नशील राहून आपल्या क्लासेसचे विद्यार्थी चांगल्या हुद्द्यावर नोकरीस लागतील यासाठी प्रयत्न करावे.

गेवराईमधील मोटे कोचिंग क्लासेस गेल्या पाच वर्षापासून शैक्षणिक क्षेत्रामध्ये उत्तम दर्जाचे शिक्षण विद्यार्थ्यांना मिळवून देत आहे .गेल्या काही वर्षापासून मोटे कोचिंग क्लासेसमधील विद्यार्थी बारावी बोर्ड या परीक्षेत तालुक्यामधून प्रथम क्रमांक मिळवत असल्याचे क्लासेसचे संचालक प्रा. डॉ. नागनाथ मोटे यांनी सांगितले. तर तहसीलदार संदिप खोमणे यांनी शिक्षकांचे कौतुक करीत विद्यार्थी चांगले शिक्षण देऊन विद्यार्थी चांगल्या हुद्द्यावर नोकरीस लागतील यासाठी प्रयत्न करावे असे सांगितले. यावेळी गेवराई चे तलाठी मेजर माणिकराव पांढरे, तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष मधुकर तौर, जेष्ट पत्रकार प्रा राजेंद्र बरकसे, शिवसेना ता.प्रमुख शिनुभाऊ बेदरे, संपादक अमोल वैद्य, गोपाल मोटे,यशवंत पाटील,प्रा अभिजीत तौर आदींची उपस्थिती होती. या सर्व उपस्थित मान्यवरांचे प्रा. डॉ. नागनाथ मोटे यांनी आभार मानले.

# पद्मश्री शंकरबापूजी धृपद गौरव पुरस्कार सोहळ्याचे अंबाजोगाईत ३ जानेवारी रोजी आयोजन

## सुप्रसिद्ध धृपद गायक उस्ताद अनिसोद्दिन आणि उस्ताद नफिसोद्दिन डागर पुरस्काराचे मानकरी ; धृपद गायन जुगलबंदी रंगणार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ डिसेंबर**

तपस्वी पखावज साधक पद्मश्री शंकरबापू आपेगावकर यांच्या २१ व्या पुण्यस्मरणानिमित्त पद्मश्री शंकरबापूजी धृपद गौरव पुरस्कार सोहळ्याचे आयोजन अंबाजोगाईत ३ जानेवारी रोजी करण्यात आले आहे. यावर्षीच्या पुरस्काराचे मानकरी हे सुप्रसिद्ध धृपद गायक उस्ताद अनिसोद्दिन डागर आणि उस्ताद नफिसोद्दिन डागर जयपूर (राजस्थान) हे आहेत. यावेळी आयोजित संगीत सभेत धृपद गायन जुगलबंदी रंगणार आहे. त्यांना पंडित उद्धव बापू आपेगावकर यांची साथसंगत लाभणार आहे. अशी माहिती आपेगावकर परिवार यांच्या वतीने देण्यात आली आहे.




शहरातील हॉटेल ईट एँड स्टे हॉल, बडोदा बँकेच्या वर, मोंढा रोड, अंबाजोगाई येथे शुक्रवार, दि.३ जानेवारी रोजी सायंकाळी ७ वाजता पद्मश्री शंकरबापूजी धृपद गौरव पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून गंगा माऊली शुगर्स केज व उद्योग समूह, लातूरचे चेअरमन लक्ष्मणराव मोरे तर अध्यक्षस्थानी साई शुगर व उद्योग समूह, रांजणी, धाराशिवचे चेअरमन बी.बी.ठोंबरे हे असणार आहेत. तर एमआयटी-एडीटी विद्यापीठ, लोणी काळभोर, पुणे कार्यकारी अध्यक्ष व कुलगुरू प्रा.डॉ.मंगेश कराड यांच्या शुभहस्ते व मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत सुप्रसिद्ध धृपद गायक उस्ताद अनिसोद्दिन आणि उस्ताद नफिसोद्दिन डागर, जयपूर (राजस्थान) यांना पद्मश्री शंकरबापूजी धृपद गौरव पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ.नंदकुमार सोमवंशी हे उपस्थित राहाणार आहेत. पुरस्कार वितरण सोहळ्यानंतर सुप्रसिद्ध धृपद गायक उस्ताद अनिसोद्दिन डागर आणि उस्ताद नफिसोद्दिन डागर यांच्या संगीत सभेत धृपद गायन जुगलबंदीची मैफल रंगणार आहे. त्यांना पंडित उद्धवराव बापू आपेगावकर यांची पखावज साथसंगत लाभणार आहे. तरी या कार्यक्रमास अंबाजोगाई शहर व परिसरातील विविध क्षेत्रातील मान्यवर, नागरिक आणि संगीत रसिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन पद्मश्री शंकरबापू आपेगावकर परिवार, अंबाजोगाई यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### अहमदपूर तालुक्यातील राळगा येथे शिक्षण परिषद संपन्न

**अहमदपूर, दि.३१ डिसेंबर -**

डिसेंबर २०२४ ची शिक्षण परिषद जिल्हा परिषद प्राथमिक शाळा राळगा येथे आज मोठ्या थाटामाटात दिमाखदार स्वरूपात संपन्न झाली. कार्यक्रम प्रारंभी भारताचे माजी प्रधानमंत्री व जागतिक किर्तीचे अर्थतज्ञ मनमोहनसिंग यांना श्रद्धांजली

अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीची अध्यक्ष लक्ष्मण खांडेकर तर प्रमुख पाहुणे म्हणून पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्या रेखा तरडे, केन्द्रप्रमुख अशोक बारमाळे,

रमाकांत खंदारे, केन्द्रीय मुख्याध्यापक भानुदास शिंदे, दिलीपकुमार शेटे, सुर्यवंशी, मनिषा गुणाले हे उपस्थित होते. राळगा येथील शाळेच्या रंगरंगोटीसाठी १ लाख ५० पन्नास हजार रूपये देणगी देणाऱ्या रामभाऊ जावीर व ग्रा.पं.च्या निधीतीतून लाखोंचा निधी देऊन शाळेस भौतीक सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल सरपंच राजकुमार नरवटे पाटील यांचा सत्कार शाळा व्यवस्थापन समिती राळगा यांच्या वतीने करण्यात आला.

शिक्षण परिषदेच्या यशस्वीतेसाठी गावातील नारायण नरवटे, बालाजीराव नरवटे, भुजंगराव खांडेकर, उत्तम वडेर, अंकुश सुरनर, माधवराव वडेर, विनायक राठोड, बालाजी राठोड, मोतीराम नरवटे, चंद्रकांत नरवटे, दयानंद नरवटे, उत्तमराव नरवटे,

शिवदास नरवटे, मारोती पवार, अंगणवाडीताई चंद्रकला देवकत्ते, बचत गटाच्या अध्यक्षा शुभांगी नरवटे आदींनी प्रयत्न केले.

# महाराष्ट्रातील पहिली ड्रगन फ्रुट नर्सरी औशात सुरु करावी : आ. अभिमन्यू पवार

**अभय योजनेला ३१ मार्च अखेरपर्यंत मुदतवाढ द्यावी... महावितरण विद्युत सहाय्यक रिक्त पदांची प्रतिक्षा यादी करावी...**

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.३१ डिसेंबर -**

कायमस्वरूपी बंद करण्यात आलेल्या विद्युत जोडण्या पुनर्जिवीत करण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या अभय योजनेला ३१ मार्च २०२५ पर्यंत मुदतवाढ द्यावी. महावितरणच्या विद्युत सहाय्यक भरती परीक्षा मधील २८२ मराठा उमेदवारांना अधिसंख्य पदे निर्माण करून शासकीय नोकरीत सामावून घेण्याचा निर्णय सरकारने घेतला होता. यापैकी कांही उमेदवार कागद पडताळणी, वैद्यकीय तपासणीत अपात्र ठरल्याने पदे रिक्त राहिली आहेत.

या पदांची प्रतिक्षा यादी प्रसिद्ध करुन भरतीची प्रक्रिया राबवावी. व औसा येथील तालुका बीज गुणन केंद्राची २५ एकर जमिन वापराविना पडून असून येथे महाराष्ट्रातील पहिली ड्रगन फ्रुटची नर्सरु सुरु करावी, अशा मागण्या आ. अभिमन्यू पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केल्या आहेत.



अत्यल्प पाण्यावर आणि कोरडवाहू जमिनीवर येणाऱ्या ड्रॅगन फ्रुट फळबागेची लागवड लातूर जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्यात वाढली आहे. पण महाराष्ट्रात ड्रॅगन फ्रुटची नर्सरी नसल्याने रोपांची तूट निर्माण होत आहे. औसा तालुका बीज गुणन केंद्राची २५ एक्कर जमिन वापराविना पडून असून त्या जागेवर ड्रॅगन फ्रुट नर्सरी व मार्गदर्शन केंद्र सुरू करावे. या आ अभिमन्यू पवारांच्या मागणीवरून मुख्यमंत्र्यांनी कृषी प्रधान सचिवांना तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

कायमस्वरूपी बंद करण्यात आलेल्या विद्युत जोडण्या पुनर्जिवीत करण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या अभय योजनेची मुदत ३१ डिसेंबर रोजी संपणार आहे. या अभय योजनेला औसा मतदारसंघासह संपूर्ण राज्यात चांगला प्रतिसाद मिळाला आहे. पण सोयाबीनला चांगला भाव मिळत नसल्यामुळे आणि तूरीचे उत्पन्न अजून हाती आले नसल्यामुळे इच्छा असूनही अनेकांना अभय योजनेचा लाभ घेता आलेला नाही. त्यामुळे अभय योजनेला ३१ मार्च, २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्याच्या मागणीला मुख्यमंत्र्यांनी महावितरणच्या एमडी यांना कार्यवाही करण्याची सूचना दिली आहे.

या भेटीदरम्यान आ. अभिमन्यू पवार यांनी महावितरण विद्युत सहाय्यक भरती परीक्षा (जा. क्र. ४/२०१९) मधील २८२ मराठा उमेदवारांना अधिसंख्य पदे निर्माण करून शासकीय नोकरीत सामावून घेण्याचा निर्णय सरकारने घेतला होता. या २८२ पैकी बहुतांश मराठा उमेदवारांना नियुक्ती मिळाली असून काही उमेदवार कागद पडताळणी, वैद्यकीय तपासणीमध्ये अपात्र ठरल्याने कांही पदे रिक्त राहिली आहेत. या रिक्त पदांची प्रतिक्षा यादी प्रसिद्ध करुन भरतीची प्रक्रिया राबवावी अशी मागणी केली.

या मागणीची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव यांना तपासून कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

# तुळजापूर तालुक्यात पवनचक्की कंपन्यांचा मनमानी कारभार



**शेतकऱ्यांच्या जमिनी बळकवण्यासाठी शेतकऱ्यांवर बळाचा वापर ! पोलीस प्रशासन शेतकऱ्यांची दखल घेत नसल्याचा शेतकऱ्यांचा आरोप... टावरलाईन मधील दलाल, एजंट, पवनचक्की टावर भु माफीया लोकांचा बंदोबस्त प्रशासनाने करावा अशी राष्ट्रवादी कॉंग्रेसची (अजित पवार गट) मागणी...**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३१ डिसेंबर -**

तालुक्यातील ग्रामीण भागात होत असलेल्या पवनचक्कीच्या टावर लाईनमध्ये सुप्रिम कोर्टाच्या आदेशानुसार जिल्हा समीतीच्या शिफारशीनुसार शेतकऱ्यांच्या जमीनीचे महसुली मोजमापन भुसंपादन विभागाकडून करुन कृषी विभाग वन विभाग यांच्यावतीने संयुक्त पहाणीद्वारे अथवा सुप्रीम कोर्टाचे आदेशाप्रमाणे २० लाख रुपये प्रतीटावर नुकसान भरपाई द्यावी व उगीच अंगात आल्यागत शेतकर्यांच्या अंगावर पोलीस, म हसुली प्रशासन, न्यायालय, खासगी बॉउनसर सोडुन शेतकऱ्यांना डिवचायचे काम पवनचक्की कंपनीने करण्याचे काही कारण नाही. अन्यथा राष्ट्रवादी कॉंग्रेसचे (अजित पवार गट) तालुकाध्यक्ष श्रीकृष्ण सूर्यवंशी यांनी पवनचक्की कंपन्यानी हिशोबात रहावे, अन्यथा कंपन्यांना योग्य तो धडा शिकवीला जाईल असा इशारा ३१ डिसेंबर रोजी येथील शासकीय विश्रामगृह येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये दिला आहे.



रिन्यु पावरने पैशाची मस्ती तुळजापूर तालुक्यात दाखऊ नये अन्यथा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीतर्फे समजेल. त्या भाषेत कंपनीस अद्दल घडवीली जाईल आम्ही शेतकऱ्यांसोबत मिळुन या कंपनीचा पक्का बंदोबस्त करु.

जिल्हा प्रशासनाला विनंती असेल रिन्यु पावर प्रोजेक्ट ४०० केव्ही सबस्टेशन व ट्रान्समीशन या प्रोजेक्टच्या सर्व बाधीत शेतकऱ्यांवर झालेल्या अन्यायाबद्दल कंपनीवर कायदेशीर कारवाई करावी. शेतकऱ्यांना टावर उभा करताना १५ लाख देतो म्हणुन कसलीही सम्मती न घेता विरोध बळपुर्वक डावलुन नादाला लाऊन प्रत्यक्षात २ लाखात टावर काम कम्पलीट करुन फसवणुक केल्यामुळे प्रोजेक्ट मॅनेजर लक्ष्म ीनारायण दास व ठजथ अधीकारी गांगुर्डे यांच्यावर फसवनुकीचा गुन्हा दाखल करावा. तसेच टावरलाईन मधील दलाल, एजंट, पवनचक्की टावर भु माफीया लोकांचा बंदोबस्त प्रशासनाने करावा नाही तर जिल्हाधिकारी कार्यालय समोर तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना घेऊन ठिय्या आंदोलन करणार असल्याचा इशारा सूर्यवंशी यांनी दिला.

यावेळी पत्रकार परिषदेस चिवरी उमरगा, शिरगापूर, गंधोरा या गावचे टावर बाधीत शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तीन दशकानंतर आंब्याच्या सावलीत भरली माजी विद्यार्थ्यांची शाळा

**पोमादेवी जवळगा येथील विद्यानिकेतन शाळेतील विद्यार्थ्यांचे संमेलन...**

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.३१ डिसेंबर -**

भुकंपापुर्वी एकत्रितपणे शिक्षण घेतलेल्या औसा तालुक्यातील पोमादेवी जवळगा येथील विद्यानिकेतन माध्यमिक विद्यालयातील माजी विद्यार्थ्यांनी माजी गुरुजनांच्या उपस्थितीत आंब्याच्या सावलीत तीन दशकानंतर शाळा भरवली. आणि जुन्या आठवणीना उजाळा देत वनभोजनाचा आनंद घेतला.

राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात करुन दिवंगत बनकर व नारायणराव काळे गुरुजी व वर्गमित्र संजय सुर्यवंशी, धनराज सुर्यवंशी, नेताजी ककोव्हाळे यांना श्रध्दांजली वाहण्यात आली.

यानंतर पुजा गाडीवाले, साळुंके, कुमार आबा, कमलाकर कुलकर्णी, सहदेव कांबळे यांच्या हस्ते सरस्वती प्रतिमा पुजनाने कार्यक्रम ाची सुरुवात करण्यात आली.

गावचे सुपुत्र व पुणे येथील उद्योजक संतोष फडणीस कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी विद्यार्थी, विद्यार्थिनी व गुरुजी उपस्थित होते. अच्युत मगर यांनी सुत्रसंचालन केले.




राजेन्द्र कांबळे यांनी उपस्थित गुरुजी व वर्ग मित्र, मैत्रिणी यांचे आभार मानले.

विश्वनाथ सुतार, संतोष फडणीस यांनी कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी पुढाकार घेतला होता.

राजेन्द्र कांबळे, अच्युत मगर, विश्वनाथ सुतार, संतोष फडणीस प्रताप राजपूत अनिता गोमदे गवळी, स्वाती जोशी, अरुण पाटील, प्रतिभा पाटील, योगिता सूर्यवंशी, अर्चना काळे, किरण डोलारे, मंगल मोरे, अनिता लिंबाळकर, मंगरुळे नागरसोगा, तपसे चिंचोली, हारेगाव, तुंगी, जवळगा पोमादेवी, दापेगाव, कवळी, गाढवेवाडी आणि संक्राळ येथील मित्र, मैत्रिणी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्य लिपिक वर्गीय संघटनेच्या मराठवाडा उपाध्यक्षपदी बालाजी मोहोळकर

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.३१ डिसेंबर -**

महाराष्ट्र राज्य लिपीक वर्गीय कर्मचारी संघटनेच्या मराठवाडा उपाध्यक्षपदी पंचायत समिती निलंगा येथील प्रशासन अधिकारी बालाजी मोहोळकर निवड करण्यात आली आहे.



महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद लिपिक वर्गीय कर्मचारी संघटनेच्या राज्य कार्यकारिणीची वार्षिक सभा २८ डिसेंबर रोजी जालना येथे संपन्न झाली. या वार्षिक सभेत सर्वानुमते बालाजी मोहोळकर यांची राज्य शाखेच्या उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. बालाजी मोहोळकर निलंगा पंचायत समिती कार्यालयात कनिष्ठ प्रशासन अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

यावेळी महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद लिपिक वर्गीय कर्मचारी संघटनेचे राज्याध्यक्ष मारुती जाधव, राज्य सचिव अरुण जोर्वेकर, कोषाध्यक्ष उमाकांत सूर्यवंशी, कार्याध्यक्ष एस.एस. राऊत, सचिन मगर, पंकज गुल्हाने, संजय राऊत, सागर बाबर, एल.के. धुमाळ, गणेश कुलकर्णी, रज्जाक बागवान यांच्या सह राज्यातील सर्व जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष जिल्हा सचिव उपस्थित होते.

या निवडीबद्दल निलंगा पं.स.चे कार्यालयीन प्रशासन अधिकारी बालाजी मोळकर यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# माणिक मूंडे, चंद्रकांत शिंदे, साकराप्पा वाघमारे यांना पत्रकारिता पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.३१ डिसेंबर -**

राज्यातील जेष्ठ पत्रकार माणिक बालाजी मूंडे यांना साहित्य संगीत कला अकादम ीच्या वतीने दिला जाणारा यंदाचा 'दर्पण सेवा गौरव राज्य पुरस्कार २०२४' जाहीर झाला आहे. तर स्थानिक पातळीवर पत्रकार म्हणून कार्यरत असणारे जेष्ठ पत्रकार चंद्रकांत शिंदे व साकराप्पा वाघम ारे यांना 'दर्पण जीवन गौरव पुरस्कार २०२४' देवून गौरव करण्यात येणार आहे.





यंदा पत्रकार चंद्रकांत शिंदे आणि साकराप्पा वाघमारे यांना हा 'दर्पण सेवा गौरव पुरस्कार २०२४' देण्यात येणार आहे. शाल, स्मृतीचिन्ह, मानपत्र पूष्पहार असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

या पूर्वी मा.रा. कराड, प्रा.एस.एम. कूलकर्णी, अ.ना. शिंदे, उदयकुमार जोशी, संदीप अंकलकोटे, बाबूराव श्रीमंगले, रवीकांत क्षेत्रपाळे, प्रशांत शेटे, सूरेश डबीर, सूधाकर हेमनर, दिनकर मद्देवार, संतोष अचवले, रंगनाथ वाघमारे, रामलिंग तत्तापूरे, भरतसिंह ठाकूर यांना प्रदान करण्यात आला आहे.

# वलांडीत भिषण आग; व्यापाऱ्यांचे ५० लाखांचे साहित्य जळुन खाक

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.३१ डिसेंबर -**

तालुक्यातील वलांडी येथे ३० डिसेंबर रोजी सकाळी दहाच्या सूमारास अचानक पेट्रोल पंपाच्या समोरील दूकानातून धूर येताना नागरीकांना आढळून आले.

वेळ अमावस्याच्या निमित्ताने सकाळी व्यापाऱ्याने प्लाउडच्या दुकानात पुजा करून दिवे लावले होते. वेळ अमावस्या साजरी करण्यासाठी दुकान बंद करून गावाकडे परतले.

दिव्याने पेट घेऊन संपूर्ण दुकान पेटले. नागरीकांनी आरडाओरडा करून आजूबाजूच्या दुकानाचे कुलूप तोंडुन दूकानाचे शटर वरी केले व दुकानातील वेग वेगळी वस्तू सामान व बाहेर काढण्यास नागरीकानी सुरूवात केली.

आग लागलेल्या दुकानात लाकडी प्लाऊड असल्याने आगीने भिषण रुप धारण केले. व कमी वेळेतच आजूबाजूची सहा दूकानांनी पेट घेतला. देवणी अग्नीशमन दल यांना फोन करून कल्पना देण्यात आली. व्यापाऱ्यांची दूकाने पत्र्याच्या शेडची असल्याने बाजूची दूकाने पेटू लागली. बघता बघता अग्निशमन दल येईपर्यंत पाच दूकाने पेटली.

१० ते १५ मिनीटात देवणी अग्नीशमन दलाचे अगमन झाले. त्यांनी लागलेल्या आगीस आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. इतक्यातच उदगीर व निलंगा अग्निशमन घटना स्थळी दाखल झाले. दिड ते दोन तासाच्या प्रयत्नानंतर आग आटोक्यात आणण्यात आली.व आजूबाजूच्या दूकाने आगीच्या आटोक्यात





येण्यापासून बाल बाल बचावली.

देवणी अग्नीशमन दल प्रमूख नाजीम मोमिन, शेख मूनाफ, उदगीर अग्निशमन दलाचे आकाश अंधारे, उत्कर्ष कांबळे, आकीब शेख,सत्यजीत कांबळे, निलंगा अग्निशमन दलाचे नागेश तूरे, मलीकार्जुन शिंदे, सोमनाथ मादळे, गंगाधर करवडे आदी कर्मचारीने आगीला नियंत्रणात आणल्यामुळे एक मोठा अणर्थ टळला.

या लागलेल्या भिषण आगीत विश्वकम ा डोअरचे ९ लाखांचे नूकसान झाले. रूद्रा मोबाईलचे १५ लाख रूपयांचे नूकसान झाले. महालक्ष्मी अटोम ोबाईलचे १३ लाख रूपयांचे साहित्य जळून खाक झाले. ३ स्टार वॉचचे ४ लाखांचे साहीत्य जळून खाक झाले. सिध्दनाथ इलेक्ट्रीकलचे ५ लाखांचे नूकसान झाले. रायबा मेन्स वेअरचे ५ लाखांचे नूकसान झाले. पांडूरंग कृषी सेवा केंद्रचे दिड लाखांचे नुकसान झाले. आदीचे पंचनामे व माहीती वलांडीचे मंडळ अधिकारी बालाजी केंद्रे यांनी दिली.

# परिवर्तन संस्थेच्या वतीने एक दिवशीय लघु-उद्योग प्रशिक्षण शिबीर संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि.३१ डिसेंबर -**

परिवर्तन संस्था सुमठाणा आणि उज्जीवन बँक यांच्या वतीने तालुक्यातील मागासवर्गीय अल्पभुधारक शेतकरी व महिला बचतगट यांच्याकरिता एक दिवशीय लघु उद्योग प्रशिक्षण रेणापुर येथे पार पडले.

पंचायत समिती सभागृह रेणापुर येथे परिवर्तन संस्था सुम ठाणा आणि उज्जीवन बँक यांच्या वतीने तालुक्यातील पानगांव, आरजखेडा, तत्तापुर, गरसुळी येथील मागासवर्गीय अल्पभुधारक शेतकरी व महिला बचतगट यांच्याकरिता एक दिवशीय लघु उद्योग प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परिवर्तन संस्थेचे मुख्य समन्वयक नागनाथ चव्हाण होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणुन उज्जीवन बँकेचे विभागीय व्यवस्थापक गणेश म ोरे, लातुर शाखेचे गुट्टे, अशीष, परिवर्तन संस्थेचे संस्थेचे सचिव बालाजी शिंदे उपस्थित होते. यावेळी मोरे यांनी अल्पभुधारक शेतकऱ्यांनी शेतीला जोडधंदा म्हणुन आणि महिलां बचत गटानी केवळ महिण्याला शे-पाचशाची बचतच न करिता स्वतःचे लघु उद्योग कसे उभारले जातील याकडे लक्ष देण्याची गरज असल्याचे सांगितले. तर गुट्टे यांनी उज्जीवन बँके कडून कमी व्याज दरात वैयक्तीक व समुह लघु उद्योग उभारण्याकरिता आणि शेतीसाठी लागणारे अवजारे घेण्याकरिता कमीत कमी दराने कर्ज उपलब्ध करून देण्याकरिता बँक पुढाकार घेईल असे सांगितले. नागनाथ चव्हाण यांनी आजच्या काळातली न परवडणारी शेती आणि सध्याची महागाई यामुळे अल्पभुधारक शेतकऱ्यांनी, महिला बचत गटांनी छोट्या मोठ्या उद्योगाकडे वळावे असे सांगितले तर बालाजी शिंदे यांनी परिवर्तन संस्था हि लघु उद्योग उभारण्या कामी अल्पभुधारक शेतकरी, महिला बचत गट आणि बँक यांच्यातील दुवा म्हणुन काम करणार असल्याचे सांगत ज्यास्तीत अल्पभुधारक शेतकरी, महिला बचत गटांनी याचा लाभ घेण्याचे अवाहनही केले. कार्यक्रम ाचे सुत्रसंचलन रेणापुर तालुका समन्वयक विष्णु आचार्य यांनी केले.

यावेळी अंकुश चिकटे, डिंगाबर चव्हाण, किशोर कसबे, बालीका चिकटे, प्रणिता आचार्य, संजय जोगदंड, गौतम आचार्य, मोहन वायदंडे, मधुकर घोडके, त्र्यंबक घोडके, जयश्री घोडके, शितल जोगदंडसह पानगांव, आरजखेडा, तत्तापुर, गरसुळी येथील मागासवर्गीय अल्पभुधारक शेतकरी व महिला बचतगटातील दिडशे महिला उपस्थित होत्या.

# अहमदपूर परिसरात वेळा अमावस्या उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.३१ डिसेंबर -**

काळ्या आईचे म्हणजेच धरणी मातेचे पूजन करत शेत शिवारात वन भोजनाचा खाऊ-पिऊ घालण्याचा सण म्हणून गणली जाणारी वेळाअमावस्या साजरी करण्याची परंपरा यंदाही अहमदपूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी जपली.

यंदा रब्बी हंगामाच्या प्रारंभाला चांगला पाऊस झाल्याने ज्वारी, गहू, हरभरा शिवाय भाजीपाला ही पिके जोमात असून, हिरवीगार शेती वेळा अमावस्येचा आनंद द्विगुणित करणारी ठरली.

यंदा चाराही मुबलक असल्याने पशुपालकही हा सण आपआपल्या शेतात साजरा करताना दिसून आले. शेतातील लक्ष्मीचे डोहाळे जेवण म्हणून ही वेळ अमावस्या खास करून धाराशिव व लातूर जिल्ह्यात साजरी केली जाते. बाजरीच्या पिठाचे उंडे, ज्वारीच्या पिठापासून बनविलेले आंबील या खास मेनू बरोबरच भजी, भात, आंबट पदार्थ हा खास मेनू हे आजचे वैशिष्ट्य असते.

रविवारी शेतकरी कुटुंबांनी आपल्या शेतात ज्वारीच्या कडब्याची कोप करून शेतातल्या लक्ष्मीची पूजा केली. यावेळी शेतकऱ्यांचे स्नेही, मित्रगण व आप्तेष्ट मंडळीही आवर्जून उपस्थित होती.

यंदाच्या गावरान भोजनात घरगुती पदार्थ, बाजारातील फरसाण, मिठाई, फळे यांचाही या वनभोजनात समावेश दिसून आला.

वेळा अमावस्येनिमित तालुक्यातील जवळपास सर्व बाजारपेठाबंद होत्या.

तालुक्यातील सुनेगाव (शेंद्री) येथील शेतकरी शिवाजी काळे यांच्या शेतात काळ्या आईची सपत्नीक पुजा करत शेतकरी श्रीहरी काळे, प्रा. गोविंद भगत, शिवाजी सोळुंके, भद्रीनाथ शिंदे, बालाजी काळे, आशा काळे, कमल काळे, जना काळे , धनश्री काळे, प्रगती काळे, प्रज्ञा काळे, गोविंद काळे, गोपाळ काळे, प्रणव काळे, पायल काळे, प्रतीक काळे, पियुष काळे, आयुष काळे यांनी गावकऱ्या सोबत वेळा अमावस्या साजरी केली.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## विनोद चव्हाण यांना मराठवाडा भूषण पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ डिसेंबर-**
येथील राजा नारायणलाल लाहोटी सीबीएसई इंग्लिश स्कूलचे शिक्षक विनोद चव्हाण यांना मराठवाडा समन्वय समिती पुणे, यांच्यातर्फे देण्यात येणारा यावर्षीचा ममराठवाडा भूषणफ मआदर्श शिक्षक पुरस्कार - २०२४ जाहीर झाला असून या पुरस्काराचे वितरण बुधवार दि. १ जानेवारी रोजी तुळजापूर येथे आयोजीत भव्य कार्यक्रमात प्रमुख मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

मराठवाडा समन्वय समिती पुणे, ही एक मराठवाड्याच्या सर्वांगिण विकासासाठी कार्य करणारी समाजिक सेवाभावी संस्था आहे. ही संस्था मागील अनेक वर्षापासून पुणे व मराठवाडा येथे विविध सामाजिक उपक्रम राबवीत आहे. दिवंगत भानुदासराव धुरगुडे हे मराठवाड्यातील अग्रणी स्वातंत्र्यसंग्राम सेनानी म्हणून परिचित होते. हैदराबाद संस्थान व इंग्रजांविरुद्धच्या स्वातंत्र्य चळवळीत त्यांनी सक्रिय सहभाग होता. त्यांच्या अमूल्य योगदानासाठी शासनाने त्यांना ताम्रपदक व सन्मानपत्र प्रदान करून गौरव केला. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भानुदासराव यांनी समाजसुधारणा व शिक्षण प्रसारासाठी आयुष्यभर कार्य केले.

शिक्षणाच्या माध्यमातून समाजाला पुढे नेण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यांच्या १ जानेवारी रोजीच्या जयंती दिनाचे औचित्य साधून मागील अनेक वर्षापासून दरवर्षी मराठवाड्यातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या आदर्श शिक्षकांना ममराठवाडा भूषणफ आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. सन २०२४ या वर्षासाठी राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलचे शिक्षक विनोद चव्हाण यांची मराठवाडा भूषण आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

### संक्षिप्त वृत्त...

## तुला गाडी नीट चालवता येत नाही का म्हणून मारहाण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ डिसेंबर-**
तुला गाडी नीट चालवता येत नाही का म्हणून शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी फिर्यादीला मारहाण केल्याची घटना लातूर येथील रिंग रोड येथे घडली. याबाबत तिघांविरुद्ध एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
फिर्यादी अनिकेत सुरेश वायचळ यांना तुला गाडी नीट चालवता येत नाही का म्हणून रिंग रोड येथे शुभम गवळी व अन्य दोघांनी शिवीगाळ केली. बेल्टने हातावर, पाठीवर तसेच डोक्यावर मारहाण केली. मारहाणीत फिर्यादीच्या डोक्यात बेल्टचे बकल लागून जखम झाली आहे. रक्त निघाले आहे. तुम्हाला काय करायचे ते करून घ्या, असे म्हणून धमकीही देण्यात आली, असे अनिकेत वायचळ यांनी एमआयडीसी पोलुस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. त्यानुसार शुभम गवळी व अन्य दोघांविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस हवालदार बिराजदार करीत आहेत.

## गोदावरीदेवी कन्या विद्यालयात होणार माजी विद्यार्थिनींचे स्नेहमिलन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ डिसेंबर-**
श्री गोदावरीदेवी लाहोटी कन्या पाठशाळा व व्दिालय स्थापनेला आठ दशके पूर्ण होत आहेत. या निमित्ताने ङ्गसहस्त्रचंद्रदर्शन सोहळ्याच्या उंबरठ्यावरफ भव्य असा माजी विद्यार्थिनी मेळावा दि ३ जानेवारी २०२५, वार शुक्रवार रोजी आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या उद्घाटक राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष श्रीमती विजया रहाटकर, प्रमुख पाहुण्या भगिनी निवेदिता प्रतिष्ठानच्या सचिव श्रीमती विनिता तेलंग, तसेच डॉ. अनघाताई लवळेकर, कार्यक्रमाचे व श्री मारवाडी राजस्थान शिक्षणसंस्थेचे अध्यक्ष श्री शैलेशकुमार लाहोटी, सचिव ॲड. आशिषजी बाजपाई यांच्या प्रमुख उपस्थितीत हा ऐतिहासिक सोहळा संपन्न होणार आहे. या स्नेहमिलन कार्यक्रमाला मागील आठ दशकातील सर्व माजी विद्यार्थिनींनी आवर्जून उपस्थित रहावे, अशी विनंती संयोजकांनी केली आहे.

## दुचाकीला स्कूल बसची धडक; एक गंभीर जखमी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ डिसेंबर-**
औराद शहाजानी येथे दुचाकीला स्कूल बसचालकाने निष्काळजीपणे भरधाव वेगात बस चालवून धडक दिली. या अपघातात मोटारसायकल चालक गंभीर जखमी झाले. तसेच मोटारसायकलचे मोठे नुकसान झाले आहे, असे साहिल सय्यद शेख (रा. औराद शहाजानी, ता. निलंगा) यांनी औराद शहाजानी पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. त्यानुसार स्कूल बसचालकाविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस हवालदार मोरे करीत आहेत.

## कृषि क्षेत्रातील तंत्रज्ञान व योग्य वापर यासाठी मार्गदर्शनाची गरज

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ डिसेंबर-**
कृषी क्षेत्रात जोपर्यंत तंत्रज्ञानाचा योग्य वापर आणि योग्य मार्गदर्शन होणार नाही तोपर्यंत त्यात प्रगती होऊ शकत नाही. प्रशिक्षण हे शेतीमध्ये नव्या बदलांचा स्वीकार करण्यासाठी महत्त्वाचे आहे. असे मत माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी केले.

ते लातूर येथील ज्ञानदेव पाटील ट्रस्ट संचलित कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय लातूर येथे पदविका प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते . यावेळी प्रमुख अतिथी म्हणून माजी आमदार अँड त्रिंबक भिसे, राज्य साखर महासंघाचे संचालक आबासाहेब पाटील, जागृती शुगरचे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे विलास साखर कारखान्याचे उपाध्यक्ष रवींद्र काळे, मारुती महाराज साखर कारखान्याचे अध्यक्ष शामराव भोसले,रेणा साखर कारखान्याचे उपाध्यक्ष अनंतराव देशमुख, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अँड प्रमोद जाधव, जिल्हा कृषी अधीक्षक जाधव ,ज्ञानदेव पाटील चॅरिटेबल, ट्रस्टचे अध्यक्ष सुरेशराव कदम, बाळासाहेब कदम, प्रभाकर कदम, जाधव आर. टी., एस. व्ही. लाडके आदी मान्यवर उपस्थित होते.
यावेळी प्रास्ताविक संस्थेचे संचालक बाळासाहेब कदम यांनी करून संस्थेच्या वाटचालीची माहिती दिली. आभार प्रदर्शन प्राचार्य डॉ एल बी सुरनर यांनी मानले.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे जीवनकार्य महिलांसाठी प्रेरणादायी

### लातुरात राज्यस्तरीय धनगर समाज वधूवर परिचय मेळावा उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ डिसेंबर-**
पुण्ययश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ख्याती जगभर आहे. त्यांना राज्यकारभार करीत असताना स्वकीयांचाच त्रास झाला. स्वकीयाच्या माध्यमातून त्यांच्यावर आक्रमणाचा प्रयत्न झाला. परंतु त्यांनी मोठ्या हुशारीने परतवून लावला. त्यांची जीवनगाथा ही संघर्षमय असून महिलांसाठी प्रेरणादायी आहे असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्त्या तथा भाजपच्या नेत्या डॉ. अर्चनाताई पाटील-चाकूरकर यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सर्वांगिण विकास मंडळाच्या वतीने विष्णुदास मंगल कार्यालयात धनगर समाजाचा १९ वा राज्यस्तरीय वधूवर परिचय मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात त्या बोलत




होत्या. अध्यक्षस्थानी मंडळाचे अध्यक्ष ॲड. मा. गो. मांडुरके उपस्थित होते. व्यासपीठावर व्याख्याते प्रा. विष्णू कावळे, समाजकल्याण सहाय्यक आयुक्त शिवकांत चिकुर्ते, ज्येष्ठ पत्रकार अशोक चिंचोले, बाळकृष्ण धायगुडे, ॲड. मंचकराव डोणे इ. मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्रा. विष्णू कावळे, मा. गो. मांडुरके यांनी मार्गदर्शन केले. सुरुवातीला सचिव ॲड. मंचकराव डोणे यांनी प्रास्ताविक केले. सुरुवातीला संयोजकांच्या वतीने पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन अनिता खडके, दुर्गाप्रसाद मोटे व सुरेखा मदने यांनी केले. या कार्यक्रमाला किशनराव कंदरफळे, प्रा. लहुकांत शेवाळे, मारुती भुरे, डॉ. सिद्राम सलगर, रामकिसन मदने, सुरेश अभंगे, अभियंता रामराव रोडे, राजपाल भंडे, प्राचार्य मधुकर सलगरे, गेवराईचे मुख्याधिकारी विक्रम मांडुरके, पत्रकार व लेखक उज्ज्वकुमार माने, पोलीस उपनिरीक्षक महादेव काकडे, प्रा. डॉ. महेश मोटे इ. मान्यवर उपस्थित होते. आभार सुभाष लवटे यांनी मानले.

## डॉ. घुगेंचा कोठडीतील मुक्काम वाढला

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ डिसेंबर-**
शहरातील आयकॉन हॉस्पिटलमध्ये बाळू डोंगरे याच्या हत्येप्रकरणी नवनवीन घटना समोर येत आहेत. मयत बाळू डोंगरे याच्या मोबाईलमध्ये हॉस्पिटलच्या अनधिकृत गैरकृत्याबाबत नेमके काय आहे ? याबाबतच्या तपासासाठी पोलिसांनी मागितलेल्या वाढीव पोलीस कोठडीला न्यायालयाने संमती दर्शविली असून डॉ. प्रमोद घुगेंचा पोलीस कोठडीतील मुक्काम आता दि. ६ जानेवारीपर्यंत वाढला आहे.

बाळू डोंगरे हत्येप्रकरणी आरोपी डॉ. प्रमोद घुगे व अनिकेत डोंगरे यास न्यायालयाने ३० डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली होती. सोमवारी या दोघांना कोर्टात हजर केले असता आरोपींनी हॉस्पिटलमधील सीसीटीव्ही फुटेज कुठे ठेवले आहेत.

याबाबत विचारणा केली असता आरोपींनी उडवाउडवीची उत्तरे दिली. तसेच मयत बाळू डोंगरे याच्या मोबाईलमध्ये आयकॉन हॉस्पिटलमधील गैरकृत्यबाबत पुरावे असल्याचे मयत बाळू डोंगरे याच्या वडिलांनी आरोप केले आहेत. त्यामुळे अधिकच्या तपासासाठी पोलिसांनी वाढीव पोलीस कोठडी मागितली होती. यावर आरोपीचे वकील ज्ञानोबा सूर्यवंशी यांनी तपासासाठी पुरेशी पोलीस कोठडी देण्यात आली होती. त्यानुसार पुरेसा वेळ मिळूनही हाती ऑन रेकॉर्ड काही विशेष न आल्याने खुनासारखी काही घटनाच झाली नसल्याचे दिसून येत आहे. शिवाय आरोपी एक दिवस दवाखान्यात उपचारासाठी होता हे कारण पीसीआर साठी योग्य नाही. त्यामुळे आरोपींना पीसीआर न देता न्यायालयीन कोठडी देण्याची मागणी केली. दोन्ही बाजूचा युक्तिवाद ऐकल्यांनंतर न्यायाधीशांनी डॉ. घुगे व अनिकेत मुंडे यांना दि. ६ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

## मुक्तांगण इंग्लिश स्कूलमध्ये वेळा अमावस्या उत्साहात



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ डिसेंबर-**
लातूर परिसरातील मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचालित मुक्तांगण इंग्लिश स्कूल मध्ये वेळा अमावस्या सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

याप्रसंगी प्रभारी प्राचार्या माधुरी वाघमारेयांनीपाच पांडवाचेपुजनकरुनदर्शन घेतले.

या प्रसंगी शाळेच्याशिक्षिका माधुरी देशमुखयांनीवेळा अमावास्या सणाची माहिती विद्यार्थ्यांना दिली. शेतात आल्यानंतर एका झाडाखाली पाच पांडव मांडतात. त्यांना चुन्यानेरंगवतात. त्यावर कडब्याच्या पाच पेंढ्या उभ्या करून एक सुंदर कोपकरतात. लाल शालीने ते बांधतातही. डालग्यातून साहित्य काढतात.

पांडवा समोर हिरवे कापड ठेवून लक्ष्मीची पूजाही मांडतात. नैवेद्य म्हणून भजी, वांग्याचेभरीत, ऊस, पेरू, बोरे, शेंगदाण्याचे लाडू, आंबील, आंबटभात, ज्वारी आणिबाजरीचे उंडे ठेवतात. पांडवाची पूजाकरतात. शेवटी नारळ फोडून अगदी साध्या पद्धतीने पूजा संपवतात.

या निमित्ताने शाळेचे विद्यार्थीउपस्थित होते. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी एकमेकांना वेळा अमावास्या या सणाच्याशुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## अडकून बसलेल्या घुबडाला जीवदान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ डिसेंबर-**
शहरातील सारोळा रोडवरील बागारेड्डी कॉलनीत एका घरात गव्हाणी घुबड शिरले होते. मात्र, त्याला बाहेर निघता येत नसल्याने अडकून बसले होते. त्याच्या जवळ कोणी जातही नव्हते. दरम्यान, पक्षीमित्र महेबूब शेख यांना रविवारी सकाळी ६ वाजता याबाबतची माहिती देण्यात आल्यावर त्यांनी तत्काळ घटनास्थळ गाठले. खिडकीच्या काचेजवळ दबून बसलेल्या घुबडाला हळूच उचलून त्यांनी बाहेर काढले. त्यांच्या शरीरावर जखमा नव्हत्या. त्याची तपासणी केल्यावर ते ठणठणीत असल्याचे आढळून आले. त्यानंतर त्या पक्षाला वनात सोडून देण्यात आले.

## नववर्षात विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षेबाबत पोलीस देणार माहिती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ डिसेंबर-**
जानेवारीमध्ये प्रत्येक शाळेत रस्ता सुरक्षेबाबत आपल्या विभागातील पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांमार्फत सर्व विद्यार्थ्यांना माहिती देण्यात यावी, अशा सूचना जिल्हा परिवहन समितीच्या बैठकीत देण्यात आल्या आहेत.

या संदर्भाने, शाळांनी काय तयारी सुरू केली आहे, हे माहिती नाही. मात्र, विद्यार्थ्यांच्या दृष्टीने रस्ता सुरक्षा हा विषय सद्या ज्वलंत विषय झाला आहे. रस्ते अपघाताचे प्रमाण वाढत आहे. बरेच विद्यार्थी शाळेत पायी ये, जा करतात. त्यांना रस्ता क्रॉस कसा करावा, काय काळजी घ्यावी, याची शास्त्रोक्त माहिती देण्याचे काम शाळांनी करावे, असे जिल्हा परिवहन समितीच्या बैठकीत ठरले आहे. जिल्हा परिवहन समितीची बैठक १० डिसेंबर रोजी पार पडली. हल्ली अपघाताचे प्रमाण वाढत आहे. त्यातल्या त्यात विद्यार्थी अपघाताचे प्रमाण कमी

करण्यासाठी किंवा अपघातच होऊ नयेत म्हणून जिल्हा परिवहन समितीने नवर्षात शाळेतील विद्यार्थ्यांना पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांद्वारे रस्ता सुरक्षेबाबत काय काळजी घ्यावी, याची माहिती देण्याचे काम करण्यात येणार आहे.

याबाबत शाळांनी तयारी चालवली आहे किंवा नाही, हे माहिती नाही. सध्या रस्त्यांवर वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. परिणामी, अपघात देखील होतात. हे टाळण्यासाठी विद्यार्थ्यांना सुरक्षेचे धडे देण्यात येणार आहेत.

## पीएसआयच्या रिक्त जागा भरण्याची उमेदवारांची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ डिसेंबर-**
पोलीस उपनिरीक्षकांच्या (पीएसआय) रिक्त तीन हजार जागा तात्काळ भराव्यात, अशी मागणी स्पर्धा परीक्षा देणाऱ्या उमेदवारांतून होत आहे.

महाराष्ट्र शासनाने रिक्त जागा भरण्याची कार्यवाही करावी, अशी मागणी बऱ्याच दिवसांपासून आहे. सोमवारी पीएसआयच्या रिक्त जागांची माहिती प्रसिद्ध होताच, स्पर्धा परीक्षा देणाऱ्या उमेदवारांतून मागणीचा उठाव केला जात आहे. यासंदर्भात, शासनाने कोणतेही सूतोवाच केले नसल्याने उमेदवार संभ्रमात असून, महाराष्ट्र शासनाने भरतीच्या मोठ्या जाहिराती काढून स्पर्धा परीक्षा देणाऱ्या उमेदवारांना दिलासा

देण्याचे काम करावे, अशी मागणी होत आहे. सध्या राज्यात बेकार युवक, उमेदवारांची संख्या फारच मोठी आहे. त्यांच्या हाताला काम नाही. रोजगार, नोकरी नसल्याने हे उमेदवार दिशाहीन होत आहेत. शासन वेळेवर जाहिराती काढत नाही. त्यामुळे उमेदवारांची मोठी अडचण होते. स्पर्धा परीक्षेच्या नादात उमेदवारांचे वय निघून जात आहे. काही परीक्षा जानेवारीत घेतल्या आहेत. त्याचा अजून निकाल लागलेला नाही. त्यामुळे तर उमेदवारांच्या चिंतेत आणखीनच भर पडत आहे. फक्त रिक्त पदाचे वृत्त देऊन उपयोग नाही तर ही पदे स्पर्धा परीक्षेद्वारे भरली पाहिजेत, अशी मागणी उमेदवारांतून होत आहे.

## आ. देशमुख यांनी घेतल्या नागरिकांच्या भेटी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ डिसेंबर-**
आ.अमित देशमुख यांनी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संघटना संस्थांचे पदाधिकारी नागरिक यांची भेट घेऊन त्यांच्या समस्या अडचणी समजून घेतल्या. तसेच त्यांच्या निवेदनाचा, निमंत्रणाचा स्वीकार करून संबंधितांना तात्काळ पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सूचना केल्या.

यावेळी माढा मतदारसंघाचे माजी आमदार धनाजी साठे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, माजी महापौर स्मिता खानापुरे, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हाईस चेअरमन समद पटेल,



विलास सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन रवींद्र काळे, दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बियाणी, सीए प्रकाश कासट, उद्योजक हुकूमचंद कलंत्री, माजी जिल्हा परिषद सदस्य सहदेव मस्के, प्रा. प्रवीण कांबळे, अविनाश देशमुख, प्रा. सुधीर अणवले, नरेंद्र काळे, प्रीती नरेंद्र काळे, विश्वकर्मा सेवा चॅरिटेबल ट्रस्ट लातूरचे अध्यक्ष हरिश्चंद्र पांचाळ, विठ्ठल पांचाळ, नामदेव पांचाळ, मोहन सुरवसे, सचिन बंडापले, गोटू यादव, राजकुमार जाधव, शिवाजी देशमुख, एडवोकेट अंगद गायकवाड, अजित माने, अमर खानापुरे, यशपाल कांबळे, एडवोकेट दीपक राठोड, अक्षय शहरकर, प्राध्यापक सुधीर अनवले, मारुती झाकणे, यशवंत पवार आदी उपस्थित होते.

## जिल्ह्यात दर्श वेळा अमावस्या उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ डिसेंबर-**
'ओलगे ऽऽ ओलगे ऽऽ सालन पोलगे ऽऽऽ' अर्थात 'रब्बीचा हंगाम चांगला होऊ दे' असा गजर जिल्ह्यातील शेतशिवारांनी घुमला. निमित्त होते दर्श वेळा अमावास्या. यामुळे सारे शेतशिवारच माणसांनी फुलून गेले होते.

सोमवारी जिल्हाभरात दर्श वेळा अमावास्या उत्साहात साजरी झाली. शेतशिवारातील पूजेनंतर वनभोजनाचा आस्वाद घेण्यात आला. सहकुटुंब पांडवांची आणि काळ्या आईची पूजा केल्यानंतर शेतशिवारांनी वनभोजनाच्या पंक्ती होत्या. वेळा अमावास्येच्या निमित्ताने दरवर्षी शेतामध्ये पूजा-अर्चा करून वनभोजन घेतले जाते. अंबिल व भज्जीवर ताव मारून आनंदी चित्र शेतशिवारांतून पाहायला मिळाले.

दर्श अमावास्या ही वेळा अमावस्या म्हणून लातूर,



धाराशिवसह कर्नाटक, तेलंगणाच्या सीमावर्ती भागात साजरी केली जाते. प्रत्येक गावाच्या शिवारात कडब्याची कोप तयार करून पांडवांची पूजा सहकुटुंब केली जात होती. उंडे, रोडगा व सर्व भाज्या एकत्र तयार करून केलेली भज्जी, तांदळाची तसेच गव्हाची खीर, भात, बाजरीची भाकरी, अंबिल, कोंदीची पोळी, कडक भाकरी, धपाटे, वांग्याचे भरीत अशा अनेक पदार्थांचे मेनू शेतशिवारांत झालेल्या पंक्तीत दिसून आले. दरम्यान, न शेतातील रस्ते फुलले होते. तर, अघोषित संचारबंदीप्रमाणे शहरातील रस्ते, बाजारपेठ निर्मनुष्य होती. सायंकाळी ५ वाजेपर्यंत शहरातील रस्ते निर्मनुष्य होते. त्यानंतर मात्र शहरात वर्दळ सुरू झाली.

**शहरातील उद्यानांत गर्दी**

लातूर शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानामध्ये दुपारपासूनच गर्दी होती. शहरातील नागरिकांच्या उद्यानांमध्ये भोजनाच्या पंक्ती होत्या. वेळा अमावास्याच उद्यानात येऊन सहकुटुंब साजरी केली. विशेष म्हणजे उद्यानांमध्येही सायंकाळी ५ वाजेपर्यंत भोजनाच्या पंक्ती होत्या.

**शेतशिवारात खेळण्याचा आनंद...**

शेतशिवारात खेळण्याचा आनंद बच्चे कंपनीने घेतला. थोरा-मोठ्यांनीही लहानग्यांसोबत वेगवेगळे खेळ खेळले. अनेक ठिकाणी क्रिकेटचा डावही सुरू होता. शहरातून आलेल्या कुटुंबीयांनी ट्रॅक्टर, बैलगाडीमध्ये बसून शिवार फेरीचा आनंद घेतला.

**गावांत शुकशुकाट...**

जिल्ह्यातील सर्वच गावांमध्ये शुकशुकाट होता. प्रत्येक गावातील एक ना एक कुटुंब शेतात वनभोजनासाठी गेलेले होते. त्यामुळे गावांमध्ये शुकशुकाट सून आला.

**खेळांत बच्चे कंपनी रममाण**

दोन-तीन वेळा वनभोजनाचा आनंद घेतल्यानंतर बच्चे कंपनी खेळात रममाण झाली. क्रिकेट तसेच पतंग उडविणे, पिकांमध्ये लपंडाव असा दिवसभर



सिलसिला शेतशिवारांत होता. यंदा प्रत्येक गावातील शिवारांत दर्श वेळा अमावास्येचा मोठा उत्साह पाहायला मिळाला. रस्ते सकाळी अकरा वाजेनंतर निर्मनुष्य झाले होते. बाजारपेठ, आस्थापने बंद होती. तर शेतात जाण्यासाठी अनेकांची लगबग होती. टेम्पो, चारचाकी, दुचाकी वाहनांतून शेतात जाऊन वेळा अमावस्या साजरी करण्यात आली.

**शेताकडे जाण्यासाठी होती लगबग...**

वेळा अमावास्येच्या पूर्वसंध्येपासूनच शहरातून गावाकडे जाण्यासाठी लगबग सुरू होती. काही कुटुंबांनी शहरातूनच वनभोजनाचा मेनू तयार करून शेत गाठले होते. सोमवारी सकाळपासून शेताकडे जाण्याची लगबग दिसून आली. गावागावांतून बैलगाड्या, ट्रॅक्टर, ऑटो, छोटा हत्ती, दुचाकी, चारचाकी अशा विविध प्रकारच्या वाहनांतून शेत गाठले जात होते.

लातूर शहरामध्ये सकाळी ११ वाजेनंतर शुकशुकाट होता. उद्याने मात्र माणसांनी फुललेली होती. ज्यांना शेत नाही, अशा व्यक्ती व त्यांचे कुटुंबीय उद्यानामध्ये भोजनाचा आनंद घेत होते.